जुलै २०१६ / पाने ६० / किंमत ₹ १०

# लोकराज्य

## एकच लक्ष्य 2 कोटी वृक्ष

# शिवराज्याभिषेक...



किल्ले रायगडावर ६ जून २०१६ रोजी अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती दुर्गराज रायगड यांच्या वतीने आयोजित शिवराज्याभिषेक सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. या राज्याभिषेक सोहळ्याला उपस्थित राहणारे श्री. फडणवीस हे पहिले मुख्यमंत्री ठरले. या वेळी सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे, शिवराज्याभिषेक समितीचे मार्गदर्शक श्रीमंत छत्रपती संभाजीराजे, आमदार सुनील तटकरे, जयंत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

वर्ष ६८ वे | अंक १ | जुलै २०१६

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन**

# लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक — मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- प्रबंध संपादक — देवेंद्र भुजबळ
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण — अश्विनी पुजारी
- साहाय्य — प्रज्ञा गायकवाड

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

# अंतरंग



**६**

### जल, जमीन आणि जंगल संवर्धन

पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी महा वृक्षलागवडीचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम शासनाने राबवला. या कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात १ जुलै रोजी राज्यात २ कोटी ८१ लाख झाडे लावण्यात आली.

### जगातील वाघ



जागतिक व्याघ्रदिन २९ जुलै

अनेकांना असे वाटते की, वाघ म्हणजे केवळ एकच प्रजाती आणि ती फक्त आपल्या भारतातच आढळते. भारतात वाघाची एकच प्रजाती आढळते. या प्रजातीला आपण भारतीय वाघ किंवा रॉयल बेंगॉल टायगर म्हणतो. जगात वाघांच्या तब्बल ९ प्रजाती आहेत. व्याघ्र दिनानिमित्त वाघांच्या प्रजातीबद्दलचा आढावा.. **१६**

### आधुनिक शेती, अधिक उन्नती

महाराष्ट्राची शेती, महाराष्ट्रातील शेतकरी, पाऊस आणि बदललेली हवामानाची स्थिती, आधुनिक तंत्रज्ञान, शेतीतील विविध प्रयोग, संशोधन या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात नुकत्याच पार पडलेल्या ४४व्या संयुक्त कृषी संशोधन परिषदेत मूलभूत चिंतन केले.



**१८**

### शिवार भरू लागले...



**२४**

मराठवाड्यात पूर्व मोसमी पावसात जलयुक्तचे यश दिसत आहे, ही बाब उल्लेखनीय आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार चालू पावसाळा जर मराठवाड्याच्या पदरात चांगले माप टाकून गेला तर जलयुक्त शिवाराच्या विविध कामांमध्ये चांगले पाणी साठेल आणि या विभागाचा चेहरामोहरा बदलून जाईल.

### विशेष लेख



**४०** नागरी सेवा परीक्षेत पहिल्या आलेल्या टीना डाबी.

प्रेरणा



'स्वॉर्ड ऑफ ऑनर'च्या पहिल्या महिला मानकरी ठरलेल्या मीना तुपे. **४२**

भ्रमंती

**पाऊस अनुभवावा सह्याद्रीच्या कुशीत** **४६**

निरामय

**४८** **भिजण्याचा आनंद आणि आरोग्याची काळजी**

- महाराष्ट्रात योग फेस्टिव्हल
- आंतरराष्ट्रीय योग दिवस
- व्हा योग गुरू...

**५३-५७**

योग दिवस स्पेशल

## शुभ वर्तमानाची वर्दी

मान्सूनच्या शुभ वर्तमानाची वर्दी देणारा लोकराज्यचा जून महिन्याचा अंक शासनाची तत्परता दाखवणारा आहे. शासनाने केलेली खरीप हंगामाची तयारी व दोन कोटी वृक्षलागवडीचे नियोजन शेतकऱ्यांना आश्वस्त करणारे आहे. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जलव्यवस्थापनाविषयी माहिती देणारा लेख वाचनीय आहे. दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने घेतलेले विविध निर्णय, डिजिटल ग्राम, शेतकऱ्याची यशकथा, केंद्र शासनाच्या 'बेटी बचाओ बेटी पढाओ' योजनेवरील लेख माहितीपूर्ण आहे. त्याचबरोबर स्वच्छ महाराष्ट्र अभियानातील यशकथा, विशेष वृत्त, संस्कृती, प्रेरणा, निरामय ही सदरे अत्यंत वाचनीय आहेत.

**– रमेश पाटील, केंद्रप्रमुख पं.स.चिखली, जि. बुलढाणा**

## वाचनीय


मार्च २०१६ चा लोकराज्य अंक आवडला. मेक इन इंडियात झळकला महाराष्ट्र, पर्यटनाचे दीपगृह, निर्धार स्वच्छतेचा, सुंदर महाराष्ट्राचा, प्रबोधनातून व्यसनमुक्तीकडे, आपले वन आपला अभिमान, घर सुखाचे घर आनंदाचे हे लेख याशिवाय भ्रमंती, संस्कृती, निरामय ही सदरे वाचनीय आहेत. महाराष्ट्र जगाची फॅक्टरी कशी बनत आहे हे मुख्यमंत्र्यांच्या मुलाखतीतून वाचायला मिळाले याचा आनंद वाटला.

**– राम शेळके, राधिकानगर, तरोड, नांदेड**

## ज्ञानात भर

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त प्रकाशित केलेला लोकराज्यचा एप्रिल महिन्याचा विशेषांक ज्ञानात भर टाकणारा आहे. या अंकातून डॉ. बाबासाहेबांचे विविध पैलू ज्ञात झाले.

**– माणिक खैरनार, देवळाई रोड, औरंगाबाद**







## संग्राह्य

लोकराज्यचा मे महिन्याचा अंक मिळाला. अंक वाचनीय असून संग्राह्य आहे. तसेच त्यातील सदरे नेहमीप्रमाणे उत्तम आहेत. अंकाचा विषय महत्त्वाचा आहे. आपल्या पुढील अंकासाठी माझ्या शुभेच्छा!

**– डॉ. गिरीश गांधी**

## सच्चे अभिवादन

एप्रिल, २०१६ चा अंक संग्रही ठेवण्यासारखा आहे. थोडक्यात पण संपूर्ण बाबासाहेब या अंकात सामावलेले आहेत. संगीत, कामगार व महिलाविषयक धोरण, जलसंधारण, लोकसंख्या, संविधान निर्मिती व राष्ट्रप्रेम, सामाजिक समता आदींविषयी त्यांचे विविध पैलू या अंकात आहेत.

**– लव परमानंद जनबंधु, नगराध्यक्ष, भिवापूर**

## करू वृक्षारोपण

मी लोकराज्यचा नियमित वाचक आहे. या मासिकातून आम्हा शेतकऱ्यांना उपयुक्त माहिती मिळते. मे-२०१६ महिन्याच्या अंकात शेतीबाबत अधिक उपयुक्त माहिती मिळाली. यात शासनाने प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावण्याचे आवाहन केले आहे. कोरडवाहू, पावसाच्या पाण्यावर येणारी फळझाडे लावल्यास उपयुक्त होईल.

**– माधवराव पाटील, पिंपळगाव हरेश्वर**

## माहितीचा स्रोत

लोकराज्य मासिक हे माहितीचा स्रोत आहे. नवी उमेद, प्रेरणा देणारे आहे. मे २०१६चा अंक मला खूप आवडला. या मासिकामधून शासनाच्या विविध योजना, निर्णय, अंमलबजावणी, मुलाखती तसेच महाराष्ट्राची ओळख होते. देशात महाराष्ट्र अग्रेसर आहे. याचे वास्तविक चित्रण मासिकातून स्पष्ट होते. सामान्य वाचक, अभ्यासक तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी यांना सखोल ज्ञान अत्यंत अल्प दरात लोकराज्य मासिकातून मिळते.

**– राजाराम इंगोले, जयपूर, जि. वाशिम**

## प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रियांचे स्वागत आहे.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२**

## वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. आपला संपूर्ण निवासी पत्ता सुवाच्य अक्षरात पीनकोडसह असावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाइन भरण्यासाठी** http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

2 कोटी वृक्षलागवड

# वृक्ष आपले सांगाती...

वृक्ष हे मानवासाठी अत्यंत उपयुक्त असूनही मानवाने अनेक वर्षांपासून वृक्षांची अपरिमित तोड केली. यामुळे निसर्गाचे संतुलन बिघडले. पर्जन्यमानावर परिणाम झाला. प्रदूषण वाढले. मानवाच्या अस्तित्वास धोका निर्माण झाला. अशा संकटांना मानवाने आपल्या अविचाराने दारात आणून सोडले आहे. या संकटाची तीव्रता कमी व्हावी यासाठी महाराष्ट्र शासनाने महावृक्षलागवडीचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम १ जुलै २०१६ रोजी राबवला आहे.

हा केवळ शासनाचा कार्यक्रम न राहता यात सर्व थरातील नागरिक उत्साहाने सामील झाले, ही अतिशय आनंदाची बाब ठरली. आता सर्वांची जबाबदारी वाढली असून लावलेल्या वृक्षांचे संगोपन आणि संवर्धन करणेही आवश्यक आहे. लावलेला प्रत्येक वृक्ष जगला पाहिजे, याचा संकल्प आपण करणे अत्यंत गरजचे ठरते. आपण सर्वांनी वृक्षसंगोपनाचा केलेला संकल्प महाराष्ट्राला हरित आणि समृद्ध करण्यासाठी उत्तुंग अशी झेप ठरू शकतो.

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या विविध भागात चांगला पाऊस पडत आहे. यामुळे चैतन्यदायी वातावरण निर्माण झाले आहे. सामान्य जनता ते शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू परत आले आहे. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी जलयुक्त शिवाराच्या कामांवर प्राधान्याने लक्ष केंद्रित केले आहे. त्याचे चांगले दृष्य परिणाम या प्रारंभीच्या पावसामुळेच दिसून येत आहेत. उपलब्ध माहितीनुसार विविध जलयुक्त प्रकल्पांमध्ये चांगला जलसाठा झाला आहे.

संघ लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या नागरी सेवा परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या टीना डाबी आणि नाशिक येथील पोलीस उपनिरीक्षक प्रशिक्षणात 'स्वॉर्ड ऑफ ऑनर'ने सन्मानित झालेल्या मीना तुपे यांची मुलाखत; लोकराज्यच्या तरुण वाचकांना निश्चितच मोठे यश मिळवण्यासाठी प्रेरणा देईल, याची खात्री वाटते.

आपले आवडते लोकराज्य या महिन्यापासून ६८ व्या वर्षात पदार्पण करत आहे. नुकतेच ऑडिट ब्युरो ऑफ सर्क्युलेशनने लोकराज्यचा खप दरमहा ३ लाख ८८ हजार प्रती असल्याचे जाहीर करून, लोकराज्य हे महाराष्ट्रातील पहिल्या क्रमांकाचे आणि देशातील तिसऱ्या क्रमांकाचे मासिक असण्यावर शिक्कामोर्तब केले आहे. लोकराज्यला हे यश आपल्यामुळेच मिळू शकले. यापुढेही लोकराज्य अधिक आकर्षक आणि विविध उपयुक्त माहितीने परिपूर्ण असे प्रकाशित करण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. आमचे सर्व वाचक, लेखक, वर्गणीदार, ग्राहक, वितरक आणि चाहते यांचे यानिमित्त मन:पूर्वक आभार.



**ब्रिजेश सिंह**
**(मुख्य संपादक)**




वृक्षलागवड कार्यक्रमात राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय पर्यावरण व वन मंत्री प्रकाश जावडेकर, वन मंत्री सुधीर मुनगंटीवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ. दीपक सावंत, महापौर स्नेहल आंबेकर, मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, जलतज्ज्ञ राजेंद्र सिंग, अभिनेते विवेक ओबेरॉय आदी मान्यवर उपस्थित होते.

# जल, जमीन आणि जंगलाचे संवर्धन

**पर्यावरणाच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी महा वृक्षलागवडीचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राज्य शासन राबवत आहे. या कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात १ जुलै रोजी राज्यात २ कोटी ८१ लाख ३८ हजार ६३४ झाडे लावण्यात आली. हा कार्यक्रम एक प्रभावी लोकचळवळ व्हावा यासाठी शासनाने सूक्ष्म आणि व्यापक नियोजन केले होते. राज्याचे हरित आच्छादन सध्या फक्त २० टक्के इतके आहे. शास्त्रीयदृष्ट्या ते ३३ टक्के इतके करण्यासाठी पुढील आव्हान किती मोठे आहे, याची कल्पना यावी. हे लक्षात घेऊन वनिकरणाच्या पुढील कार्यक्रमात उद्दिष्ट वाढते असणार आहे. पुढील ३-४ वर्षात ४० ते ५० कोटी वृक्ष लागवडीचे सरकारचे नियोजन आहे.**

**देवेंद्र फडणवीस**
**मुख्यमंत्री**

पर्यावरणाचा प्रश्न कधी नव्हे इतका संवेदनशील झाला असून सध्या जागतिक पातळीवर तो अग्रक्रमाने चर्चिला जात आहे. अनेक व्यासपीठांवरून त्याबाबत अतिशय गांभीर्याने विचारमंथन होत असून भविष्यातील सुरक्षित, संतुलित आणि संवर्धित पर्यावरणासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत निर्णायक वेळ येऊन ठेपली आहे. जागतिकस्तरावर तापमानवाढीच्या वाढत्या संकटाचे चटके सर्वांनाच भेडसावत आहेत. निसर्गातील मानवाच्या वाढत्या

आणि चुकीच्या हस्तक्षेपाचे परिणाम अत्यंत भीषण स्वरूपात भेडसावण्याची चिन्हे आताच दिसू लागली आहेत. अनेक समस्या प्रकर्षाने जाणवत आहेत आणि अनेकांना त्याचे चटके बसायला सुरुवात झाली आहे.

महाराष्ट्रात गेले काही दिवस आपण दुष्काळी परिस्थितीचा नेटाने मुकाबला करीत आहोत. पाच वर्षांत चार दुष्काळ आपल्याला पाहावे लागत आहेत. या दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. दुष्काळ हा पर्यावरणातील असंतुलनाचाच एक दृश्य स्वरूपातील परिणाम आहे. याशिवाय समाजजीवनही बाधित होऊन विकासावर प्रतिकूल परिणाम होत असतो. त्यामुळे याबाबतीत उपाययोजना करताना पर्यावरण संवर्धनाचा शाश्वत विचार करून दीर्घकालीन लाभाची कृती करावी लागणार आहे. या दृष्टीने छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यात राबवलेले प्रयोग आजही मार्गदर्शक आहेत. महाराज उत्तम पर्यावरणतज्ज्ञ होते. त्यांनी त्या काळात वनांचे संवर्धन, पर्यावरणाचे संतुलन यांचे महत्त्व सांगितले होते.

जल, जमीन आणि जंगल या तिन्ही घटकांचे आरोग्य सध्या बिघडले आहे. या तिन्ही घटकांचा परस्परांशी अतिशय निकटचा संबंध आहे. त्यामुळे याबाबत नियोजन करताना या घटकांचा एकत्रित विचार करून संवर्धनासाठी कृती करावी लागेल. त्यांचे संवर्धन योग्य पद्धतीने झाले नाही तर त्याचा थेट परिणाम जीवसृष्टीवर होणे अपरिहार्य आहे. या दृष्टीने आम्ही त्याबाबत व्यापक नियोजन केले आहे. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी महाराष्ट्रासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकणारा वैज्ञानिक पर्यावरणपूरक आराखडा लवकरच तयार करण्यात येणार असून अनेक वर्षांपर्यंत हा आराखडा मार्गदर्शक आणि पथदर्शी ठरेल.

**2 कोटी वृक्षलागवड**

जल म्हणजे जीवन हे खऱ्या अर्थाने सजीव सृष्टीचा मूलमंत्र आहे. हे लक्षात घेऊन राज्यातील जलसंवर्धनाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आम्ही जलयुक्त शिवाराच्या माध्यमातून राबवत आहोत. गावागावातील शिवारे पहिल्या टप्प्यात जलयुक्त करणे महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात एकूण ११ हजाराहून अधिक गावे जलयुक्त करण्यात येत आहेत. या अभियानाच्या यशस्वीतेवर पुढील अनेक उपाययोजनांचे यश अवलंबून आहे. शाश्वत शेती विकासासोबतच पर्यावरण, संवर्धन हे महत्त्वाचे उद्दिष्ट त्यातून साधले जाणार आहे.

पाण्यासोबतच जमीन हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्याचे संधारण करण्याचा काटेकोर प्रयत्न सध्या केला जात आहे. पाण्यासोबतच मातीही अडवणे गरजेचे आहे. त्यासाठी समृद्ध वनराजी राज्यात निर्माण होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने शासनाने वृक्षारोपणाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. या कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात १ जुलै रोजी राज्यात दोन कोटी झाडे लावण्यात राज्य शासनाला यश आले. हा कार्यक्रम एक प्रभावी लोकचळवळ व्हावी, यासाठी शासनाने अतिशय सूक्ष्म आणि व्यापक नियोजन केले. आजवर वृक्षारोपणाचे उत्सवी कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर झाले. मात्र, हा उत्साह लावलेली झाडे वाढवण्यापर्यंत टिकला नाही. त्यामुळे त्यातून प्रसिद्धीशिवाय फारसे काही निष्पन्न झाले नाही. यापूर्वीच्या सर्व दोषांचा विचार करून ते टाळण्याचा प्रयत्न आम्ही या अभियानात पुरेपूर केला आहे. नव्या तंत्रज्ञानाची मदत घेऊन वृक्षारोपणासोबतच वृक्ष संवर्धनावर भर दिला आहे. थोडक्यात सांगायचे तर जलयुक्त शिवारला वनयुक्त शिवारची जोड देणे आवश्यक आहे. जागतिक पातळीवर वाढलेल्या कार्बन फूटप्रिंटचे प्रमाण कमी करण्यासाठी वनीकरण हा सर्वात प्रभावी उपाय आहे. आपण ज्या प्रमाणात कार्बन फूटप्रिंट तयार करतो, त्याचे प्रमाण प्रत्येकाने कमी केले तरी पर्यावरणाचे संवर्धन केल्याचा मोठा आनंद आपल्याला मिळेल. त्यासाठी वनीकरण हे जनआंदोलन व्हावे.



राज्याचे हरित आच्छादन ३३ टक्के इतके करण्यासाठी पुढील ३-४ वर्षात ४० ते ५० कोटी वृक्षलागवडीचे सरकारचे नियोजन आहे. त्यातील अधिकाधिक वृक्ष जगावेत, यासाठी लोकांमध्येच याबाबतच्या जाणिवा वाढीस लागल्या पाहिजेत. त्यादृष्टीने १ जुलै रोजी नागरिकांच्या मनामनातही पर्यावरणाबाबतच्या जाणिवांचे बिजारोपण केले. त्यात यशही आले. संपूर्ण राज्यातील जनतेने ज्या पद्धतीने जलयुक्त शिवारला लोकचळवळ म्हणून, आपले काम समजून ते हाती घेतले, तसेच पर्यावरण संवर्धनाची ही मोहीम सुद्धा लोकांनी त्याचपद्धतीने स्वत:ची समजून स्वीकारली याचा आनंद आहे.

**शब्दांकन : हेमराज बागूल**

**(मा. मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी)**

विशेष मुलाखत

# दोन कोटी वृक्षलागवड

## इव्हेंट नव्हे मिशन



वृक्षारोपण करताना ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा आणि राज्यपाल सी. विद्यासागर राव

**वनमहोत्सवाचे औचित्य साधून १ जुलै २०१६ रोजी राज्यात २ कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम यशस्वी करण्यात आला. हा केवळ शासकीय कार्यक्रम आहे, असे मानू नये तर त्यावर मिशनमोड स्वरूपात काम करावे, असे आवाहन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले होते. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांनी या मिशनवर ते करत असलेले काम लिहून स्वत:चे वर्कबूक तयार करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या होत्या. हे वर्कबूक ते स्वत: तपासणार आहेत. अतिशय यशस्वी झालेल्या या वृक्षलागवड मोहिमेच्या अनुषंगाने घेतलेली वनमंत्र्यांची विशेष मुलाखत.**

डॉ. सुरेखा म. मुळे

**वृक्ष लागवड एक मिशन.. एक ध्येय उराशी बाळगून आपण हा कार्यक्रम राबवला. याबद्दल काय सांगाल?**

वन विभाग आणि स्वत: मी या संकल्पावर मिशनमोड स्वरूपात काम केले. राज्यात दोन कोटी वृक्ष लागवड हा हरित महाराष्ट्राच्या निर्मितीचा संकल्प केला. राज्यातील वनाच्छादन ३३ टक्के एवढे वाढविण्यासाठी वन विभागाने पुढाकार घेऊन, उचललेले हे एक महत्त्वाकांक्षी पाऊल म्हणावे लागेल. त्यामुळे हा संकल्प केवळ शासकीय उपक्रम किंवा कार्यक्रम राहू नये यासाठी सर्व प्रकारची दक्षता मी घेतली. वृक्ष लागवड एक लोकचळवळ व्हावी हा माझा प्रयत्न यशस्वी झाला. कारण वृक्ष आणि पाणी, वन आणि पाऊस यांचा जवळचा संबंध आहे.

जिथे वनाच्छादन जास्त आहे तिथे पडणाऱ्या पावसाचे प्रमाण अधिक आहे. मग तो गडचिरोलीसारखा जिल्हा असेल किंवा इकडे सिंधुदुर्गसारखा जिल्हा. तिथे वनाच्छादन जास्त आहे, म्हणून पाऊस आहे. तर मराठवाड्यात वनक्षेत्र कमी असल्याने तिथे रेल्वेच्या माध्यमातून पाणी पोहोचवावे लागत आहे. लातूरमध्ये तर .०७ टक्के वनक्षेत्र आहे. त्यामुळे तिथे पाणी टंचाईच्या झळा अधिक आहेत. त्यामुळे लोकांनाही आता वृक्ष लागवडीचे महत्त्व लक्षात येऊ लागले आहे. राज्यात वृक्ष लागवडीसाठी, जमिनीत पाणी मुरवण्यासाठी खूप सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. याचा लाभ वन विभाग राबवत असलेल्या दोन कोटी वृक्ष लागवडीला झाल्याने उद्दिष्टपूर्ती झाली.

वन विभागाशिवाय या कामात शासनाचे इतर २२ विभागही सहभागी झाले. त्या प्रत्येक विभागांनी किती आणि कोणती झाडे लावायची याचा सुनियोजित आराखडा तयार केला होता. कोणत्या भागात कोणती झाडे लावायची याचे नियोजन आधीच झाले. यात स्वत: वन विभागाने दीड कोटी झाडे लावली आहेत. उर्वरित ५० लाख रोप लागवडीचे उद्दिष्ट हे इतर २२ विभाग, स्वंयसेवी संस्था, संघटना, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर सहभागीदारांनी पूर्ण केले आहे.

रोपांसाठी लागणारे खड्डे १ जुलैपूर्वीच खोदून झाले होते. त्याचबरोबर लावलेली रोपटी जगवण्याच्या दृष्टीने जुलै महिन्यात पुरेसा पाऊस न झाल्यास रोपे जगवण्यासाठी पाणी पुरवठ्याचे धोरण निश्चित करण्यात आले. एक हजार रोपांमागे एक व्यक्ती या वृक्षांच्या देखरेखीसाठी आणि संवर्धनासाठी नियुक्त केली आहे. त्यामुळे रोप जगण्याचे प्रमाण नक्कीच वाढेल. साधारणत: १०० टक्के वृक्षलागवडीमध्ये वृक्ष जगण्याचे सरासरी प्रमाण हे ७०

- **श्री. श्री. रविशंकर यांच्या आर्ट ऑफ लिव्हिंगचे स्वयंसेवकांकडून वृक्षलागवडीसाठी साहाय्य.**
- **केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांचे राज्यातील रेल्वे जमिनीवर वृक्षलागवडीचे निर्देश.**
- **केंद्रीय सार्वजनिक बांधकाम मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून राज्यातील राष्ट्रीय महामार्गावर वृक्ष लागवड.**

टक्क्यांच्या आसपास असते ते वाढावे यासाठीही मी विभागाला निर्देश दिले आहेत.

### या कार्यक्रमाचे यशस्वी संनियंत्रण कसे केले?

यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आणि राज्यस्तरावर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमासाठी तालुका समन्वय अधिकारी नियुक्त केला. मी सर्व जिल्ह्याचे मुख्य वनसंरक्षक, तालुका वनसंरक्षक आणि सर्व वनाधिकाऱ्यांची बैठक घेतली. तिथे मी या सर्व कामांचा आढावा घेतला. कामासाठी नियुक्त केलेल्या सर्व तालुका समन्वय अधिकाऱ्यांशी थेट व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे बोललो.

### तुम्ही या कामावर व्यक्तिश: लक्ष ठेऊन होता?

हो. दोन कोटी वृक्षलागवड हा काही इव्हेंट नव्हता, हे मिशन होते. जे अधिकारी उत्तम काम करतील त्या अधिकाऱ्यांसोबत मी नेहमी असेल पण जे अधिकारी केवळ काम केल्याचे दाखवतील परंतु काम करणार नाहीत त्याचीही मी गंभीर नोंद घेईल, असेही मी त्यांना सांगितले होते. या कार्यक्रमात झाडे लावण्याची स्थळनिश्चिती, रोपांची उपलब्धता, खड्डे, रोपांची वाहतूक, मनुष्यबळाची उपलब्धता, रोपांना जगवणारे पाणी या सर्व कामांवर माझे व्यक्तिश: लक्ष होते. यात करत असलेल्या सर्व कामांची माहिती स्थळ, छायाचित्र आणि रोप लावण्यासाठी केलेल्या खड्ड्यांच्या अक्षांशरेखांशासह ऑनलाइन स्वरूपात वन विभागाने तयार केलेल्या आज्ञावलीत माहिती भरली गेली. भरलेल्या माहितीची माझ्याकडून तपासणी केली जाणार असल्याने आज्ञावलीत भरलेली माहिती ही प्रत्यक्षात दिसली पाहिजे, याची प्रत्येकाने काळजी घेतली असावी, अशी अपेक्षा आहे.

कार्यक्रमापूर्वी येणाऱ्या सर्व अडचणी समजून घेऊन मी त्या सोडवायला उपलब्ध होतो. परंतु १ जुलैनंतर मी कोणतेही कारण ऐकून घेणार नाही, हे आधीच स्पष्ट केले होते. अधिकारी मग तो कुठल्याही विभागाचा असो जर त्याने या कामात चालढकल केली तर त्यावर कारवाई केली जाईल, अशा सक्त सूचना मी दिल्या होत्या.

### 'सेल्फी विथ ट्री'सारखी नावीन्यपूर्ण कल्पना आपण राबवली. याबद्दल काय सांगाल?

**राज्यात दोन कोटी वृक्षलागवडीचा कार्यक्रम यशस्वी करण्याच्या अनुषंगाने जाणिवजागृतीसाठी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले. यात शाळेत 'पहिले पाऊल झाड लावून किंवा वृक्ष दिंडी, प्रभात फेरी किंवा पथनाट्ये यांसारख्या बाबींचा समावेश होता. जनजागृतीचे आणि लोकसहभागाचे काम उत्तमपद्धतीने करणाऱ्या लोकांना – अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम मी केले.**

**याचाच एक भाग म्हणून 'सेल्फी विथ ट्री'ची कल्पना आम्ही राबवली. यामध्ये लावलेल्या वृक्षासोबत आपला स्वत:चा फोटो म्हणजे सेल्फी वन विभागाच्या संकेतस्थळावर अपलोड करावयाचा होता. याचा लकी ड्रॉ काढला जाईल. या ड्रॉमध्ये जे लोक निवडले जातील त्यांना राज्यातील सहा व्याघ्रप्रकल्पात प्रवेश शुल्क न भरता वन पर्यटनाचा आनंद घेता येईल. चांगले काम करणाऱ्या अधिकारी–कर्मचारी आणि सहभागी व्यक्ती–संस्थांना जागतिक व्याघ्र दिनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने सन्मानित करण्यात येईल. त्यामुळे आमचे 'एकच लक्ष्य दोन कोटी वृक्ष' हा संकल्प यशस्वीरीत्या पूर्णत्वाला आला, याचा मला आनंद आहे.**



### लोकसहभाग मिळवण्यासाठी कशाप्रकारे पावले उचलण्यात आली?

हा महाराष्ट्राला संपन्न करणारा, दुष्काळ हटवण्यास मदत करणारा कार्यक्रम आहे. हे एक ईश्वरीय कार्य आहे. त्यामुळे ते झालेच पाहिजे. हा राज्याच्या हिताचा संकल्प असल्याने लोकांनीही यात सहभागी व्हावे, अशी आमची इच्छा आणि प्रयत्न होते. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

लोकांपर्यंत जाऊन, लोकांमध्ये मिसळून या कार्यक्रमाची माहिती अधिकाऱ्यांनी द्यावी, अशा सूचना मी दिल्या होत्या. जिल्ह्यातील शाळा – महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, मान्यवर व्यक्ती, रोटरी लायन्स क्लब, संरक्षण दलाचे अधिकारी, उद्योजक यांच्या भेटी घेऊन, कार्यक्रमास व्यापक प्रसिद्धी देऊन जनजागृती केली गेली. रांगोळी स्पर्धा, प्रभात फेऱ्या, सेल्फी विथ ट्री, वृक्ष दिंडी, पथनाट्ये, चित्ररथ सारख्या नावीन्यपूर्ण कल्पना राबवाव्यात, शाळांमधून 'वृक्ष लावणार–वृक्ष जगवणार' असा संकल्प करणारी, शपथ घेण्यात आली.

**(लेखिका या विभागीय संपर्क अधिकारी आहेत.)**

# वृक्ष लागवडीसाठी जाणीव जागृती महत्त्वाची

**गडचिरोली जिल्ह्यात एकूण क्षेत्रफळाच्या ७७ टक्के वनक्षेत्र आहे. त्यामुळे तिथे कधीही पाणीटंचाई किंवा दुष्काळ दिसणार नाही. पण मराठवाड्यात आठही जिल्ह्यात १ ते ४ टक्क्यांपर्यंत वनक्षेत्र आहे. लातूरमध्ये हे प्रमाण .०७ टक्के इतके आहे. म्हणजेच वनांचा आणि पावसाचा थेट संबंध आहे. वैश्विक तापमान, दुष्काळ, पाणीटंचाई यावर एक महत्त्वाचा उपाय म्हणजे मोठ्या प्रमाणात झाडे लावणे हा आहे. लोकांमध्ये वृक्षलागवडीची जाणीव निर्माण झाली आहे. लोक स्वत:हून यासाठी पुढे येत आहेत. त्यामुळे १ जुलै २०१६ रोजी २ कोटी वृक्षलागवडीचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवला गेला.**







महाराष्ट्रात नोंदणी झालेले वनक्षेत्र २० टक्क्यांच्या आसपास आहे. पण ही टक्केवारी पुरेसी नाही. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी राज्य आणि राष्ट्रीय वन नीतीनुसार राज्यात ३३ टक्के वृक्षाच्छादन असणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्वांचा सहभाग यात असणे आवश्यक आहे.

वनक्षेत्र म्हटले की त्यात वन्यजीव आलेच. हा वनांचा अविभाज्य भाग आहे. ही जैविक साखळी आहे. राज्यात सहा राष्ट्रीय उद्याने, ४८ अभयारण्ये, ४ संवर्धन राखीव आणि ६ व्याघ्र प्रकल्प आहेत. महाराष्ट्रातील जैवविविधतेमध्ये जंगल, झाडांच्या विविध प्रजाती, वन्यजीवांचे अस्तित्त्व, इतर दुर्मीळ प्रजातींचे वृक्ष आहेत. महाराष्ट्र हे जैवविविधता संपन्न असे राज्य आहे. सह्याद्री जैवविविधतेचे भांडार आहे. अशा जैवविविधतेने संपन्न असलेल्या महाराष्ट्राचे आपल्याला संवर्धन करावयाचे आहे, या संपदेत वाढ करावयाची आहे. पण हे केवळ एकट्या वन विभागाचे किंवा शासनाचे काम नाही, यात सर्वांचा सहभाग, स्थानिकांचा सहभाग आवश्यक आहे.

## पहिला घाव वृक्षांवर...

पर्यावरण आणि वन एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. पण विकास म्हटले की, पहिला घाव वृक्षांवर घातला जातो. अशा वेळी पर्यावरणस्नेही विकास कसा करता येईल. रस्ते, जलसिंचनाचे विजेचे प्रकल्प यासाठी आपल्याला जमीन द्यावी लागते. त्यात वनजमिनीचा समावेश असतो. तेथील झाडे कापावी लागतात. यासाठी केंद्र सरकारने १९८० मध्ये वनसंवर्धनाचा कायदा केला आहे. त्याची अंमलबजावणी राज्यात व्यवस्थित केली जात आहे. एखाद्या प्रकल्पात वनजमीन जात असेल, तर तेवढीच जागा प्रकल्प राबवणाऱ्या यंत्रणेने वन विभागाला उपलब्ध करून देणे; यात बंधनकारक करण्यात आले आहे. शिवाय जितकी झाड कापली जाणार आहेत, त्याच्या दुप्पट झाडे लावण्याचे बंधन त्यांच्यावर आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीची फार बारकाईने

**विकास खारगे**
(सचिव, वने)

पाहणी केली जाते. या कायद्यात असेही म्हटले आहे की, अगदीच नाईलाज झाला तर झाडे कापावीत अन्यथा नाही.

### महा वृक्षलागवड

वन आणि पाऊस याचा संबंध आता लोकांच्या लक्षात येऊ लागला आहे. दुष्काळाच्या झळा त्यांच्यापर्यंत पोहोचल्या आहेत. त्यामुळे लोकांमध्ये वृक्षलागवडीची जाणीव निर्माण झाली असून त्यांनी या कामात आपणहून पुढाकार घेतला. १ जुलै २०१६ रोजी राज्यात एकाच दिवशी २ कोटी ८१ लाख ३८ हजार ६३४ वृक्षलागवड केली गेली. यात वन विभागाने पुढाकार घेऊन दीड कोटीपेक्षा जास्त वृक्ष लावली. उर्वरित ५० लाख झाडे ही शासनाचे विविध विभाग, स्वयंसेवी, सामाजिक संघटना, शाळा-महाविद्यालये, उद्योगसमूह, सहकारी संस्था, साखरकारखाने, सूतगिरण्या, दूधसंघ, स्थानिक स्वराज्य संस्था हे सगळे मिळून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या जागांचा शोध घेऊन त्यांनी ही वृक्षलागवड केली. यासाठी आधीच जागा शोधून खड्डे खोदले गेले. लोकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळला.

या कार्यक्रमाचे नियंत्रण मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने केले. जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांनी या कामावर नियंत्रण ठेवले. आपल्याला नुसती झाडं लावायची नव्हती तर ती जगवायचीदेखील असल्याने त्या दृष्टीने विभागाने काम केले.

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील रानमळा या ग्रामपंचायतीमध्ये लग्न असो की, गावात कोणाच्याही घरी जन्माला येणाऱ्या बाळाचा दिवस, त्या दिवशी ग्रामपंचायतीमार्फत संबंधितांना एक झाड दिले जाते. यामुळे लग्नाची वर्षे आणि झाडांची वर्षे याचा आपसूक जिव्हाळ्याचा संबंध प्रस्थापित होतो. लोक झाडे जगवतात. एक भावनिक ऋणानुबंध यातून निर्माण होताना दिसतो.

### लोकांचा सहभाग

वृक्षलागवडीच्या या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी स्थानिक लोकांचा सहभाग घेतला गेला. राज्यात साडेबारा हजारांहून अधिक संयुक्त वनव्यवस्थापन समित्या आहेत. त्यांचा उपयोग या कामी झाला. राज्यात ६ वन प्रशिक्षण संस्था आहेत, अकादमी आहेत. एक कुंडल येथे तर दुसरी चंद्रपूर येथे. शिवाय चार प्रशिक्षण केंद्रे आहेत. तिथे यासाठी नियोजनपूर्वक प्रशिक्षण सुरू होते.

वृक्षलागवडीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरण्यात आले. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांच्या अध्यक्षतेखाली विभागात आय.टी सेल निर्माण केला. वन आणि वन्यजीव संरक्षण आणि संवर्धनासाठी याचा उपयोग केला जातो. वृक्षलागवडीच्या कामात त्याचा उपयोग करून घेतला. जी रोपे लावली जाणार होती त्याचे खड्डे, जागा, त्याच्या अक्षांशरेखांशासह संकेतस्थळावर टाकला. कुठे किती आणि कोणत्या आकाराचे खड्डे खोदून झाले आणि किती काम बाकी आहे, याची संपूर्ण माहिती विभागाकडे तयार होती.




### हरित पंढरपूर

हरित पंढरपूर संकल्पनेची घोषणा वित्त आणि वनमंत्री यांनी राज्य अर्थसंकल्पात केली होती. नुकतीच मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पंढरपूरमध्ये नमामी चंद्रभागा परिषद झाली. चंद्रभागेची स्वच्छता करताना तिच्या एका तिरावर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दुसरा निर्णय आहे तो तुळशी वृंदावन उभारण्याचा. तुळशीचे महत्त्व वारकरी आणि पंढरपूरच्या विठ्ठलासाठी फार मोठे आहे. वारकऱ्यांच्या मनात तुळशीविषयी असलेले पावित्र्य लक्षात घेऊन येथे तुळशी वृंदावन उभारले जातील. जगभरात तुळशीच्या ६४ प्रजाती आढळतात. आपल्या भारतात ८ प्रकारच्या तुळशी प्रजाती आहेत. या आठही तुळशी प्रजातींची तिथे लागवड केली जाईल.

वारकऱ्यांना लागणारी तुळस मोठ्या प्रमाणात पंढरपूर येथे बाहेरून आणली जाते. मग तिच्या माळा केल्या जातात. स्थानिकांची मदत घेऊन पंढरपूरमधील वन विभागाच्या २० एकर जागेमध्ये तुळशीची लागवड करण्याचे वनविभागाने ठरवले आहे. त्यातून स्थानिकांना रोजगार आणि वारकऱ्यांना ताजी सुंदर तुळसमाळ मिळेल. हरित पंढरपूरची योजना पंढरपूर नगरपालिकेकडून राबवली जात आहे. रस्त्याच्या दुतर्फा वृक्षलागवडीबरोबर, मठ, धर्मशाळा अशा ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली जाणार आहे. वृक्षलागवड ही काही औपचारिकता नाही. तो सर्वांच्या जगण्याचा अविभाज्य भाग आहे, सुरक्षित पर्यावरणासाठी झाडे लावणे आणि ती जगवणे अत्यावश्यक आहे. ही जाणीव ठेवूनच राज्यातील जनतेने १ जुलै रोजी या कार्यक्रमात सहभागी होऊन किमान एक वृक्ष लावून तो जगवण्याचा संकल्प केला.

## ही झाडे लावली...

**वृक्षलागवडीसाठी स्थानिक प्रजातींना जास्त प्राधान्य दिले गेले. कारण तेथील हवामानानुसार ती झाडे वाढतात. त्यांचे जिवंत राहण्याच प्रमाण वाढते. त्याशिवाय आंबा, वड, पिंपळ, पेरू, जांभूळ, सीताफळ, रामफळ, चिंच, आवळा, काजू, अशी अनेक फळे-फुले व सावली देणाऱ्या झाडांचा समावेश आहे. वनौषधी वृक्षांचादेखील यात समावेश आहे. ही रोपटी शासकीय विभागांना आणि इतरांना सवलतीच्या दराने उपलब्ध करून दिली. यासाठी अनेक मोठ्या औद्योगिक घराण्यांनी प्रायोजकत्व दिले आहे. त्यामुळे रोपांसाठी पुरेसा निधी होता. रोपवाटिकेत आलेल्या माणसाला रिकाम्या हाताने पाठवले गेले नाही. त्याला रोप दिले गेले. वृक्षलागवडीसाठी तांत्रिक मार्गदर्शन केले. कुठले रोप कुठे लावायचे, खड्डा किती आकाराचा हवा, त्याची निगा कशी राखायची याचे मार्गदर्शन वन विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी केले.**

**ग्रामीण तसेच शहरी भागात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण झाले आहे. सर्व नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात वृक्षलागवड झाली. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रोपवाटिकांमधून रोपे उपलब्ध करून देण्यात आली. सिमेंटच्या जंगलात झाडांचे जंगल निर्माण करण्याच्या आणि जैवविविधता जपण्याच्या दृष्टीने टाकलेले हे यशस्वी पाउल म्हणावे लागेल.**

# संकल्प आणि सिद्धी

**१ जुलै २०१६ रोजी वृक्ष लागवडीच्या जागराने अवघा महाराष्ट्र दुमदुमला. २ कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प केलेल्या महाराष्ट्राने २ कोटी ८१ लाख ३८ हजार ६३४ झाडे लावून हा संकल्प महायशस्वी केला. लोक सहभागातून अशक्यप्राय गोष्टी साध्य होतात, ही बाब या महा वृक्षलागवडीच्या निमित्त पुन्हा एकदा सिद्ध झाली.**

महा वृक्षलागवडीच्या मोहिमेत लहान–थोर, शासकीय– निमशासकीय संस्था, शाळा– महाविद्यालये, सामाजिक–स्वयंसेवी संस्था, उद्योग–व्यापारी वर्ग, बिल्डर असोसिएशनचे पदाधिकारी, आध्यात्मिक गुरू, संस्थांचे प्रतिनिधी, दैनंदिन आयुष्यात ज्याचा संबंध सर्वसामान्य माणसांशी येतो ते रिक्षा–टॅक्सी–टेम्पो असोसिएशनचे पदाधिकारी, चित्रपट आणि टीव्ही क्षेत्रातील मान्यवर, राजकारणातील उत्तुंग व्यक्तिमत्त्वे उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

### १० लाख हरित सेना

मोकळ्या शासकीय किंवा खासगी जमीन, शेतीचा बांध, सार्वजनिक मालकीची जमीन यावर मी एक तरी झाड लावेन आणि पूर्ण क्षमतेनिशी ते जगवेन असा निर्धार करण्यात आला. एस.टी महामंडळ, वीज वितरण कंपन्या, रेल्वे मंत्रालय, संरक्षण मंत्रालय आणि केंद्रीय वन मंत्रालयाने राज्यातील त्यांच्या ताब्यात असलेल्या जागेवर मोठ्या प्रमाणात झाडे लावण्याचा निर्णय घेऊन, हरित महाराष्ट्राच्या वाटचालीत सहकार्याचा हात पुढे केला. राज्याच्या ८९ हजार शाळांमधून १० लाख हरित सेना तयार केली गेली.

हरित महाराष्ट्राची पालखी आपल्या खांद्याहून वाहून नेताना प्रत्येकाच्या मनात विलक्षण आनंदाची अनुभूती असल्यानेच या कामाला मिळणारा प्रतिसाद दिन प्रतिदिन वाढत गेला.

शाळा– महाविद्यालयांमधून वृक्षाचे महत्त्व सांगणाऱ्या रांगोळी, चित्रकला, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. प्रभात फेऱ्या काढण्यात आल्या. वृक्ष दिंडी काढून वृक्षलागवडीचे आणि वृक्षसंगोपनाचे महत्त्व सांगण्यात आले. कुणी चित्ररथ काढले, कुणी पथनाट्यातून ‘बोल जमूरे जिंदा रहेना है तो क्या करना है सिर्फ खाना खाना है की और कुछ करना है’ असा सवाल केला.

झाडांच्या अस्तित्वामुळे माणूस आहे. ज्या दिवशी झाडे किंवा वनसंपदा नसेल तेव्हा माणूसही नसेल असे सांगत जगण्यासाठी लागणाऱ्या प्राणवायूसाठी तरी झाडे लावा, असे आवाहन करण्यात आले.

### पहिले पाऊल

झाडे लावण्याची सुंदर कल्पना शाळांमधून राबवली गेली. प्रश्नमंजूषा झाल्या. एक झाड सावली, फळे, फुले, लाकूड, प्राणवायू देतात. मुले एकमेकांना सांगू लागली. कुणी वड झाला, कुणी पिंपळ झाला, कुणी सूर्यफूल झाले, कुणी आंबा झाले. झाडाचे रुपडे अंगी ल्यातांना ज्ञानात भर पडत गेली. वृक्षांचे महत्त्व कळू लागले आणि नव्या पिढीच्या मनात वृक्षारोपणाचे बीजरोपण सहज होऊ लागले.



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना महा वृक्षलागवड कार्यक्रमात सहभागी होण्याचे निमंत्रण देताना वनमंत्री सुधीर मुनगंटीवार.

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना वृक्षलागवडीच्या कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यासाठी गेलेल्या वनमंत्री श्री. मुनगंटीवार यांच्यासमोर प्रधानमंत्र्यांनी अगदी अनोखी कल्पना मांडली. ती म्हणजे वर्षातून दोनदा होणाऱ्या वारीत लाखो भाविक पंढरपूरला जातात. त्यांना प्रसादाच्या स्वरूपात पंढरपूरात एक रोपटे देऊन निरोप द्यावा म्हणजे हे झाड प्रसाद म्हणून ते घरी घेऊन जातील आणि या झाडरूपी प्रसादाचे जतन-संवर्धन करताना आयुष्यभर त्याच्या छायेखाली सुखाने विसावतील.**

### संकल्प आणि नियोजन

कोणतेही काम यशस्वी करण्यासाठी पूर्ण क्षमतेने करायचे हा निर्धार करून वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी २ कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प केला. त्याचे सूक्ष्म नियोजन करताना त्यांनी पहिले नियोजनात्मक पाऊल टाकले ते सन २०१५–१६ च्या अर्थसंकल्पातून. या अर्थसंकल्पात त्यांनी प्रत्येक जिल्ह्यात उच्च तंत्रज्ञानावर आधारित रोपवाटिका निर्माण करण्याची घोषणा केली. यासाठी १८ कोटी ७० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून

दिला. यातून जिल्ह्यातील रोपवाटिकांमध्ये रोपे तयार करण्याचे काम सुरू झाले. दुसऱ्या अर्थसंकल्पात श्री. मुनगंटीवार यांनी २ कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प जाहीर केला. या संकल्पपूर्तीमध्ये समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग असावा या हेतूने त्यांनी विविध क्षेत्रातील लोकांशी संवाद साधला. अनेक ठिकाणी जाऊन संबंधितांच्या भेटी घेतल्या. राज्यातील रिक्षा–टॅक्सी चालकांच्या संघटनांशी चर्चा केली. त्यांना या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले.

एखादे काम हाती घ्यायचे तर ते पूर्ण संशोधन करून, त्याचे संदर्भ गोळा करून अतिशय नियोजनपूर्वक ते तडीस न्यायचे, ते करताना येणाऱ्या अडचणी समजून घेऊन सोडवायच्या. ते पूर्णत: यशस्वी होईल यासाठी शंभर टक्के प्रयत्न करायचे ही शिस्त त्यांनी स्वत:च्या आचरणात आणली. इतरांनाही असे काम करण्याची प्रेरणा दिली.

## वृक्ष संगोपन

केवळ वृक्ष लावायचे नाहीत तर ते जगवायचे आहेत हा संकल्प वनमंत्र्यांनी सर्व यंत्रणेच्या मनात रुजवला. वृक्ष जगण्याचे प्रमाण ८० ते ९० टक्क्यांपर्यंत कसे जाईल, त्यासाठी काय करायला हवे, याचे नियोजन करताना त्यांनी रोजगार हमी योजनेंतर्गत २०० झाडांमागे एका कुटुंबाला वृक्षसंगोपनाचे काम देण्याचा निर्णय घेतला. शिवाय इतर शासकीय विभाग, शाळा–महाविद्यालयातील विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, सामाजिक आणि आध्यात्मिक संस्था यांनाही त्यांनी वृक्षलागवडीबरोबर वृक्षसंवर्धन आणि जतनाच्या कामात सहभागी होण्यास सांगितले.

## दर्जेदार रोपांची उपलब्धता

दर्जेदार रोपांची उपलब्धता व्हावी, याकडे त्यांनी जाणीवपूर्वक लक्ष दिले. प्रत्येक जिल्ह्यातील रोपवाटिकांमधून विकसित करावयाच्या वृक्ष प्रजातींचे मार्गदर्शन केले. संकल्प २ कोटी वृक्षलागवडीचा असला तरी २० जून २०१६ पर्यंत २ कोटी ८८ लाख वृक्षांची नोंदणी झाली. यापैकी २ कोटी ५६ लाख ७१ हजार २०२ खड्डे तयार झाले. उच्च तंत्रज्ञानयुक्त रोपवाटिकांमधून १५६ प्रकारची रोपे वन विभागाने विकसित केली. यात फळ, फुले, सावली देणारे, औषधी वृक्ष आहेत. सौंदर्य वाढवणारी, शोभेच्या झाडांची रोपे आहेत. स्मृती वन, नक्षत्र वन, राशी वृक्ष, महादेव वन यासारख्या वनांच्या प्रकारांमधून वृक्ष लागवडीसाठी लोकांना प्रेरित करून सहभागी केले जात आहे. भविष्यात ट्री क्रेडिटसारखी संकल्पना राबवण्यात येईल. पंढरपूर येथे तुळशी उद्यान विकसित केले जात आहे. स्वयंम या उपग्रहाच्या यशस्वी प्रक्षेपणानंतर या गौरवास्पद कामगिरीची आठवण म्हणून पुण्यात नव्या स्वयंम उद्यानाची निर्मिती केली जाईल. स्वयंमच्या निर्मितीमध्ये महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांनी योगदान दिले, त्या सर्व विद्यार्थ्यांच्या हस्ते या नवीन उद्यानात वृक्षारोपण करण्यात येईल. लावलेल्या झाडांवर संबंधित विद्यार्थ्यांच्या नावाचा फलक लावला जाणार आहे.

2 कोटी वृक्षलागवड

शासकीय – निमशासकीय कर्मचाऱ्यांना वृक्षलागवडीच्या कामात उत्साहाने सहभागी होता यावे म्हणून दि. १ जुलै २०१६ रोजीचा दुपारी एक पर्यंतचा वृक्षलागवडीचा वेळ शासकीय कामकाजाचा भाग म्हणून घोषित करण्यात आला. त्यासाठी कार्यालयात लावलेल्या वृक्षाचा सेल्फी सादर करण्याचे बंधनही घातले. वृक्षलागवडीचे महत्त्व लोकांच्या मनावर बिंबवण्यासाठी वनमंत्र्यांनी संतवचनापासून वृक्षसंवर्धनाच्या ऐतिहासिक–पौराणिक संदर्भांचा वापर केला. माणसाला जगण्यासाठी किती प्राणवायू लागतो याचे गणित मांडले, एका झाडापासून किती वह्या तयार होतात हे सांगतांना त्यांनी प्राणवायू आणि वडाच्या झाडाचे नाते स्पष्ट केले. टाकसाळीत छापली जाणारी नोट ही वन विभागाच्या झाडांच्या कागदापासूनच तयार होते हे सांगितले. दाखले देत जन्मापासून मृत्यूपर्यंत झाडांची माणसाला असलेली सोबत उदाहरणांसह पटवून सांगितली.




## इको बटालियन

संरक्षण मंत्रालयाकडे मराठवाड्यासाठी इको बटालियनची मागणी करताना वनमंत्र्यांनी मराठवाड्यातील जनतेला पाणी आणि झाडांचा कसा थेट संबंध आहे हे समजावून सांगितले. ते म्हणाले गडचिरोलीच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ७७ टक्के क्षेत्र हे वनक्षेत्र आहे, सिंधुदुर्गात हे प्रमाण ५७ टक्क्यांच्या आसपास आहे. पण लातूर जिल्ह्यातील वनक्षेत्र फक्त .०७ टक्के इतके कमी आहे. म्हणून तिथे रेल्वेने पाणी देण्याची वेळ आली आहे. पाणी टंचाईच्या भीषण परिस्थितीवर मात करायची असेल तर वृक्षाच्छादन वाढवणे हा एक महत्त्वाचा पर्याय असल्याचे सांगताना जलयुक्त मराठवाड्यासाठी वनयुक्त शिवार करा, असे आवाहन त्यांनी केले. कृषी दिन आणि वनमहोत्सवाचे औचित्य साधून यावर्षी २ कोटी वृक्ष लावण्यात आले. पुढील तीन वर्षात ५० कोटी झाडे लावण्यात येतील. यासाठी प्रत्येक ग्रामपंचायत नर्सरी (रोपवाटिका)युक्त करण्यात येईल. वृक्षलागवडीच्या पालखीचे स्वत: वाहक होताना वनमंत्र्यांनी आपण सर्व मिळून हे वृक्षधनुष्य पेलण्याचे आवाहन केले होते. महाराष्ट्रातील जनतेने हे आवाहन स्वीकारून महा वृक्षलागवड मोहीम यशस्वी केली आहे.

**डॉ. सुरेखा मुळे**

# रक्षण वाघाचे, संरक्षण पर्यावरणाचे

**वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मागील दोन वर्षात राज्याच्या वनसंरक्षण, संवर्धन विशेषतः वाघांच्या संवर्धनासाठी अनेक कल्पक उपक्रम राबवले आहेत. जागतिक व्याघ्र दिनानिमित्त त्यांची विशेष मुलाखत.**

मिलिंद उमरे

**वाघांसाठीचा जगातील पहिला कॉरिडॉर राज्यात होऊ घातला आहे. याबद्दल काय सांगाल?**

कॉरिडॉर म्हणजे वेगवेगळ्या मोठ्या जंगलांना जोडणारा वनांचा पट्टा. या पट्ट्यामार्फतच वाघ व अनेक वन्यप्राणी अन्य रानात स्थलांतर करतात. पूर्वी हा पट्टा हिरवागर्द होता. पण मानवी लोकसंख्या वाढत असताना हे पट्टे विरळ होत गेले. मधेच मानवीवस्ती, गाव , शहरे वसल्याने हे पट्टे तुटत गेले. वाघ हा आपली हद्द जपणारा प्राणी आहे. एकाच ठिकाणी जेव्हा वाघांची संख्या वाढते तेव्हा नवे तरुण वाघ या कॉरिडॉरद्वारे अन्य जंगलात जाऊन आपली हद्द तयार करतात. अनेकदा प्रजोत्पादनासाठीही अशी स्थलांतरे होतात. जर असे कॉरिडॉर नसतील तर वाघ एकाच जंगलात बंदिस्त होईल. प्राण्यांना नाती कळत नाहीत. त्यामुळे एकाच परिवारात किंवा रक्तसंबंधात प्रजनन होऊन जीन्स प्रदूषित होतील. त्यातून पुढील पिढी जन्मजात जैविक दोष घेऊन जन्माला येईल. मग कोणतीच औषधी त्यांना वाचवू शकणार नाही. ताडोबा – अंधारी व्याघ्र प्रकल्पात वाघांचा जन्मदर मोठा आहे. त्यामुळे या जंगलाला वाघांची जीन बँक म्हणतात. पण या जीन्सचा प्रसार दूरपर्यंत झाला पाहिजे. तो एकाच रक्तात झाला तर अनर्थ घडतो. त्यामुळेच निसर्गाने या प्राण्यांमध्ये स्थलांतराची उर्मी निर्माण केली आहे. ही स्थलांतरे निर्धोक व्हावीत यासाठी कन्हाळगाव अभयारण्य झाल्यास पेंच – उमरेड– कऱ्हाडला, नवेगाव – नागझिरा– ताडोबा – कन्हाळगाव – चपराळा असा वाघांसाठीचा जगातील पहिलाच कॉरिडॉर तयार होऊ शकेल. हा कॉरिडॉर महाराष्ट्र राज्यालगतच्या मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगना आदी राज्यातील व्याघ्र प्रकल्पांना जोडला जाईल. याशिवाय उच्च जागतिक दर्जाचे आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळ म्हणून ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्प विकसित करण्यात येत आहे.

**आपला जन्म व्याघ्रभूमी चंद्रपूरचा आहे. वाघांच्या संरक्षण व संवर्धनासाठी काय प्रयत्न सुरू आहेत?**

वाघ हा जंगलातील सर्वात रुबाबदार व देखणा प्राणी मानला जातो. जैवविविधतेत वाघाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. २९ जुलै हा दिवस जागतिक व्याघ्र दिन म्हणून जगभरात साजरा होतो. या दिनानिमित्त आम्हीही अनेक उपक्रम राबवत आहोत. मी वनमंत्री पद स्वीकारल्यानंतर वाघांविषयी अधिक गांभीर्याने विचार करू लागलो. एकेकाळी मोठ्या संख्येने असलेले वाघ दुर्मिळ झाले आहेत. त्यांच्या संवर्धनासाठी आम्ही अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. राज्यात ६ व्याघ्र प्रकल्प आणि ४८ अभयारण्ये व ४ संवर्धन क्षेत्र आहेत. येथील वन्यजीवांचे रक्षण करतानाच पर्यटन वाढवण्यावरही आम्ही भर दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वन्यजीव मंडळ स्थापन करण्यात आले आहे. राष्ट्रीय वन्यजीव मंडळाने केलेल्या शिफारसीनुसार आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रत्येक अभयारण्य, राष्ट्रीय उद्यानाभोवती १० किमी परिघात इको– सेन्सिटिव्ह झोन अधिसूचित करायचे आहेत. याबाबत ४६ प्रस्ताव राज्य शासनास सादर झाले असून ३६ प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आले आहेत. वाघासारख्या प्राण्याकडून माणसांवर हल्ला झाल्यानंतर मोठा संघर्ष उभा राहतो. हा संघर्ष कमी करण्यासाठी, वन्यजीवांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या व्यक्तीला मिळणारे अर्थसाहाय्य दुप्पट केले आहे. तर हल्ल्यात मृत झालेल्या व्यक्तींच्या परिवाराला ८ लाख रुपये देण्यात येतात. महाराष्ट्रात देण्यात येणारी नुकसान भरपाईची रक्कम देशात सर्वात जास्त आहे.



## पर्यटन वाढीसाठी काय प्रयत्न सुरू आहेत?



**ताडोबा – अंधारी व्याघ्र प्रकल्पात येणारे पर्यटक पावसाळ्यात प्रवेश करू शकत नव्हते. मात्र आता पावसाळ्यात हा प्रकल्प अंशत: सुरू ठेवण्यात येणार आहे. वाघ व अन्य वन्यजीवासोबतच येथील पाणपक्ष्याचे निरीक्षण करता यावे म्हणून इरई नदी पात्रात बोटिंगची व्यवस्था करण्यात आली आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात बिबट सफारी सुरू करण्यात आली आहे. नागपूर येथील गोरेवाडा येथे दुर्मीळ व लुप्त होत असलेल्या प्राण्यांचे प्रजनन करून, त्यांना नैसर्गिक अधिवासात पुनर्स्थापित करण्यासाठी; आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्राणी संग्रहालय उभारण्यात येत आहे. यातूनही पर्यटन वाढेल. राज्यातील अभयारण्यांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य निसर्ग पर्यटन विकास मंडळाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. चंद्रपुरातील विसापूर येथे देशातील सर्वोत्तम वनस्पती उद्यान तयार करण्यात येत असून त्याचे भूमिपूजन झाले आहे. ताडोबाच्या बफर क्षेत्रातील तब्बल ४७ गावांच्या शाळांमध्ये ई – लर्निंग सुविधा निर्माण करण्यात आली आहे.**

## १ जुलै रोजी आपण आयोजित केलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमाची सर्वत्र चर्चा आहे. कसा आहे हा उपक्रम?

आपली प्राचीन भारतीय संस्कृती निसर्गाचा मान राखत , त्याचा समतोल साधत मार्गक्रमण करत होती. आपल्या ऋषी, मुनींना वृक्षाविना मानवी जीवनाचा विनाश होईल हे पक्के माहीत होते. वराह पुराणात एक आशयघन श्लोक आहे. **यावत्त भू मंडले, धत्रे सशैल वन काननम, तावत्त तिष्ठंती मोहिन्याम, संतती पुत्र पौत्रुकी** अर्थात या पृथ्वीतलावर जोपर्यंत घनदाट वने, पर्वत, नद्या, सरोवरे आहेत तोपर्यंतच तुमची पुढची पिढी सुखाने जगू शकते. पण आपण या महत्त्वपूर्ण इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले. अपरिमित वृक्षतोड, अव्यवस्थित, अवाजवी औद्योगिकीकरण, यामुळे आपण जंगलांचा नाश केला. जंगले ही पृथ्वीची फुफ्फुसे असतात. पण आपल्याला त्याचा सोयीस्कर विसर पडला आणि त्यातूनच ऋतुचक्रातील अनिष्ट बदल, प्रदूषण, दुष्काळ अशा संकटांच्या विळख्यात आपण सापडलो. पूर्वी केलेली ही चूक सुधारण्यासाठी आपण हा उपक्रम राबवला आहे. १ जुलै रोजी कृषी दिन व वनमहोत्सवानिमित्त राज्यात एक, दोन हजार किंवा लाख नव्हे तर तब्बल २ कोटी रोपांची लागवड करण्यात येणार आहे. या उपक्रमाची माहिती देण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची मी भेट घेतली होती. त्यांनाही हा उपक्रम अतिशय आवडला. राष्ट्रीय योजनेनुसार राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादित असायला हवे.पण आपल्या राज्यात हे वनक्षेत्र २० टक्के आहे. राज्याच्या वनक्षेत्राच्या वाढीसाठीच हा उपक्रम राबवण्यात आला.



जागतिक व्याघ्रदिन
२९ जुलै

## या उपक्रमाचे वेगळेपण काय आहे?

हा वृक्षारोपणाचा उपक्रम एक दिवसाचा इव्हेंट नाही. आम्ही आतिशय परिश्रमाने याचे नियोजन केले आहे. दोन कोटी पैकी दीड कोटी रोपे वनविभागातर्फे वनक्षेत्रात लावण्यात आली. तर उर्वरित ५० लाख रोपे लावण्यासाठी विविध शासकीय, निमशासकीय विभाग, शिक्षण संस्था, खासगी स्वयंसेवी संस्था आणि विविध वयोगटातील नागरिक यात मोठ्या संख्येने सहभागी झाले. या उपक्रमात 'सेल्फी वुइथ ट्री' अनोखी स्पर्धा घेण्यात आली. आपण लावलेल्या रोपासोबत फोटो काढून तो वनविभागाला पाठवण्याचे आवाहन करण्यात आले होते. स्पर्धेतील विजेत्यांना व्याघ्र प्रकल्पात मोफत सफरीचे बक्षीस असल्याने स्पर्धेला उदंड प्रतिसाद मिळाला. आता रोप लावून काम संपले नाही तर खरे काम सुरू झाले आहे. या रोपांची योग्य काळजी घेत असे अनेक उपक्रम राबवायचे आहेत. राज्यात वनीकरणासाठी केंद्र शासन अतिशय सकारात्मक असून केंद्रीय पर्यावरण व वनमंत्री श्री. प्रकाश जावडेकर यांनी २ हजार कोटी रुपयांचा निधी देण्याचे ठरवले आहे. या निधीपैकी १९६ कोटी रुपयांचा धनादेश त्यांनी मागेच दिला आहे. २०१९ पर्यंत हा अवघा महाराष्ट्र हिरवागार करण्याचे माझे स्वप्न आहे आणि सर्वांच्या सहकार्याने हे स्वप्न साकार होईल, असा विश्वास आहे.

## आपण नद्यांच्या संदर्भात काय उपक्रम राबवत आहात?

'जल ही तो कल है' असे म्हणतात ते काही खोटे नाही. जगातील अनेक संकृती नदीच्या आश्रयानेच विकसित झाल्या. मात्र त्यांचा आदर आपण ठेवला नाही. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांनी नमामी गंगा हा उपक्रम हाती घेत गंगा नदीच्या शुद्धीकरणाचे प्रयत्न सुरू केले आहेत. त्यांच्या याच उपक्रमापासून प्रेरणा घेत आम्ही राज्यात नमामी चंद्रभागा हे अभियान राबवण्याचे ठरवले आहे. अकराव्या शतकापासून चंद्रभागेच्या वाळवंटामध्ये वैष्णवांचा मोठा मेळा भरत आहे. विठुनामाचा गजर करीत वारकरी मोठ्या आत्मीयतेने चंद्रभागेचे पाणी तीर्थ म्हणून प्राशन करतात. त्यांची श्रद्धा अबाधित राखण्यासाठी व या पवित्र नदीला तिचे मूळ रूप प्राप्त करून देण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात येत आहे.

**(लेखक हे वन्यजीव व जैवविविधता विषयाचे अभ्यासक आहेत.)**
**संपर्क : ०९४२३४२२३४८**



बंगाली वाघ

# जगभरातील वाघ

**रुबाब , दरारा ,ताकद , चपळता आणि सुंदरतेचा निसर्गदत्त मिलाफ म्हणजे आपला राष्ट्रीय प्राणी वाघ. वाघाबद्दल कुतूहल प्रत्येकालाच असते. पण या विलक्षण प्राण्याबद्दलची माहिती फारच थोड्या लोकांना आहे. अनेकांना असे वाटते की, वाघ म्हणजे केवळ एकाच प्रजाती आणि ती फक्त आपल्या भारतातच आढळते. पण, भारतात वाघाची एकच प्रजाती आढळते. या प्रजातीला आपण भारतीय वाघ (Royal bengal tiger) म्हणतो. तुम्हाला आश्चर्य वाटेल पण जगात वाघांच्या तब्बल ९ प्रजाती आहेत. २९ जुलै रोजी जागतिक व्याघ्र दिन साजरा होत आहे, या निमित्ताने जगभरातील वाघांच्या प्रजातीबद्दलचा हा आढावा..**

**मिलिंद उमरे**

जगात वाघांच्या तब्बल ९ प्रजाती आहेत. त्यातील ३ प्रजाती दुर्दैवाने (खरतर मानवी चुकांमुळे) या पृथ्वीतलावरून पूर्णतः नामशेष झाल्या. १ प्रजाती नैसर्गिक अधिवासात दिसत नाही. त्यामुळे ही प्रजाती जगातून लुप्त झाल्याचेच मानण्यात येते. वाघाच्या उर्वरित ५ प्रजाती आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करीत आहेत.

### बाली वाघ

इंडोनेशियातील लहानशा बाली बेटावर आढळणारा हा लहानखुरा वाघ बाली वाघ म्हणूनच ओळखला जातो. अत्याधिक शिकारीमुळे ही व्याघ्र प्रजाती आपण गमावून बसलो. शेवटच्या बाली वाघाची शिकार पश्चिम बाली बेटावर २७ सप्टेंबर १९३७ ला करण्यात आली. त्यानंतर ही प्रजाती नष्ट झाल्याचे घोषित करण्यात आले. म्हणजे आपला भारत देश स्वतंत्र होण्याच्या १० वर्षापूर्वीच ही प्रजाती नष्ट झाली. इंडोनेशिया येथे वाघाच्या एकूण तीन प्रजाती होत्या. त्यापैकी बाली आणि जावन या दोन प्रजातींचे वाघ नष्ट झाले. तर सुमात्रन ही अतिदुर्मीळ प्रजाती कशीबशी तग धरून आहे. याचे शास्त्रीय नाव Panthera tigris balica आहे.



### कॅस्पियन वाघ



कॅस्पियन समुद्राच्या पश्चिम आणि दक्षिण परिसरात हा वाघ आढळायचा. पूर्वी या प्रजातीचा आढळ इराण, इराक, अफगाणिस्तान, तुर्की, मंगोलिया, कझाकिस्तान, ताजिकिस्तान तुर्कमेनिस्तान आणि उझबेकिस्तान या भागात होता. शेवटचा कॅस्पियन वाघ १० जानेवारी १९५४ रोजी मारला गेल्याचे मानण्यात येते. सायबेरीयन वाघ या प्रजातीचा जवळचा नातलग मानला जातो. याचे शास्त्रीय नाव Panthera tigris virgata आहे.

### जावन वाघ

इंडोनेशियातील जावा बेटावर आढळत असल्यामुळे या प्रजातीला जावन हे नाव देण्यात आले. ही प्रजाती १९८० मध्ये नामशेष झाल्याचे मानण्यात येते. १९७६ मध्ये या प्रजातीचे शेवटचे वाघ दिसले होते. दुसऱ्या जागतिक महायुद्धापर्यंत इंडोनेशियातील काही प्राणिसंग्रहालायांमध्ये या प्रजातींचे वाघ पाळण्यात आले होते.पण, दुसऱ्या महायुद्धाच्या झळा सोसत ही प्राणिसंग्रहालये बंद झाली आणि ही प्रजातीही नजरेआड गेली. या प्रजातीचे शास्त्रीय नाव Panthera tigris sondaica आहे.



## भारतीय वाघ

**या वाघाला रॉयल बेंगॉल टायगर असे नाव आहे. याची सर्वाधिक संख्या भारतात आढळून येत असल्याने याला भारतीय वाघ म्हणतात. भारताशिवाय ही व्याघ्र प्रजाती दक्षिण आशिया, बांगलादेश, भूतान, म्यानमार, चीन, नेपाळ या देशातही दिसते. आपला राष्ट्रीय प्राणी असलेला हा वाघ भारताच्या नावाने आणि आणि भारत या वाघाच्या नावाने जगभरात ओळखला जातो. जगातील वाघांच्या काही प्रजाती नामशेष झाल्या तर काही नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. या सर्व प्रजातींमधून नामशेष होण्यापासून वाचण्याची क्षमता व तशी अनुकूल स्थिती फक्त आपल्या रॉयल बेंगॉल टायगरची आहे. म्हणून संपूर्ण जगाचे लक्ष या एकमेव व्याघ्र प्रजातीकडे, पर्यायाने भारताकडे आशेने लागून आहे. ब्रिटिशपूर्व काळात भारतात तब्बल ३५ हजारहून अधिक वाघ होते. नंतर या वाघांची संख्या इतकी खालावली की, एक हजाराच्या आत गेली. मात्र मागील काही वर्षात शासनाने केलेल्या व्याघ्र संरक्षण, संवर्धनाच्या प्रयत्नानंतर ही संख्या काही प्रमाणात वाढली आहे. या दोन वर्षात वाघांची संख्या वेगाने वाढत असल्याचे दिसून येत असून, शासनाच्या प्रयत्नांना यश येत आहे. पण हे प्रयत्न अधिक वाढवायला हवेत. यासाठी आपण सर्वांनीच प्रयत्न करायला हवा. कारण जग भारताला मुख्यत: एकाच अक्षराने प्रारंभ होणाऱ्या दोनच शब्दांनी ओळखते एक टी म्हणजे टायगर आणि दुसरा टी म्हणजे ताजमहाल.**

## अमोय किंवा साऊथ चायना वाघ



याचे शास्त्रीय नाव Pantheraa tigris amoyensis आहे. चीनमध्ये नैसर्गिक अधिवासात आढळणारी ही व्याघ्र प्रजाती आता जंगलातून नामशेष झाली आहे. बंदिस्त पद्धतीने प्रजनन करून, वाढवून या प्रजातीला पुन्हा रानात सोडून त्यांना नैसर्गिक अधिवासात स्थापित करण्याचे शर्थीचे प्रयत्न चीन सरकार दक्षिण आफ्रिकेच्या सहकार्याने करीत आहे. महत्त्वाचे म्हणजे दक्षिण चीनमध्ये आढळणारी ही प्रजाती समस्त व्याघ्र प्रजातीची पूर्वज मानली जाते. सन १९०५ मध्ये जर्मन प्राणिशास्त्रज्ञ म्याक्स हिल्झेमर यांनी ही प्रजाती शोधून काढली.

## सायबेरियन किंवा अमूर वाघ

वाघांमधील लोभसवाणी, गोंडस, गुबगुबीत प्रजाती म्हणजे हा सायबेरियन वाघ. तुम्ही ग्ल्याडिएटर हा हॉलीवूडपट पाहिला असेल तर तुम्हाला या चित्रपटात सायबेरियन वाघ नक्कीच दिसला असेल. Panthera tigris altaica असे याचे शास्त्रीय नाव आहे. एकेकाळी हा वाघ कोरिया, उत्तर पूर्व चीन, रशियाचा अतिपूर्वेचा भाग आणि उत्तर मंगोलिया या भागात आढळायचा. सन १९४० च्या दरम्यान ही प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आली होती. पण या प्रजातीला वाचविण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू झाल्यानंतर त्यांची संख्या काही प्रमाणात वाढली. तरीही या उमद्या प्राण्यावरची नामशेषतेची टांगती तलवार कायम आहे.





जागतिक व्याघ्रदिन
२९ जुलै

## सुमात्रन वाघ

या वाघाचे शास्त्रीय नाव Panthera tigris sumatrae असे आहे. सन २००८ मध्ये अतिदुर्मीळ व अस्तित्व धोक्यात असलेल्या प्रजातींच्या यादीत या व्याघ्र प्रजातीचा समावेश करण्यात आला.जिवंत असलेल्या व्याघ्र प्रजातींपैकी ही सर्वात छोटी व्याघ्र प्रजाती आहे. पश्चिम इंडोनेशियातील सुमात्रा बेटावर हा वाघ आढळतो. म्हणूनच याला सुमात्रन वाघ म्हणतात.



## मलायन वाघ

या वाघाचे शास्त्रीय नाव Panthera tigris Jacksoni आहे. या व्याघ्र प्रजातीच्या शोधाची कथा खूप रंजक आहे. सन १९६८ मध्ये इंडोचायनीज वाघाच्या प्रजातीचा शोध लागला. तेव्हा याच अधिवासात मलायन म्हणजे वेगळी व्याघ्र प्रजाती असल्याचे माहीत नव्हते. पण, शास्त्रज्ञांनी या दोन्ही प्रजातींच्या गुणसूत्रांचा सखोल अभ्यास केल्यावर हा फरक लक्षात आला आणि २००४ मध्ये व्याघ्र परिवारात मलायन वाघ ही वेगळी प्रजाती म्हणून जाहीर करण्यात आले. गंमत बघा, माणूस चंद्रावर जाऊन किती वर्षे झालीत. पण या पृथ्वीतलावावर वाघाची एक वेगळी प्रजाती आहे हे माहीत व्हायला चक्क २००४ हे वर्ष उजाडावे लागले. ही व्याघ्र प्रजाती आपल्या देशातील वाघांपेक्षा लहान असून दक्षिण पूर्व आशिया, मलेशिया, थायलंड या भागात आढळते.



## इंडोचायनीज वाघ

या वाघाचे शास्त्रीय नाव Panthera tigris corbetti आहे. Corbetti हे नाव भारत, आफ्रिका आदी देशात उपद्रवी नरभक्षक वाघ, सिंह, बिबट यांची शिकार करणारे प्रख्यात शिकारी तथा शिकारकथा लेखक जिम कॉर्बेट यांच्या सन्मानार्थ देण्यात आले आहे. हा इंडोचायनीज वाघ सर्वाधिक संख्येने थायलंड येथे सापडतो. काही प्रमाणात म्यानमार तसेच बोटावर मोजण्याइतक्या संख्येत व्हिएतनाममध्ये दिसतो. कंबोडिया, दक्षिण चीन, लाओसमधून हा लुप्त झाला आहे.

**(लेखक हे वन्यजीव व जैवविविधता विषयाचे अभ्यासक आहेत.) संपर्क : ०९४२३४२२३४८**


















# आधुनिक शेती, अधिक उन्नती

**महाराष्ट्राची शेती, महाराष्ट्रातील शेतकरी, पाऊस आणि बदललेली हवामानाची स्थिती, आधुनिक तंत्रज्ञान, शेतीतील विविध प्रयोग, संशोधन या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात नुकत्याच पार पडलेल्या ४४व्या संयुक्त कृषी संशोधन परिषदेत मूलभूत चिंतन केले. या परिषदेला महाराष्ट्रातील सर्व कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, कृषितज्ज्ञ, शास्त्रज्ञ उपस्थित होते. या भाषणाचा हा गोषवारा..**

**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री

गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्राची शेती, महाराष्ट्रातील शेतकरी, पाऊस आणि बदललेली हवामानाची स्थिती कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञांना माहिती आहे.

आज चार कृषी विद्यापीठांचे कुलगुरू या ठिकाणी उपस्थित आहेत. या चार कुलगुरूंनी मनामध्ये आणले तर हार्टिकल्चरमध्ये पिछाडलेला महाराष्ट्र आज देशातील सर्वात पुढारलेला असू शकतो. ग्रीनकल्चरमध्ये आम्ही देशात मागे का राहायचे, आम्हाला मागे राहायचे नाही. पण हे जर करायचे असेल तर पाठबळ आमचे असेल तंत्रज्ञान व संशोधन तुमचे असेल. हे आव्हान आपल्या चारही विद्यापीठांनी स्वीकारले पाहिजे.

## शेतीवर परिणाम

आपण बघितले की, गेली चार वर्षे सातत्याने महाराष्ट्र दुष्काळाचा सामना करीत आहे. शेतकऱ्यांच्या शेतीवर, उत्पादनावर मोठा

परिणाम झाला आहे. शेतीतील उत्पादन हल्ली घटते आहे. गेली चार वर्षे शेतीचा विकास दर १ टक्के एवढा खालावला आहे. आपण म्हणतो की, ५५ टक्के आमचा रोजगार शेती क्षेत्रातून तयार होतो. या वेळी खालावलेल्या विकासदराचा परिणाम किती मोठ्या प्रमाणात आपल्या लोकसंख्येवर होतो आहे, हे वेगळेपणाने सांगण्याची आवश्यकता नाही. म्हणून आपल्या पारंपरिक पद्धतीपेक्षा वेगळ्या पद्धतीची आवश्यकता कधी नव्हे एवढी आज भासते आहे. आपण शेती क्षेत्रातील स्थिती बघितली तर आज ७८ टक्के शेतकरी अल्पभूधारक आहेत. त्यासोबत शेती क्षेत्राची व्याप्ती बघितली तर एकीकडे ५० ते ५५ टक्के रोजगार हा शेती क्षेत्रातून मिळतो. महाराष्ट्राच्या सकल उत्पादनामध्ये शेती क्षेत्राचा वाटा केवळ ११ टक्के आहे. याचा अर्थ असा आहे की, एकूण देशामध्ये वस्तू आणि सेवेची जी निर्मिती होते, त्या वस्तू आणि सेवेच्या निर्मितीमध्ये ५५ टक्के लोकांचे श्रम लागतात. त्यामध्ये ११ टक्के वस्तू आणि सेवेची निर्मिती होते आहे. उर्वरित ४५ टक्के लोक मिळून ८९ टक्के वस्तू आणि सेवेची निर्मिती करत आहेत. अशा परिस्थितीमध्ये जर ११ टक्के सकल उत्पादन आणि त्याच्या आधारावर ५०-५५ टक्के लोकसंख्येला आपले जीवन जगावे लागत असेल तर शेतकऱ्यांची जी अवस्था आपण पाहतो आहोत, ती अवस्था बघून काही वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. ती याच परिस्थितीमुळे आहे.



## शेतीमध्ये आमूलाग्र बदल

जोपर्यंत शेती क्षेत्रामध्ये आपण आमूलाग्र बदल करत नाही, शेतीक्षेत्रात जो रोजगाराचा भार आहे तो आपण कमी करत नाही, शेती क्षेत्रामध्ये उत्पादकता वाढवत नाही. जोपर्यंत एकत्रितपणे या सर्व क्षेत्राचा विचार आपण करत नाही, तोपर्यंत या क्षेत्रात परिवर्तन होऊ शकणार नाही. संशोधनाचा ज्या वेळी विचार करतो, त्या वेळी केवळ नवीन वाण तयार करण्याइतपत आपले संशोधन मर्यादित ठेवून आपल्याला चालणार नाही, तर आपल्याला वातावरणातील बदल समजून घेऊन भविष्यातील आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. त्यामध्ये शाश्वत शेती कशाप्रकारे करता येईल. सस्टेनेबल ॲग्रिकल्चर प्रॅक्टीसेस कशा तयार करता येतील. क्लायमेट प्रुफ अशा प्रकारची शेती कशी आपल्याला करता येईल.




त्याचा विचार करावा लागेल. जो आम्ही पूर्णपणे करत नाही. जोपर्यंत आम्ही एकमेकांशी बोलणार नाहीत, आमचे विचार एकमेकांना एका माळेत गुंफून घेणार नाहीत, तोपर्यंत या क्षेत्रामध्ये आज ज्या अडचणी पाहायला मिळतात, त्या अडचणी दूर होणार नाहीत. आज कृषी क्षेत्राचा विचार करीत असतानाच आपल्याला जसा 'ग्रो क्लॉयमेटीक'चा विचार करावा लागतो तसा 'ग्रो इकॉनॉमिक्स'चा विचार करण्याची आवश्यकता आहे. कारण आपण बघितले की, कृषिक्षेत्राचा अर्थव्यवस्थेशी खूप जवळचा संबंध आहे. जोपर्यंत हा संबंध समजावून घेऊन आम्ही अर्थव्यवस्थेच्या भिन्न अंगाशी या क्षेत्राला जोडण्याचा प्रयत्न करणार नाही, तोपर्यंत स्वत:च्या भरवशावर हे क्षेत्र ज्या वेगाने पुढे यायला हवे, तेवढ्या वेगाने येऊ शकणार नाही. हे समजावून घ्यावयाचे असेल तर यात महत्त्वाचे संशोधन आणि संशोधनात तंत्रज्ञानाचा वापर ठरतो. तंत्रज्ञानामुळे समोरच्या अडचणी वेगाने समजू शकतात.

## शेतीतील संशोधन

अनेकदा लोक इस्रायलचे उदाहरण सांगतात. इस्रायलमधे पाऊस पडत नाही. पाण्याची कमरतता आहे. जमीन चांगली नाही. शेतीला पूरक वातावरण नाही. तरी जगातल्या शेतीमध्ये इस्रायलचे नाव घेतले जाते. याचे कारण काय आहे?

मी इस्रायलला गेलो असता, अनेक लोकांशी चर्चा केली. त्या वेळी तेथील एका संशोधकाने आम्हाला सांगितले की, इस्रायलमध्ये असलेले लोक हे सर्व बाहेरून आलेले आहेत. या सर्व लोकांच्या लक्षात आले की, या देशात काहीच उत्पादन होत नाही. येथील जे वातावरण आहे ते कृषी उत्पादनाकरिता पोषक नाही. आजूबाजूची आठ राष्ट्रे सातत्याने इस्रायलशी लढत असताना त्यांच्याकडून कुठलीही मदत मिळणार नाही हे माहीत असताना जगायचे असेल, स्वयंपूर्ण व्हायचे असेल तर शेतीमध्ये संशोधन केले पाहिजे. त्यामुळे तेथील शेती वैज्ञानिकांनी सुरू केली. जे वैज्ञानिक होते त्यांनी शेतीमध्ये वेगवेगळे बदल करून, प्रथम त्या माध्यमातून सस्टेनेबल शेती केली. पाण्यातील शेती, जास्त उत्पादकता देणारी शेती अशा प्रकारचा प्रयत्न त्यांनी सुरू केला.

वैज्ञानिकांनी या शेतीची परिस्थिती बदलल्यानंतर, आज शेतीच्या क्षेत्रामध्ये इस्रायलचे उदाहरण आम्ही देतो. म्हणून आपण आपल्या राज्याचा विचार केला, देशाचा विचार केला तर या क्षेत्रामध्ये, संशोधनाचा अभाव आहे. या क्षेत्रामध्ये जर आपल्याला परिस्थिती बदलावयाची असेल तर महत्त्वाचे काय आहे? आपण जास्तीत जास्त कौशल्य या क्षेत्रात आणायला हवे. आपण जर चीनचे उदाहरण घेतले तर जमिनीची उपलब्धता आपल्यापेक्षा कमी आहे. पाण्याची उपलब्धताही कमी आहे, जर उत्पादकता बघितली तर भारतापेक्षा तीन पट अधिक आहे, याचे कारण, चीनने केवळ संशोधनच केले नाही, त्यासोबत कौशल्यामध्ये मोठ्या प्रमाणात काम केले.



व्यवस्था उभी केली पाहिजे. मला माहीत आहे, मागील वर्षात जलयुक्त शिवाराच्या माध्यमातून आम्ही वेगवेगळी कामे करू शकलो. त्या ठिकाणी ज्या वेळी ४० दिवसांच्या पावसाचा खंड पडला, अनेक जिल्ह्यात २५–२५ हजार एकर शेतीला जलयुक्त शिवाराच्या माध्यमांतून संरक्षित सिंचन मिळाले आणि पिके वाचू शकली, म्हणून शेतीच्या क्षेत्रात गुंतवणूक झाली पाहीजे. हा आमचा प्रयत्न आहे. १० लाख हेक्टर ऊसाखालची जमीन आहे. त्यापैकी २ लाख हेक्टर आम्ही ठिबकखाली आणली आहे. आम्ही वर्षाचे फक्त २ लाख हेक्टर ठिबकखाली आणू शकलो. आम्ही अतिशय वेगवान अशी योजना हातामध्ये घेतली आहे. दोन लाखांमध्ये अधिक चार लाखांची भर टाकता येईल आणि प्रभावी जलवापराच्या माध्यमातून एकीकडे उत्पादकता वाढली पाहिजे तर दुसरीकडे पाण्याचा योग्य उपयोग केला पाहिजे. अशा प्रकारची योजना आम्ही तयार केली आहे. यामध्ये कृषी विभागाचा मोठ्या प्रमाणात सहभाग आहे. आता आम्हाला विद्यापीठाकडून अपेक्षा आहे, यामध्ये तुमचे मार्गदर्शन सर्वात महत्त्वाचे आहे.

पाण्याची निर्मिती, पाण्याच्या साठ्याची निर्मिती याच्यासोबत अंतर्गत जलस्रोत, पीक पद्धतीचे नियोजन जोपर्यंत होणार नाही, तोपर्यंत शेतीला फायद्यात आणू शकत नाही. आता सांगवेसे वाटते की, आम्ही जागतिक बँकेत एक प्रस्ताव सादर केला. विदर्भ व मराठवाडाच्या ५ हजार गावात एकात्मिक कृषी विकास योजना आम्ही सादर केली आहे. ही योजना तयार करत असताना, त्या माध्यमातून वॉटर शेड डेव्हलपमेंटच्या माध्यमातून मॉईश्चर सेक्युरिटी तयार करावयाची; त्यांचा प्रभावी वापर करावयाचा, त्या वापराच्या माध्यमातून तेथील पीक पद्धती निश्चित करून, त्या माध्यमातून त्यांना तेथे बाजाराची उपलब्धता करून द्यायची, अशा प्रकारची एकात्मिक योजना तयार करून जेव्हा जागतिक बँकेकडे सादर केली तेव्हा त्यांनी सांगितले की, असा हा आराखडा एकमेव आहे. अशा प्रकारचा आराखडा यापूर्वी कोणीही मांडलेला नाही, आम्ही याला लवकरात लवकर मान्यता देऊ.

## जलयुक्त शिवार

आमचा शेतकरी किती अडचणीत सापडला हे आम्ही कित्येक वेळा पाहिले आहे. म्हणून याच्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. राज्य सरकारने मोठ्या प्रमाणात कृषी क्षेत्रात गुंतवणूक व्हायला पाहिजे, म्हणून अशा प्रकारच्या अनेक गोष्टी हाती घेतल्या. व्हर्च्युअल सेक्युरिटीकरिता शेततळ्याची योजना, वॉटर रिचार्जिंग करता येईल याचा प्रयत्न सुरू केला. वेगवेगळ्या प्रकारची गुंतवणूक इंटरव्हेशन आपण सुरू केली आहे. मला वाटते एक वर्षामध्ये आपण शेतीमध्ये आपली गुंतवणूक होती ती एक हजार कोटीवरून ५ ते ७ हजार कोटीच्यावर नेली आहे. त्या माध्यमातून शाश्वत शेती, क्लायमेट प्रूफ शेती तयार करण्याचे प्रयत्न आपण करतो आहोत. जलयुक्त शिवार ही योजना केली. त्या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मॉईश्चर सिक्युरिटी देऊ शकतो. पडणारा पावसाचा थेंब न थेंब हा जमिनीत मुरवावा, साठवावा त्याच्या माध्यमातून आम्ही मॉईश्चर सिक्युरिटी तयार केली. आज एकीकडे ज्या वेळी डोंगरावर कंम्पार्टमेंट बंडिंगच्या माध्यमातून मातीत पाणी थांबवले पाहिजे, जिरवले पाहिजे. या प्रकाराचे प्रयत्न मोठ्या प्रमाणात केले आहेत. हे आपण वर्ष संपता करू शकलो, दोन पावसांच्यात मोठ्या प्रमाणात गॅप पडलेली आहे. मागील वर्षात आपण बघितले, जून महिन्यात पावसाला सुरुवात होऊन जुलैमध्ये पाऊस आला, त्यामध्ये ४० दिवसाची गॅप पडली. त्यानंतर तिसरा पाऊस २० दिवसांनी आला, त्यावेळी दुबार पेरणी, तिबार पेरणी वाया गेली, आता वातावरणातील बदलामुळे ही परिस्थिती कायम राहणार असेल तर आम्ही ईश्वराला दोष देऊ, निर्सगाला दोष देऊ की, परिस्थिती सत्य मानू त्यासाठी आमची इंटरव्हेशन उभी करू हा विषय महत्त्वाचा आहे. आता राज्य शासनाने निर्णय घेतला आहे की, निसर्गाला दोष देऊन चालणार नाही, हे निर्सगाचे चक्र समजावून घेतले पाहिजे, त्या चक्राला अनुरूप अशा प्रकारची








५ लाख कौशल्य प्रशिक्षण केंद्रांपैकी अडीच लाख कौशल्य प्रशिक्षण केंद्रे शेतीकरिता त्यांनी या ठिकाणी स्थापन केली. त्यात शेती क्षेत्रामध्ये जी जी वेगवेगळी कौशल्ये आहेत त्या कौशल्याचा विकास करून आज त्यांना ऐवढी उत्पादकता गाठता आली. मला असे वाटले की, आज आपल्या राज्यामध्ये देखील कृषी विद्यापीठांनी या क्षेत्रात जास्तीत जास्त कौशल्य निर्मिती करावी. आम्ही या कौशल्याच्या माध्यमातून कृषी आणि कृषिपूरक उद्योग या दोन्ही क्षेत्रात सांधण्याचा प्रयत्न करत आहोत. याकरिता जास्तीत जास्त कौशल्य प्रशिक्षित मनुष्यबळाची वाढ करण्याची आवश्यकता आहे. मला असे वाटते की, त्यात आपण लक्ष देऊ शकलो, तर निश्चितपणे चांगला परिणाम होईल.

## संवाद वाढवा

कृषी विद्यापीठे चांगले काम करत आहेत. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने इतकी चांगली व्यवस्था तयार केली, परभणीमध्ये एवढी चांगली यंत्रसामुग्री तयार झाली, राहुरीमध्ये अनेक प्रकारची संशोधने झाली. मात्र, आपले नेमके काय चालले आहे, हे एकमेकांना माहीत नसते. राहुरीत काय होते, ते परभणीला माहीत नाही, परभणीत काय होते ते अकोल्याला माहीत नाही, या चारही विद्यापिठात काय होते ते आम्हाला माहीत नाही. मला असे वाटते हा जो अडथळा आहे तो दूर करण्याची आवश्यकता आहे. आज संशोधन आम्ही करतो आहोत पण जोपर्यंत उपयोजित संशोधन होत नाही, जोपर्यंत विस्तारामध्ये जात नाही तोपर्यंत हे संशोधन सादरीकरणाच्या स्वरूपामध्ये किंवा डेमॉस्ट्रेशनच्या स्वरुपामध्ये एखादे पदक मिळवून देऊ शकते. मोठ्या प्रमाणावर याचा प्रसार होतो, त्या वेळी या संशोधनाचा फायदा समाजाला होत असतो. माझी अशी अपेक्षा आहे ही जी प्रक्रिया आहे ती अधिक वेगाने केली पाहिजे. मला माहिती आहे, विद्यापीठासमोर अनेक समस्या आहेत. आपण सर्व समस्या एकत्र बसून सोडवू. हे सर्व काम करताना मिशन मोडमध्ये करा. शासन तुमच्या पाठीशी आहे. ज्या ज्या गोष्टी हव्या, त्या आम्ही तत्काळ पुरवू. तुमच्याकडून ठोस संशोधन झाले पाहिजे, ही अपेक्षा.



**४४व्या संयुक्त कृषी संशोधन आणि विकास समिती बैठकीत स्मरणिकेचे प्रकाशन करताना मुख्यमंत्री आणि केंद्रीय कौशल्य विकास राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) राजीव प्रताप रुडी**

## कृषिनीती

राज्यसरकारतर्फे कृषी संदर्भातील जी नीती आहे, त्यामध्ये आमूलाग्र बदल केला आहे. वर्षानुवर्षे आपल्या कृषीचा विकास बघितला तर आम्ही हजार कोटी रुपये पुनर्वसनावर खर्च करतो. पीक गेले म्हणून पैसे द्यायचे, पाऊस पडला म्हणून पैसे द्यायचे, पाऊस आला नाही म्हणून पैसे द्यायचे, पीक करपले म्हणून पैसे द्यायचे, त्यामध्ये काही चूक नाही. पण हजारो कोटी रुपये देतो. लघु मुदतीचे पीक कर्ज आहे. यामध्ये आम्ही १२ हजार कोटी रूपये या पीक कर्जासाठी देतो. पण शेतीच्या क्षेत्रामध्ये जी गुंतवणूक व्हायला पाहिजे. ती इन्व्हेस्टमेंट क्रेडिट व्हायला पाहिजे, ती होत नाही. आम्ही बघितले तर मागील दहा–बारा वर्षांमध्ये आमची गुंतवणूक नगण्य आहे. याचा परिणाम हा आहे की, आम्ही शेतीला मॉईश्चर गॅरंटी देऊ शकत नाही, सिंचन आम्ही देऊ शकत नाही. सिचनांची शाश्वती दिली पाहिजे, ती देऊ शकत नाही. मग शेतकऱ्यांसाठी शाश्वत सिंचन आम्ही करू शकलो नाही. आपल्याला आश्चर्य वाटेल भांडवलाची कमतरता नाही. भांडवल हे होऊ शकते. परंतु तुमच्याकडे त्याप्रमाणे योजना असावयास पाहिजे. त्यात कौशल्य असले पाहिजे, जागतिक बँकेने सांगितले, आम्ही याचा अभ्यास केला. साधारणत: प्रस्ताव आल्यापासून निधी देण्यापर्यंत दोन वर्षाचा कालावधी लागतो. हा प्रस्ताव मांडला आहे. तो इतका चांगला आहे की, तुम्ही केंद्र सरकारच्या माध्यमातून आमच्याकडे पाठवाल; त्या दिवसापासून दीड महिन्याच्या आत आम्ही तुम्हाला निधी मिळवून देऊ. हे नियोजन कृषी विभागाच्या माध्यमातून केंद्राकडे पाठवले. कृषिमंत्र्यांशी बोललो, अरुण जेटली अर्थमंत्री आहेत त्यांच्याशी बोललो, आपल्याला आश्चर्य वाटेल. तिसऱ्या दिवशी कृषी मंत्रालयाने या नियोजनाला मंजुरी दिली. त्यानंतर चार दिवसात अर्थ मंत्रालयाने मंजुरी दिली आणि सातव्या दिवशी प्रस्ताव जागतिक बँकेकडे सादर केला. जागतिक बँकेचे पथक येत आहे. ठाण मांडून बसणार आहे. नुकतेच त्यांनी सांगितले की, तुम्ही कार्यालयाकरिता जागा उपलब्ध करून द्या. आम्ही त्याचे भाडे देऊ, आमचे पूर्ण पथक येथे येणार आहे. या ठिकाणी आम्ही संनियंत्रण करणार आहोत. दीड महिन्यामध्ये मान्यता देऊन एकूण ६०० मिलियन डॉलर्स दीर्घ मुदतीचे कर्ज अत्यंत कमी दराने उपलब्ध होणार आहे. ज्या ठिकाणी १००० कोटीची गुंतवणूक कोणी करत नाही, त्या ठिकाणी ५००० कोटी अशी गुंतवणूक ५ हजार गावांसाठी होणार आहे. यात आपला खारीचा म्हणून त्या ठिकाणी पायाभूत सुविधा आम्ही देणार आहोत.

तुम्हाला गरज कशाची आहे. ते तुम्ही ठरवायचे, आम्ही आर्थिक मदत व राजकीय पाठबळ पुरवू शकतो. जोपर्यंत शाश्वत अशा प्रकारचे संशोधन तुम्ही आमच्यासमोर आणणार नाही, तोपर्यंत हे शक्य होणार नाही. डॉ. दाणी आता २५६ सूचना पाठवणार आहात. शिफारशी पाठवणार आहात. माझी विनंती आहे की, आपण अशा शिफारशी पाठवाव्या की, ज्यामुळे महाराष्ट्राचे दृश्य बदलले पाहिजे. यापूर्वी अशा बैठका व्हायच्या. आपण ३ तास ३ दिवस बसायचो, खूप चर्चा करायचो, खूप सूचना यायच्या, आमच्या कार्यालयात कोणीही ढुंकूनही पाहत नव्हते, पण आता असे नाही. कृषी विभाग पूर्णपणे कार्यरत झाला आहे. शिफारशी व्यवहार्य वस्तुस्थितीवर आधारित असल्या पाहिजेत आणि त्याचा कालावधी १० वर्षे १५ वर्षे असा ठेवला तर काही फायदा होत नाही. तंत्रज्ञान इतक्या वेगाने बदलत आहे की, त्याचा कालावधी २ वर्षे, ३ वर्षे, १ वर्षे असावा. अशा प्रकारच्या जर सूचना केल्या तर मी असा विश्वास देतो की, संपूर्ण राज्य सरकार निश्चितपणे आपल्या पाठीशी उभे राहील.

**संकलन: युवराज पाटील (जिल्हा माहिती अधिकारी, अकोला)**







# शाश्वत शेती आणि दुष्काळावर मात

**गेल्या काही वर्षात सातत्याने हवामानात चित्रविचित्र बदल होत आहेत. दर दोन ते तीन वर्षांनी दुष्काळाचे सावट पडते. मध्येच एखाद्या वर्षी अतिवृष्टी कहर करते. चुकून कधी समाधानकारक पाऊसपाणी झालेच तर अवकाळी पाऊस, गारपीट हातातोंडाशी आलेली उभी पिके हिरावून नेते. पाऊस हंगामातच पडेल याची खात्री राहिलेली नाही. चार महिन्यांच्या पावसाळ्यात अवघ्या एक किंवा दोनच महिन्यात पाऊस, हंगामाची सरासरी गाठतो. त्यामुळे पूर्णतः मान्सूनवर अवलंबून असलेला खरीप हंगाम अपेक्षित उत्पन्न मिळवून देत नाही. अपुऱ्या पावसामुळे रब्बी हंगामातही पिके मिळेनाशी झाली आहेत. विशेषतः विदर्भातील अमरावती विभागात आणि मराठवाड्यातील बहुतांश सर्व जिल्ह्यात गेल्या काही वर्षांत हेच चित्र कायम असल्याचे दिसून येते. त्या पार्श्वभूमीवर राज्यातील कायमस्वरूपी दुष्काळावर मात करतानाच, शेतीमधील गुंतवणूक वाढवत नेत शेतीचा आणि शेतकऱ्यांचा शाश्वत विकास साधण्यासाठी राज्य सरकारने कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला आहे.**

**मारूती कंदले**

राज्याची अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे. पण, दुर्दैवाने गेल्या काही वर्षात राज्याच्या कृषी विकासाचा दर उणे आहे. वर्षानुवर्षे तीच ती पिके घेतल्यानेही उत्पन्न कमी होण्याचा धोका संभवतो. पारंपरिक पीक पद्धतीतही बदल अनिवार्य आहे. देशातील काही राज्यांमध्ये धानाच्या लागवडीसाठी संबंधित राज्य सरकारांकडून प्रोत्साहनपर अनुदान दिले जाते ते त्याचसाठी.

शेतमाल हमीभाव हा कळीचा मुद्दा आहे. हमीभाव धोरणातील अभावामुळे सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. पणन कायद्यात सुधारणा करून शेतकऱ्यांचे हित जोपासण्याची गरज आहे. थेट पणनच्या माध्यमातून मध्यस्थांची साखळी नेस्तनाबूत करण्याची आवश्यकता आहे. चांगले उत्पन्न मिळवून देणारे इतर स्रोत शेतकऱ्यांपुढे कसे उपलब्ध करता येतील याचाही विचार व्हायला हवा. विदर्भ, मराठवाड्यात सहकार चळवळीच्या वाढीला मर्यादा आहेत. त्यामुळे कृषिमाल प्रक्रिया उद्योग उभारले गेले पाहिजेत. भौगोलिक रचनेमुळे राज्यात सिंचनाला मर्यादा आहेत. ही बाब विचारात घेऊन ठिबक सिंचनाची व्याप्ती वाढवण्याची गरज आहे.

त्या पार्श्वभूमीवर राज्यातील कायमस्वरूपी दुष्काळावर मात करतानाच शेतीमधील गुंतवणूक वाढवत नेत शेतीचा आणि शेतकऱ्यांचा शाश्वत विकास साधण्यासाठी राज्य सरकारने कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला आहे. गेल्या वर्षातील दुष्काळापोटी राज्यातील शेतकऱ्यांना सुमारे चार हजार कोटी रुपयांची मदत वितरित करण्यात आली आहे. दुष्काळी भागात जमीन महसुलात सूट, दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक

शुल्कात माफी, आवश्यक तेथे पिण्याच्या पाण्याचे टँकर्स, कृषिपंपांच्या वीज बिलात ३३.५ टक्के सवलत आणि शेत पंपांची वीज जोडणी खंडित न करणे, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेती कर्जवसुलीस स्थगिती आणि गरजेनुसार चारा डेपो किंवा छावण्या सुरू करणे या उपाययोजना लागू केल्या आहेत. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना अनुक्रमे दोन आणि तीन रुपये इतक्या स्वस्त दराने गहू आणि तांदूळ पुरवण्यात येत आहे. तसेच विविध उपाययोजनांमुळे सरकारला शेतकरी आत्महत्यांवर नियंत्रण मिळवण्यात यश मिळाले आहे. तसेच येत्या काही दिवसात शेतकऱ्यांना पीक विम्यापोटी सुमारे साडेचार हजार कोटींची भरपाई दिली जाणार आहे. मधल्याकाळात राज्यात पिकांच्या लागवडीत मोठे बदल झाले आहेत. विदर्भ, मराठवाड्यात ६० ते ७० टक्के क्षेत्रावर सोयाबीनची लागवड होते. त्यामुळे इतर पिके कमी झाली. पीक पद्धतीतील बदलाची ही गरज ओळखून या वर्षी राज्य सरकारकडून डाळवर्गीय पिकांबाबत शेतकऱ्यांमध्ये जागृती करण्यात येत आहे. डाळवर्गीय उत्पादन आणि तेलबियांना वाढती मागणी आहे. या दोन पिकांवर भर देण्याचे सरकारचे धोरण आहे. या वर्षी तुरीसह इतर पिकांची जोड देण्याचा प्रयत्न आहे. केंद्र सरकारने राज्यासाठी तूर संशोधन केंद्र मंजूर केले आहे. येत्या काळात मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशात तूर संशोधन केंद्र उभारण्याचा प्रयत्न आहे. राज्य सरकारचा शेतीशी निगडित पणन आणि शेतमालाच्या मार्केटिंगवर भर देण्याचा प्रयत्न आहे. पीक पद्धतीत बदल करतानाच शंभर टक्के अनुदानावर, फळबाग लागवडीला प्रोत्साहन देण्याचे सरकारचे धोरण आहे. मनरेगातून ठिबक सिंचनही घेता येईल तसेच शेतमजुरीही देता येईल, या बाबींचा त्यात समावेश केला जाणार आहे. ठिबक आणि तुषार सिंचनासाठी सरकारचा आग्रह आहे. कमी पाण्यात अधिक उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे धोरण राबवण्यात येत आहे. राज्यात कृषी क्षेत्राला कृषी पर्यटनाची जोड देण्यात येत आहे.

### दीडशे लाख हेक्टरवर खरीप लागवड

यंदा चांगला पाऊस होईल असा अंदाज आहे. २० जूननंतर राज्यभर सर्वत्र पाऊस सुरू होईल, अशी अपेक्षा आहे. या वर्षी राज्यात खरीप हंगामात १५० लाख हेक्टरवर लागवडीचे नियोजन आहे. हंगामासाठी १४ लाख ४३ हजार क्विंटल बियाणे उपलब्ध करून देण्यात आले आहे. यातून १६२ लाख टन शेती उत्पादनाची अपेक्षा आहे.






कापसाची २९ लाख बियाणे पाकिटे उपलब्ध करण्यात आली आहेत. ४१ लाख ७५ हजार मेट्रिक टन खतांचा साठा उपलब्ध आहे. केंद्र सरकारने राज्यासाठी युरियाचे वाढीव वाटप मंजूर केले आहे.

### प्रधानमंत्री पीक विमा योजना शेतकऱ्यांच्या फायद्याची

नवीन प्रधानमंत्री पीक विमा योजना शेतकऱ्यांच्या हिताची आहे. अत्यंत कमी हफ्त्यात शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळणार आहे. त्यामुळे राज्य सरकारने ही योजना राज्यात अधिक प्रभावीपणे राबवण्याचा निर्धार केला आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना विम्याचे कवच मिळणार आहे. पूर्वीच्या योजनेतील सर्व त्रुटी आणि अडथळे दूर करण्यात आले आहेत. पूर्वी मंडल स्तरावर संपूर्ण शेतीचे नुकसान झाले असेल तरच शेतकऱ्यांना भरपाई मिळत होती. आता शेतकऱ्यांना वैयक्तिक स्तरावर विम्याचा लाभ होणार आहे. योजनेंतर्गत खरिपासाठी फक्त दोन टक्के आणि रब्बीसाठी दीड टक्का इतका तर फळबागांसाठी पाच टक्के इतका कमी हप्ता राहणार आहे. त्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून ९० टक्के अनुदान दिले जाणार आहे. ही योजना येत्या खरीप हंगामापासून राज्यात लागू करण्यात आली आहे. पिकासोबत रोपांच्या नुकसानीलासुद्धा या योजनेतून मदत मिळणार आहे. योजनेत काढणीपश्चात पिकांच्या नुकसानीचाही समावेश आहे. काढणीनंतर चक्रीवादळ, अवकाळी पाऊस यामुळे पिकांचे नुकसान झाल्यास विमा संरक्षण मिळणार आहे. तसेच शेतात पुराचे पाणी आल्याने होणारे नुकसान, भूस्खलन आणि गारपीट याशिवाय स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीलासुद्धा विमा संरक्षण मिळणार आहे. पीक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत पिकांच्या उत्पादनात येणारी घट विमा संरक्षणात समाविष्ट करण्यात आली आहे.

### १२ हजार कोटींचे पीक कर्ज वाटप

राज्यात चालू वर्षासाठी ५१ हजार २३५ कोटी रुपये पीक कर्ज वाटपाचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. त्यापैकी रब्बी पीक कर्ज वाटपासाठी १३ हजार ५६८ कोटी तर खरीप पीक कर्ज वाटपासाठी ३७ हजार ६७७ कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत ७ हजार ८६ कोटी ५२ लाख रुपये तर इतर बँकांनी ४ हजार ९७८ कोटी ४१ लाख रुपये असे एकंदरीत १२ हजार ६४ कोटी ९३ लाख रुपयांच्या पीक कर्जाचे वाटप झाले आहे. गेल्या वर्षीच्या खरीप हंगामातील दुष्काळग्रस्तांच्या १,१२४ कोटी रुपयांच्या पीककर्जाचे पुनर्गठन करण्यात आले आहे. अमर्याद खत वापरामुळे शेतीचे मोठी नुकसान होते. त्यासाठी शेतकऱ्यांमध्ये माती परीक्षणबाबत प्रबोधन गरजेचे आहे. गेल्या वर्षी राज्यात २८ लाख ४१ हजार शेतकऱ्यांना सॉईल हेल्थ कार्ड मृद आरोग्य पत्रिका वाटप करण्यात आले. यामध्ये राज्याचा, देशात पहिला क्रमांक आला.

**(लेखक हे सकाळ वृत्तपत्र समुहातील ॲग्रोवन दैनिकाचे मंत्रालय प्रतिनिधी आहेत.)**
**संपर्क : ०९९६७६१७५८५**



बोरगाव, जहागीर, ता. भोकरदन



तळणी, ता. अंबेजोगाई

# शिवार भरू लागले...

**मराठवाड्यात पूर्व मोसमी पावसात जलयुक्तचे यश दिसत आहे, ही बाब उल्लेखनीय असून हवामान खात्याच्या अंदाजानुसार चालू पावसाळा जर मराठवाड्याच्या पदरात चांगले माप टाकून गेला तर शासन आणि विविध पक्ष, संघटना आणि संस्था यांनी लोकसहभागातून हाती घेतलेल्या विविध कामांमध्ये चांगले पाणी साठेल आणि या विभागाचा चेहरामोहरा बदलून जाईल. हे होऊ शकते असा विश्वास जून महिन्याच्या पहिल्या पंधरवाड्यातच निर्माण झाला आहे. विभागातील निवडक जिल्ह्यातील माहिती...**



चुंबळी, ता. पाटोदा

मराठवाडा विभागात २०११ ते २०१५ या पाच वर्षापैकी २०१३ चा अपवाद वगळता उर्वरित सर्व वर्षात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. त्यातही २०१४ मध्ये ५३ टक्के आणि २०१५ मध्ये ५६ टक्के पाऊस झाला. २०१५ च्या पावसाळ्यात परभणी आणि नांदेड या तुलनेने हमखास पावसाच्या जिल्ह्यात तर ५० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला. बीड, लातूर आणि उस्मानाबाद यांचीही परिस्थिती वेगळी नव्हती. सततच्या अपुऱ्या पावसाचा विभागातील शेतीवर आणि पाण्याच्या उपलब्धतेवर विपरित परिणाम झाला. विभागातील बहुतेक गावे लागोपाठ दोनही खरीप हंगामात टंचाईग्रस्त ठरली. दोन वर्षाच्या अवर्षणाच्या पार्श्वभूमीवर सरलेला उन्हाळा विभागाची सत्त्वपरीक्षा घेणारा ठरला. विभागात

## गावे जलसमृद्ध होताहेत...



**पहिल्या पावसात जलयुक्त शिवारच्या कामांचे दिसणारे चांगले परिणाम दिलासा देणारे आहेत. जलयुक्त शिवार ही आता लोकचळवळ झाल्याने त्याचे दृश्य परिणाम दिसू लागले आहेत. ग्रामस्थ आणि प्रशासनाच्या अवघ्या काही महिन्यांचे परिश्रम व प्रयत्नांती सोलापूरमधील गावांमध्ये चार वर्षानंतर पाणीसंचय पाहायला मिळाला. यवतमाळजवळील किटा गावात जलयुक्त शिवार अंतर्गत झालेल्या कामांची पाहणी करत असताना येथील गावकऱ्यांशी संवाद साधला. या अभियानामुळे गावे जलसमृद्ध होतील, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला. त्यासोबतच स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरणासाठी आपण सर्वांनी जल, जमीन आणि जंगलांचे संवर्धन करायला हवे.**

**– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

पिण्याच्या पाण्यासाठी चार हजारांपेक्षा अधिक टँकर उपयोगात आणावे लागले. लातूर शहरासाठी थेट मिरजेहून रेल्वेने पाणी पुरवठा करावा लागला.

या पार्श्वभूमीवर मराठवाडा विभागात यंदाच्या पावसाळ्याला विशेष महत्त्व आहे. जूनचा पहिला पंधरवाडा उलटेपर्यंत विभागात मौसमी पाऊस दाखल झाला नव्हता. मात्र, मान्सून पूर्व पावसामुळे विभागातील काही जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजनेतील कामात पाणी साठले असून या योजनेत विभागाचा कायापालट करण्याचे सामर्थ्य आहे त्याचा प्रत्यय आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात सरकार अस्तित्वात आल्यानंतर जलसंधारण विभागाने ५ डिसेंबर, २०१४ ला शासन निर्णय जारी करून सर्वांसाठी पाणी – टंचाईमुक्त महाराष्ट्र–२०१९ ही भूमिका घेत टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राबवण्याचे ठरवले. या अभियानाचा मुख्य उद्देश पावसाचे पाणी गावाच्या शिवारात अडवण्याचा आणि भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करण्याचा आहे. या शासन निर्णयानुसार अभियानात पाणलोट विकासाची विविध कामे हाती घेण्यात येतात. तसेच साखळी सिमेंट नाला बांध उभारणी, नाला खोलीकरण, सरळीकरण, रुंदीकरण, जुन्या जलसंरचनांचे पुनर्जीवन, विविध तलावांतील गाळ काढणे, विहिरीचे आणि विंधन विहिरींचे पुनर्भरण करणे आदी कामे हाती घेण्यात येतात. जानेवारी २०१५ मध्ये या अभियानाला सुरुवात झाली. त्यानंतर विभागात विविध जिल्ह्यांत कामे हाती घेण्यात आली. वाढता लोकसहभाग हे या अभियानाचे महत्त्व आहे. लोकसहभागामुळे अभियानाला चळवळीचे स्वरूप आले. जेथे शासनाचा सहभाग नव्हता, अशा ठिकाणीही गावकऱ्यांनी एकत्र येऊन कामे हाती घेतली. विविध स्वयंसेवी संस्था, संघटना आदींनी लोकसहभागातून जलयुक्तसारखी कामे पुढे नेली.




**दृष्टिक्षेपात**

- **मागील वर्षी निवडलेली गावे – ६ हजार २०२**
- **या गावांमध्ये जलसंधारणाची साधारण १ लाख ७४ हजार ९९६ कामे पूर्ण, याशिवाय ३९ हजार ९०१ कामे प्रगतिपथावर.**
- **अभियानांतर्गत नद्या, तलाव, बंधाऱ्यांमधून काढलेला गाळ – ७५३.१७ लाख घनमीटर**
- **गाळ काढलेल्या, खोलीकरण, रुंदीकरण केलेल्या कामाची लांबी – २२३९.६ किमी**
- **उपरोक्त कामाची किंमत – ५४८.२० कोटी रुपये**
- **चालू वर्षी म्हणजे २०१६–१७ मध्ये निवडण्यात आलेल्या नवीन गावांची संख्या – ५ हजार २६३**
- **निर्मित पाणीसाठा क्षमता – ६ लाख ८८ हजार ५९६.९१ टीसीएम**
- **निर्मित संरक्षित सिंचन क्षमता –**
- **एक सिंचन दिल्यास – ६ लाख १५ हजार ८७० हेक्टर**
- **दोन सिंचन दिल्यास – ३ लाख ९ हजार ३२५ हेक्टर**

**लातूर**

निलंगा तालुक्यात जूनच्या पहिल्या दहा दिवसात सरासरी ८० मि.मी. पावसाची नोंद झाली. ९ जून रोजी २६ मि.मी. पाऊस झाला. त्यामुळे जलयुक्तांतर्गत पूर्ण करण्यात आलेल्या नाला सरळीकरणाच्या कामात पाणी साठले. लांबोटा येथे लोकसहभागातून सुमारे १.२ कि.मी. लांबीचे नाला सरळीकरणाचे काम झाले. या कामाला मुख्यमंत्र्यांनी भेट दिली होती. तेथे पाणीसाठा झाला आहे. लोकसहभागातून तेरणा नदीच्या पात्रातून गाळ काढण्यात आला. औराद परिसरात या नदीत पाणी साठले आहे. कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार निलंगा तालुक्यातील शेततळे, सिमेंट नाला बांध आदीत पावसाचे पाणी साठले असून त्याचा लगेच विंधन विहिरीतील पाणी पातळी वाढण्यात परिणाम दिसून येत आहे.

लातूर शहर आणि जिल्ह्यात व्यापक लोकसहभागातून असंख्य कामे झाली आहेत. लातूरजवळील मांजरा नदीच्या पात्रातील गाळ काढण्यासाठी अक्षरश: हजारो हातांनी मदत केली आहे. या आणि अशा कामांना यंदा निसर्गाकडून न्याय मिळेल अशी जिल्ह्यातील जनतेची अपेक्षा आहे. केवळ लोकसहभागातून

## लोकांच्या चेहऱ्यावरील आनंद हुरूप वाढवणारा – पंकजा मुंडे

**राज्यात झालेल्या पहिल्याच पावसातून जलयुक्त शिवारची अनेक कामे पाण्याने ओथंबून वाहू लागली. याबद्दल राज्याच्या ग्रामविकास आणि जलसंधारण मंत्री पंकजा मुंडे यांनी समाधान व्यक्त केले. त्या म्हणाल्या की, 'राज्य शासनामार्फत मागील साधारण दीड वर्षांपासून या अभियानातून राबवण्यात आलेल्या जलसंधारणाच्या कामांचे यश आता पावसाच्या आगमनानंतर अधोरेखित झाले आहे. नुकत्याच संपलेल्या उन्हाळ्यात जलसंधारणाची विविध कामे पूर्ण करण्यासाठी राज्याच्या जवळपास सर्वच भागात प्रशासनामार्फत मोठी मेहनत घेण्यात आली. आपण स्वत: मागील साधारण दीड महिन्यांच्या कालावधीत नांदेड, औरंगाबाद, बीड, लातूर, जालना, नाशिक, धुळे, सातारा, सांगली, रायगड या जिल्ह्यातील साधारण ६० ते ७० गावांना भेटी देऊन जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे, मनरेगा, नदी पुनरुज्जीवन कार्यक्रम, पाणंद रस्त्यांची निर्मिती आदी योजनांमधील कामांच्या अंमलबजावणीची पाहणी केली. शासन आणि लोकांच्या सहभागातून या गावांमध्ये जलसंधारणाची अनेक कामे उभी करण्यात आली आहेत.**



**राज्याच्या इतिहासात प्रथमच जलसंधारणाच्या चळवळीने प्रचंड वेग घेतल्याचे दिसले. या सर्व कामांना पावसाची प्रतीक्षा होती. ती पूर्ण झाली असून जलसंधारणाची सर्वच कामे पाण्याने ओसंडून वाहू लागली आहेत. लोकांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आपल्यासाठी खूप समाधानकारक असून कामाचा हुरूप वाढवणारा आहे. यापुढील काळातही जलयुक्त शिवार अभियान चळवळीच्या स्वरूपात राबवले जाईल. संपूर्ण महाराष्ट्र राज्य दुष्काळमुक्त करण्याचे स्वप्न या योजनेतून निश्चितच साध्य केले जाईल.'**

झालेले मांजरा, तेरणा, रेणा नदीतील गाळ काढण्याचे काम उल्लेखनीय आहे.

### बीड

जिल्ह्यात २७१ गावात विविध कामे हाती घेण्यात आली. १०२ गावातील कामे पूर्ण झाली आहेत. लोकसहभागातून सुमारे ४ कोटी १६ लाख रुपये किमतीचा गाळ काढण्यात आला. पूर्व हंगामी पावसातच पाणी साठा होण्यास सुरुवात झाली असून अंबाजोगाई, आष्टी, गेवराई अशा तालुक्यांमध्ये पाणीसाठा झाल्याची उदाहरणे आहेत. पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी या कामावर सतत लक्ष ठेवले आहे. या कामांच्या फलश्रुतीची त्यांनी दखल घेतली आहे. गेवराई तालुक्यातील खळेगाव आणि जिल्ह्यातील विविध कामांचे यश लक्षणीय आहे.



दूधगाव, ता. जिंतूर

### परभणी

एरवी हमखास पावसाचा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परभणी जिल्ह्यात गेली काही वर्षे पावसाचे प्रमाण कमी राहिले. यंदा शेतकरी पावसाची अतुरतेने वाट पाहत असताना परभणी आणि जिंतूर तालुक्यात मान्सूनपूर्व पावसामुळे जलयुक्तच्या कामाची परिणामकारकता दिसून येत आहे. नाला बांधाच्या खोलीकरणाची कामे परिणामकारक ठरत आहेत. दुधगाव परिसरात लघुसिंचन विभागाच्या माध्यमातून चार बंधाऱ्यांच्या उभारणीचे काम होत आहे. २० मिनिटाच्या पावसामुळे या बंधाऱ्यात पाणी साठले. जिल्ह्यात खोलीकरण केलेले ओढे काही ठिकाणी भरून वाहू लागले. हे वाहते पाणी पाहून शेतकरी आनंदित झाले आहेत.



निलंगा

### नांदेड

नांदेड जिल्ह्यात जलयुक्तच्या कामाचा चांगला परिणाम दिसून यायला सुरुवात झाली आहे. उगम ते संगम नाला खोलीकरण–रुंदीकरण–सरळीकरण अशा कामांमुळे पाणीसाठा होऊ लागला आहे. नागरिकांचा सहभाग, जिल्हा प्रशासनाचे प्रयत्न, लोकप्रतिनिधींचा पाठपुरावा, स्वयंसेवी संस्थांचा मोठा हातभार अशा घटकांमुळे अनेक कामे मार्गी लागली. धर्माबाद तालुक्यातील पिंपळगाव येथून वाहणारा नाला सुमारे २६ कि.मी. अंतराचा आहे. त्यातील गाळ उपसण्यात आला. या नाल्यात जूनच्या दुसऱ्या आठवड्यातच सुमारे ५ कोटी लिटर पाणी साठले आहे. अशाच तऱ्हेने इतर ठिकाणीही पाणी साठवण्यास सुरुवात झाली आहे.

### जालना

जालना जिल्ह्याच्या काही भागात गतवर्षी तुलनेने बरा पाऊस झाला होता. यंदा १० ते १३ जून या कालावधीत जिल्ह्यात पाऊस झाला. या पावसाने शेतकरी सुखावला. भोकरदन तालुक्यातील बोरगाव जहागीर येथील शेतकऱ्यांनी केलेल्या नाला खोलीकरण आणि सरळीकरणामुळे पहिल्या पावसात नाल्यात पाणी साठले आणि त्याचा परिणाम शेतातील विहिरी आणि विंधन विहिरीच्या पाणी पातळीवर झाला, असे सांगितले. या गावचे सरपंच तसेच सुभाष कुदर, भीमराव कुदर या ग्रामस्थांनी नाला खोलीकरणामुळे गावातील पाणी गावात राहिले आणि त्यामुळे पाणी पातळी वाढल्याचे सांगितले.

मराठवाडा विभागात अक्षरश: शेकडो गावात विविध स्वरूपाची कामे झाली आहेत. यंदा जूनच्या पहिल्या पंधरवाड्यात सुरुवातीला थोडाफार पाऊस झाला आणि नंतर मौसमी पावसाचे आगमन निदान १८ जूनपर्यंत झाले नव्हते. अशाही परिस्थितीत जलयुक्तच्या कामातून कोणते परिवर्तन घडणार आहे, याची चुणूक विभागात दिसून आली. पावसाने साथ दिली तर या अभियानाचे विलक्षण परिणाम दिसून येणार असून त्याचा परिणाम विभागाचा चेहरामोहरा बदलण्यात तसेच जनतेच्या आत्मविश्वासात वाढ होण्यात होणार आहे.

### समाधान आणि आनंद

मागील वर्षी ६ हजार २०२ गावांमध्ये जलयुक्त शिवार अभियान राबवण्यात आले. या गावांमध्ये जलसंधारणाची साधारण १ लाख ७४ हजार ९९६ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. आता या कामांचे दृश्य यश दिसून येत आहे. नुकत्याच झालेल्या पावसामध्ये यातील जवळपास सर्वच कामांमध्ये भरीव



बोरगाव, जहागीर, ता. भोकरदन



पिंपळगाव, ता. धर्माबाद



**समृद्ध शेती सुखी महाराष्ट्र**

## व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेतला आढावा

**जलयुक्त शिवार योजनेबाबत आढावा घेण्यासाठी वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्र्यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी नुकताच संवाद साधला.**

**महाराष्ट्र सुदूर संवेदन व उपयोगिता केंद्र यांच्यामार्फत, जलयुक्त शिवार योजनेच्या कामांची ऑनलाईन नोंदणी करणाऱ्या सॉफ्टवेअरचे प्रात्यक्षिक; या वेळी सादर करण्यात आले. या नव्याने कार्यान्वित होणाऱ्या ऑनलाईन डाटा प्रणालीमध्ये प्रत्येक कामाचे जीओ टॅगिंग होणार असून सिमनिक प्रणालीवरील तांत्रिक मर्यादा संपुष्टात येणार आहे. तालुकास्तरावर डेटा नोंदणीचे काम केले जाणार आहे.**

**जलयुक्त शिवार योजनेच्या कामाचा अहवाल १ सप्टेंबरपासून ऑफलाइन स्वीकारला जाणार नाही. तो अहवाल ऑनलाइनच द्यावा, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. त्याचबरोबर या कामांची माहिती देणारे नेव्हिगेशन मोबाइल ॲप तयार करावे, जेणेकरून ज्या भागात दौऱ्यावर जाऊ तेथे; या ॲपद्वारे मोबाइलवर जलयुक्त शिवार योजनेच्या कामांची माहिती मिळेल. जलयुक्त शिवार योजनेंतर्गत सोलापूर, बीड या जिल्ह्यांमध्ये चांगल्या प्रकारे काम झाले असून, ज्या जिल्ह्यांमध्ये जलयुक्तची कामे पूर्ण झाली आहेत, ती गावे वॉटर न्यूट्रल करण्यासाठी आणि ते गाव जलस्वयंपूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या.**

जलसाठे निर्माण झाले आहेत. त्यामुळे मागील वर्षी निवडलेली जवळपास सर्वच गावे यंदाच्या पावसानंतर आता टंचाईमुक्त झाली आहेत, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. जलयुक्त शिवार अभियानातून चालू वर्षासाठी ५ हजार २६३ गावांची निवड करण्यात आली आहे. या गावांमध्ये जलसंधारणाची साधारण १४ हजार ५१७ कामे हाती घेण्यात आली आहेत.

मागील अनेक वर्षांपासून न वाहिलेल्या नद्या पाण्याने भरून वाहताना पाहून अनेक गावांतील लोकांनी आनंद व्यक्त केला आहे. केज तालुक्यातील केजडी नदी ही मागील सुमारे १५ वर्षानंतर वाहू लागली. जलयुक्त शिवार अभियानातून याचे पुनरुज्जीवन करण्यात आले आहे.

उमरगा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) बेनीतुरा नदी ही गेल्या २२ वर्षांपासून आपले अस्तित्वच हरवून बसली होती. पण शासन आणि या तालुक्यातील मुरुम गावातील गावकऱ्यांच्या एकत्रित सहभागातून या नदीच्या खोलीकरणाचे काम करण्यात आले. नुकत्याच झालेल्या मान्सूनपूर्व पावसातच ही नदी भरून वाहू लागली. गारवाड आणि तरंगफळ (जि. सोलापूर) या गावातही जलयुक्त शिवारची कामे मोठ्या प्रमाणात यशस्वी झाली आहेत. गेल्या चार वर्षांपासून या गावात पिण्यासाठी पाणी नव्हते, टँकर चालू होता. आता जलसंधारणाच्या कामांमधून भरपूर पाणी साठले असून पिण्याच्या पाण्याबरोबरच शेतीसाठी पाणी उपलब्ध झाल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. साळुंकेवाडी (ता. अंबेजागाई, जि. बीड) येथील रेणा नदीवर करण्यात आलेले काम, लातूर जिल्ह्यातील मांजरा नदीचे करण्यात आलेले खोलीकरण आणि रुंदीकरण, बावी (ता. शिरुर), एकनाथवाडी (ता. पाथर्डी, जि. अहमदनगर) अशा अनेक गावांमध्ये करण्यात आलेल्या जलयुक्त शिवार अभियानाच्या विविध कामांमधून मोठ्या प्रमाणात जलसंधारणाची एक क्रांतिकारी चळवळच निर्माण झाली आहे.

**राधाकृष्ण मुळी (प्रभारी माहिती संचालक, मराठवाडा),**
**इर्शाद बागवान (विभागीय संपर्क अधिकारी, मुंबई)**

**कृषी प्रधान भारताच्या शेतकऱ्यांनी हवालदिल होऊ नये. शेतीवरचा त्यांचा विश्वास उडू नये आणि खर्चावर आधारित उत्पन्नाची हमी कोणत्याही परिस्थितीत मिळावी यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'लोहडी' या उत्तर भारतातील कृषी संस्कृतीच्या सणाच्या दिवशी १३ जानेवारीला 'प्रधानमंत्री फसल विमा योजने'ची सुरुवात केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेची, राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याचे मनोगत व्यक्त केले असून; या वर्षी शेतकऱ्यांनी या योजनेंतर्गत पीक विमा काढावा यासाठी यंत्रणा सज्ज केली आहे. सोबत कृषी, महसूल आणि ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांना या योजनेपासून शेतकरी वंचित राहणार नाही यासाठी; स्वयंप्रेरणेने पुढे येण्याचे आवाहन केले असून, गावातील कोणीही या योजनेपासून वंचित राहणार नाही याची काळजी स्वयंसेवी संघटनांनी, तरुणांनी घ्यावी असे आवाहन केले आहे.**

# प्रधानमंत्री फसल विमा योजना



**उमा नाबर**

गेल्या काही वर्षातील वातावरण बदलाचा फार मोठा फटका कृषी क्षेत्राला बसला आहे. वातावरणातील बदलामुळे देशाच्या अनेक भागात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. शेती कोरडवाहू असतानाही, पावसाची हमी असल्यामुळे पूर्वी उत्तरप्रदेश, विदर्भ, मराठवाडा, बुंदेलखंड आणि देशातील अनेक भागात पुरेसे पीक येत होते. मात्र हल्ली पावसाचे तंत्र बिघडल्याने मोठ्या भूभागावरील शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे.देशाच्या मोठ्या भागात हे संकट उभे ठाकले असून या सर्व शेतकऱ्यांना आर्थिक कवच देण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यापूर्वीच्या सर्व विमा योजनांपेक्षा शेतकऱ्यांना अधिक फायदेशीर आणि संकटात जगण्याची उभारी देणारी योजना तज्ज्ञांकडून करून घेतली. १३ जानेवारीला तीळसंक्रातीच्या पर्वावर उत्तर भारतात कृषी परंपरेत महत्त्वाचे स्थान असणाऱ्या 'लोहडी' या सणाला या योजनेची घोषणा करण्यात आली.

### प्रधानमंत्री फसल विमा

सामान्य शेतकऱ्याला सुलभतेने हप्ता भरता यावा यासाठी शेतकऱ्याच्या विमा हप्त्यामध्ये मोठ्या प्रमाणात घट करण्यात आली आहे. शेतकऱ्याचा वाटा अत्यल्प ठेवण्यात आला असून खरीप पिकांसाठी केवळ २ टक्के तर रब्बीसाठी दीड टक्का रक्कम भरावी लागणार आहे. बागायती पिकांसाठी ही रक्कम ५ टक्के आहे.



**समृद्ध शेती सुखी महाराष्ट्र**

- या नव्या योजनेमध्ये विमा हप्त्यावर कोणत्याही अटी ठेवण्यात आल्या नसून, जेवढ्या रक्कमेचा विमा काढला असेल; तर तेवढीच रक्कम मिळण्याची हमी देण्यात आली आहे. उदाहरणार्थ विमा ३० हजाराची रक्कम देण्याची हमी देत असेल, तर तेवढीच रक्कम शेतकऱ्याला नुकसान झाल्यावर मिळेल. त्यामध्ये कपात होणार नाही.
- शेतीच्या संदर्भातील नुकसानीच्या सर्व शक्यता आणि पेरणीनंतरच्या सर्व अघटितांना लक्षात घेऊन, ही योजना तयार करण्यात आली असून; पीक कापणीनंतरही (काढणीनंतर) १४ दिवसाच्या आत शेतात असणाऱ्या मालावर कोणतेही नैसर्गिक संकट आले, तरीही या संकटात शेतकऱ्यांना हमखास लाभ होईल; याची हमी देण्यात आली आहे.
- विमा प्रकरणाचा लवकर निपटारा व्हावा, शेतकऱ्यांना तत्काळ लाभ मिळावा यासाठी करण्यात येत असलेल्या पिकांकरिता कापणीनंतर १४ दिवसांपर्यंत संरक्षण देण्याची यामध्ये तरतूद आहे व ती स्थानिक आपत्ती व कापणीनंतरचे नुकसान याकरिता वैयक्तिक पंचनामे करण्याची तरतूद.

खराब हवामानामुळे सरासरीच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी उत्पन्न येण्याचा प्राथमिक अंदाज असल्यास विमा संरक्षणाच्या २५ टक्के नुकसानभरपाई आगाऊ देण्याची यामध्ये तरतूद आहे.



## असा भरा विमा

**नुकतीच खरिपाची सुरुवात झाली आहे. पुढील काही आठवड्यातच राज्य शासनामार्फत कृषी विभाग विमा भरण्याबाबतची सूचना जाहीर करणार आहे. शेतकऱ्यांनी या सूचनेकडे लक्ष ठेवावे. कृषी विभागामार्फत या योजनेची माहिती व अंतिम तिथी देखील जाहीर होते. या तिथीपर्यंत सर्व शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्य शासनातर्फे करण्यात आले आहे.**

## विम्याचा हप्ता कुठे भराल?

**आपल्या भागातील राष्ट्रीयकृत बँकांमध्ये पीक विमा संदर्भात विमा हप्ता भरण्याची सोय करण्यात येते. राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत विमा काढण्याचे आवाहन केल्यानंतर प्रत्येक शेतकऱ्याने नजीकच्या राष्ट्रीयकृत बँकेत जाऊन आपल्या पिकाचा विमा उतरून प्रधानमंत्री फसल योजनेचा लाभ घ्यावा.**

## कोणत्या पिकांसाठी किती विमा हप्ता भरायचा

**खरीप पिके :–** विमासंरक्षित रकमेच्या २ टक्के, **रब्बी पिके :–** विमासंरक्षित रकमेच्या १.५ टक्के

**नगदी पिके :–** विमासंरक्षित रकमेच्या ५ टक्के. यापुढील विमा हप्त्यातील देय रक्कम राज्य शासन व भारत सरकारद्वारे समप्रमाणात (५०:५०) देण्यात येईल.

साध्यासोप्या तंत्रज्ञानाचा वापर करून सर्वेक्षण पूर्ण करण्याची उपाययोजना केली आहे. रिमोट सेंसिंग तंत्रज्ञानाचा वापर करून तत्काळ उपाययोजना केल्या जातील.

### प्रधानमंत्री फसल विमा योजना वेगळी कशी...

फसल विमा योजना म्हणजे पीक विमा योजना. नव्या प्रधानमंत्री फसल विमायोजनेंतर्गत भारतीय कृषी विमा कंपनीबरोबरच योजनेत नमूद खासगी विमा कंपन्यांकडून विमा संरक्षण घेण्याची तरतूद आहे. योजनेचे राज्यातील नियंत्रण राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समितीद्वारे करण्यात येईल. योजना क्षेत्र घटक धरून राबवण्यात येईल.

योजना पीक कापणी प्रयोगाचा पूर्वीचा तपशील उपलब्ध असलेल्या सर्व पिकांसाठी राबवण्यात येईल. योजना कर्जदार शेतकऱ्यांना सक्तीची तर बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे. अपरिहार्य कारणासाठी काही ठिकाणी पेरणी न होऊ शकलेल्या प्रकरणातही, शेतकरी विमा संरक्षणाच्या २५ टक्के नुकसानभरपाईस पात्र ठरणार आहे. कापणी करून वाळवणी

### संरक्षण मिळणाऱ्या बाबी :

आग, वीज पडणे, वादळ, गारपीट, चक्रीवादळ, तापमानात वाढ, पूर, भूस्खलन, दुष्काळ, पावसातील खंड, रोग व किडीचा प्रादुर्भाव.

### विमा संरक्षण कसे मिळणार...

कर्जदार शेतकऱ्यांच्या बाबतीत त्याने घेतलेले कर्ज अथवा सरासरी उत्पन्न यापैकी, अधिक असेल ती रक्कम. बिगर कर्जदार शेतकऱ्यांच्या प्रकरणात सरासरी उत्पन्नाइतकी रक्कम.

### नुकसानभरपाई

जमा विमा हप्ता रक्कमेच्या ३५० टक्के अथवा विमा संरक्षण रक्कमेच्या ३५ टक्के यापैकी, अधिक असेल तेवढी रक्कम विमा कंपनीने द्यावयाची असून उर्वरित रक्कम भारत सरकार व राज्य शासनाने समप्रमाणात द्यावयाची आहे.

**(लेखिका या विविध विषयांवर लिहिणाऱ्या अभ्यासक आहेत.)**

# राज्यातील खेडी फायबर ऑप्टिक्सने जोडणार

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच अतिथी संपादक म्हणून 'महाराष्ट्र टाइम्स'च्या कार्यालयाला भेट दिली. या भेटीत त्यांनी 'मटा'मधील पत्रकारांच्या विविध प्रश्नांना अभ्यासपूर्ण व सविस्तर उत्तरे दिली. राज्यासंदर्भातील शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक मुद्दे आणि पायाभूत सुविधांविषयी त्यांना या वेळी प्रश्न विचारण्यात आले. त्यातील काही प्रातिनिधिक प्रश्नोत्तरांचा घेतलेला हा आढावा...**

शहरे आणि खेड्यांमधील दरी बुजवण्याची गरज प्रत्येकाला वाटत असते. राजकारणातील प्रत्येक व्यक्ती याविषयी भरभरून बोलते. मात्र, ही दरी प्रत्यक्ष बुजवायची कशी हे मोठे आव्हान आहे. हे आव्हान केवळ तंत्रज्ञानच पेलू शकते. त्यामुळेच यापुढे राज्यातील सर्व खेडी ही फायबर ऑप्टिक्सने जोडण्यात येणार आहेत'. 'अशी ११ हजार खेडी सध्या आम्ही निवडली आहेत. यामुळे शिक्षणाबरोबरच आरोग्य, शेती, कृषी आधारित व्यवसाय यात क्रांतिकारक बदल होतील'.

ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेकडे जगाचे मार्गक्रमण होत असतानाच खेड्यांमधील 'माणसांसमोर ही ज्ञानगंगा उभी राहिल्यास शहरांमधील विद्यार्थ्यांबरोबर खेड्यातील विद्यार्थीही स्पर्धा करेल. ग्रामीण भागातील विद्यार्थी हा शहरातील विद्यार्थ्याच्या तोडीस तोड आहे. ज्ञानात कुठेही कमी पडत नाही, त्याला अद्ययावत तंत्रज्ञानाने सुविधा पुरवण्याची गरज आहे. ते काम आम्ही करत आहोत. जे.जे. रुग्णालयामार्फत प्रायोगिक तत्त्वावर ई-मेडिसिनचा प्रयोग सुरू आहे. खेडी फायबर ऑप्टिक्सने जोडल्यावर आरोग्याच्या सुविधा ग्रामीण भागात पोहोचतील.

'एकीकडे शेतमालाला भाव नसल्याने शेतकरी आंदोलन करतात, तर दुसरीकडे अनेक शहरांमध्ये त्याच शेतमालाच्या चढ्या भावामुळे ग्राहक हैराण होतात, अशा वेळी तंत्रज्ञानाच्या मदतीमुळे दोन्ही घटकांचा फायदा होईल. कृषी उत्पन्न बाजार समितीबाहेर विकल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या मालावर बाजार समिती कर लावते, असा अन्यायकारक कर रद्द करण्याचा विचार मी करत आहे. दलालांपेक्षा शेतकरी आणि ग्राहक यांचा फायदा झाला पाहिजे', असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मुलाखतीच्या दरम्यान स्पष्ट केले.

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रम सुरू केला आहे. त्याचा राज्याला नेमका कसा फायदा होईल?**

कौशल्य विकासाचा बृहद् कार्यक्रम राज्यात हाती घेतला आहे. सात लाख लोकांना प्रशिक्षित करण्याचे काम सुरू आहे. स्किल सखीसारखी योजना ग्रामीण भागामध्ये लागू झाली आहे. ४० हजार महिला सध्या प्रशिक्षण घेत आहेत. या कार्यक्रमांतर्गत ४२ क्षेत्रांमध्ये १५०० कोर्स सुरू करण्यात आले आहेत. केंद्र सरकारने या अंतर्गत चांगले निर्णय घेतले आहेत. आयटीआय करणाऱ्यांना परत औपचारिक शिक्षण पद्धतीमध्ये समाविष्ट करण्यासाठी निर्णय घेण्यात आला आहे. कौशल्य विकासासाठीची मानके ऑस्ट्रेलिया आणि युके यांच्या मानकांनुसार तयार करण्यात आली आहेत.

**स्टार्टअपसाठी पुण्याची निवड**

मुंबई स्टार्टअपसाठी नैसर्गिक शहर आहे. त्यामुळे या शहराला स्टार्टअपसाठी वेगळ्या धोरणांची गरज नाही. मात्र पुण्यासारखे शहर आज



जागतिक नकाशावर येऊ पाहत आहे. या शहरांमध्ये स्टार्टअपसाठी चांगली क्षमता आहे. त्यामुळे राज्य सरकार त्या दृष्टीने धोरणे आखत आहे.

**नवीन शैक्षणिक धोरण होऊ घातले असून त्यात कोणत्या गोष्टींवर भर देण्यात येणार आहे?**

शाळा शिक्षणासाठी आहे, शिक्षकांकरता नाही. शिक्षकांना पगार द्यायला शाळा नाही. नवीन शिक्षण पद्धतीमध्ये डिजिटल लर्निंगवर भर देण्यात येणार आहे.

**गेल्या सुमारे वर्षभरापासून विद्यापीठ कायदा मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. त्यामुळे विद्यापीठातील अनेक कामे रखडली आहेत.**

### हा कायदा केव्हा येणार?

विद्यापीठ कायदा नव्याने करायचा आहे. या संदर्भात कार्यवाही सुरू आहे. समितीने त्याचा अहवाल दिला आहे. येत्या अधिवेशनात हा कायदा मंजूर होईल.

### कृषी विद्यापीठांमध्ये भरती सुरू

राज्यातील कृषी विद्यापीठांची अवस्था भरती बंद झाल्यामुळे अत्यंत हलाखीची झाली होती. मनुष्यबळाअभावी सगळा सावळागोंधळ सुरू होता. आता ही भरती प्रक्रिया आपण पुन्हा सुरू केली आहे.

### जलसंवर्धनाला गती देणार

राज्यात पावसाअभावी अनेक जिल्ह्यांना दुष्काळाचा फटका बसला आहे. त्यामुळे यापुढे जलसंवर्धनाच्या कामाला गती देण्यात येणार आहे. शहरी भागांमध्ये सांडपाणी प्रक्रिया करून ते पुन्हा वापरण्यायोग्य करण्यासाठी सक्तीचे नियम बनवले जाणार आहेत. विशेषत: वीजनिर्मितीसारख्या उद्योगांना तर ते सक्तीचेच केले जाणार आहे.

### कोस्टल रोड प्रकल्पाची सध्याची स्थिती काय आहे?

मुंबईसाठी आवश्यक असलेल्या कोस्टल रोडबाबत जवळपास सर्व परवानग्या मिळालेल्या आहेत. त्याचा विस्तृत प्रकल्प अहवाल तयार आहे. आता हा प्रकल्प निविदा प्रक्रियेच्या टप्प्यात आहे. त्यामुळे आगामी मुंबई महापालिका निवडणुकीपूर्वी या प्रकल्पाचा नारळ फोडला जाईल, असा मला विश्वास वाटतो. कोस्टल रोडच्या दुसऱ्या टप्प्याबाबत मात्र तिवरांचा प्रश्न असल्याने त्याविषयी मुंबई उच्च न्यायालयाची परवानगी लागणार आहे. ती मिळाल्यानंतर त्याचे नियोजन होईल.

### कचरा व्यवस्थापनाबद्दल काय योजना आहे?

राज्यात यापुढे कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेने कचरा व्यवस्थापनासंदर्भात जागा मागितली तर ती देतानाच तिच्यावर अटी टाकल्या जातील. त्या संस्थेला असेच खुल्या पद्धतीने कचऱ्याचे डम्पिंग करता येणार नाही.

सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना आम्ही याविषयीचे हँडबुक दिले आहे. त्यात कचऱ्याची विल्हेवाट शास्त्रोक्त पद्धतीने करण्यासाठी काय करायचे आहे, याचे सर्व मार्गदर्शन आहे. त्यामुळे त्यांना यापुढे कचऱ्याचे डम्पिंग न करता त्यावर प्रक्रिया करावी लागणार आहे. या कामी सर्व संस्थांना राज्य व केंद्र सरकारकडून अर्थसाहाय्य दिले जाणार आहे.

### महिलांच्या संदर्भातील गुन्हे नोंदवण्याचे प्रमाण वाढले आहे मात्र आरोप सिद्ध होण्याचे प्रमाण वाढलेले दिसत नाही, असे का?

गेल्या सरकारच्या काळातच तक्रारदाराला जास्त त्रास व्हायला नको असे धोरण ठरवण्यात आले होते. त्याशिवाय छेडछाड या शब्दाची व्याख्या अधिक व्यापक केली. गुन्ह्यांची वाढलेली नोंद ही चिंतेची बाब असली तरी हे समाजासमोर येत आहे, हे योग्य आहे. आरोप सिद्ध होऊन शिक्षा होण्याचे प्रमाण ९ टक्क्यांपर्यंत खाली गेले होते हे प्रमाण आता ४२ टक्क्यांवर आले आहे.

आम्ही सत्तेत आल्यानंतर १४ शासन निर्णय काढले. आरोप सिद्ध करण्याच्या प्रक्रियेत देशाच्या तुलनेत आपण का मागे पडत आहोत, याचा अभ्यास करून या प्रक्रियेमध्ये असलेले अडथळे दूर केले. आरोप सिद्ध होण्याचे, शिक्षा होण्याचे प्रमाण आता ५२ टक्क्यांपर्यंत वाढेल अशी आशा आहे. महिलांवरच्या गुन्ह्यांचे प्रमाण आणि पद्धती आज मोठ्या प्रमाणात वाढत आहेत त्या तुलनेत गुन्हे सिद्ध करणारी यंत्रणा अजून सक्षम झालेली नाही.

### लवकरच सर्वंकष टोलधोरण

राज्यातील टोल धोरणाबाबतचा त्यासंदर्भात नेमलेल्या समितीचा अहवाल आला असून राज्यासाठीचे एक सर्वंकष टोलधोरण आपण लवकरच जाहीर करणार असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

**सौजन्य: महाराष्ट्र टाइम्स**

### मेट्रो- ३ च्या कारशेडची सध्याची स्थिती काय ? पुणे मेट्रोबद्दल काय सांगता येईल?

**मेट्रो- ३ ची कारशेड आरेमध्ये करण्यासंदर्भात अनेक आक्षेप घेतले गेले. कापाव्या लागणाऱ्या झाडांची संख्या कमी केली तरी हे आक्षेप कायम होते. मेट्रोमुळे कार्बन फूटप्रिंट कसे कमी होईल, हा मुद्दा मांडला तरी नवे वाद होतच आहेत, त्यामुळे आता नव्या जागेवर आरक्षण टाकून कारशेडसाठी जागा निश्चित करण्यात आली आहे. सार्वजनिक वाहतूक सुधारण्यासाठी मेट्रो मुंबईच्या हिताची आहे. मेट्रो तीनचे वाद चुकीचे आहेत. उपनगरीय रेल्वे, मेट्रो, मोनो, बससेवा यांचे एकत्रित जाळे निर्माण झाले तर सार्वजनिक वाहतूक सुधारेल. त्यामुळे कार्बन फूटप्रिंट कमी होईल. या सेवा एकाच तिकिटाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न आहे. सार्वजनिक वाहतुकीची कार्यक्षमता वाढली की, त्याचा लोकांकडून अधिकाधिक वापर होईल. सार्वजनिक वाहतूक सेवा फायद्यामध्ये येईल असे नाही, पण आपण या सेवा कायम ठेवण्याइतक्या नफ्याचा विचार केला पाहिजे. वडाळा ठाणे मेट्रो ४ मार्गात एकाच विभागात स्थानकांची भाऊगर्दी करण्यात आली आहे, शिवाय ज्या ठिकाणी प्रवाशांचा अत्यल्प प्रतिसाद मिळेल असे अहवालात म्हटले आहे, अशा ठिकाणांचाही स्थानकांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे, असा आक्षेप घेतला जात आहे. मात्र जास्तीत जास्त लोकांना कनेक्टिव्हिटी मिळावी या दृष्टीने स्थानकांची आखणी करण्यात आली आहे. त्यामुळे स्थानकांमधील अंतर एक किलोमीटर असू शकते, तर काही स्थानकांमधील अंतर पाचशे मीटरही असू शकते. सध्या कमी प्रवासी अपेक्षित असलेल्या स्थानकांच्या परिसरात, भविष्यात होणाऱ्या विकासामुळे प्रवासी संख्या वाढू शकते.**



**याव्यतिरिक्त पुणे मेट्रोसंदर्भातील सगळ्या समस्या सुटल्या आहेत. येत्या काही दिवसात पुणे मेट्रोला चालना मिळेल. या मेट्रोसंदर्भातील विषय केंद्र सरकारच्या विशेष समितीपुढे गेला असून येत्या काही दिवसांत त्यावर निर्णय घेण्यात येईल.**

# चेतना अभियानाची लोकचळवळ



**यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयात शेतकऱ्यांना भाजीपाला विक्री सुरू करण्याची परवानगी दिल्यानंतर स्वागत करताना जिल्हाधिकारी सचिंद्र प्रताप सिंह.**

**परिस्थितीशी दोन हात करताना आलेल्या हतबलतेमुळे शेतकरी आत्महत्या करत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या स्थैर्य निर्माण करून देण्यासोबतच, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी यवतमाळ आणि उस्मानाबाद जिल्ह्यात बळीराजा चेतना अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीमुळे बळीराजा चेतना अभियान या दोन्ही जिल्ह्यात लोकचळवळ झाली आहे. प्रशासनाच्या साथीला जनतेची साथ लाभल्याने गेल्या काही महिन्यात जिल्ह्यात आत्महत्या कमी झाल्या आहेत. अशा प्रकारच्या घटना घडणार नाही, असे वातावरण या अभियानातून निर्माण होत आहे.**

शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या स्थैर्य निर्माण करून देण्यासोबतच, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे फार आवश्यक आहे. त्यासाठी यवतमाळ येथे जिल्हाधिकारी सचिंद्र प्रताप सिंह आणि उस्मानाबाद येथे जिल्हाधिकारी डॉ. प्रशांत नारनवरे यांच्या नेतृत्वात दोन्ही जिल्ह्यांत बळीराजा चेतना अभियान राबवण्यात येत आहे. अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीमुळे बळीराजा चेतना अभियान दोन्ही जिल्ह्यांत लोकचळवळ झाली असून, प्रशासनाच्या साथीला जनतेची साथ लाभल्याने गेल्या काही महिन्यात आत्महत्या कमी झाल्या आहेत. जिल्हा शंभरटक्के आत्महत्यामुक्त करण्याच्या दृष्टीने हे एक आशादायी चित्र आहे.

### कीर्तनकारांनी गावे काढली पिंजून

यवतमाळ येथे जिल्हाधिकारी सचिंद्र प्रताप सिंह यांच्या आवाहनाला साद देत शेकडो कीर्तनकार या अभियानात स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले. अक्षरश: कीर्तनकारांनी गावे पिंजून काढली. विशेष म्हणजे कोणताही मोबदला न घेता जिल्ह्यातील जवळपास १०० कीर्तनकारांनी स्वयंस्फूर्तीने शेतकऱ्यांना धीर देण्याचे मोलाचे काम अभियानातून केले आहे, तर उस्मानाबादमध्ये अशाच प्रकारचे समाधान मेळावे आयोजित करण्यात आले आहेत.

### शेतकऱ्यांच्या मदतीला ग्रामसमित्या

या अभियानांतर्गत प्रत्येक गावात ग्राम समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. महसुली गावांच्या ठिकाणी समित्या सध्या कार्यरत आहेत. या समितीत सरपंच अध्यक्ष असून गावातील प्रतिष्ठित नागरिक, गावात असलेले माजी सैनिक, वकील व डॉक्टर यांच्यासह सर्व गावस्तरीय कर्मचाऱ्यांचा समितीत समावेश आहे.

समितीच्या या सदस्यांना गावातील शेतकऱ्यांना आधार देण्यासोबतच त्यांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी करावयाच्या कामाचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रत्येक महसूल गावाला प्रत्येकी १ लाख रुपये देण्यात आले आहेत. १५ कोटी रुपये यासाठी ग्रामपंचायतींना देण्यात आले आहेत. गावात अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांस ५००० रुपये रक्कम यासाठी दिली जाते. गावात कुणी गंभीर आजारी असेल तर आजाराचा खर्च, बी–बियाण्याची सोय नसल्यास त्यावर खर्च करता यावा अशी तरतूद आहे. शिवाय शेतकऱ्यांचे प्रबोधन करणारे विविध कार्यक्रम या १ लाख रुपयांतून गावागावांमध्ये घेतले जात आहेत. शिवाय शेतकऱ्यांना काही अडचण असल्यास ग्रामसमितीमार्फत ती तातडीने सोडवली जात असल्याने आपल्या पाठीशी लगेच धावून येणारे कुणी आहे, अशी भावना त्यांच्यात निर्माण होत आहे.

### बळीराजा शेतमाल विक्री बाजार

शेतकऱ्यांच्या कृषी मालाला चांगला भाव मिळणे आवश्यक आहे. ग्राहकांसाठी थेट विक्रीचा अनोखा उपक्रम जिल्ह्यात सुरू करण्यात आला आहे. विविध शासकीय कार्यालयांनी आपल्या आवारात असा शेतमाल विक्री बाजार भरवावा असे आदेशच यवतमाळचे जिल्हाधिकारी सचिंद्र प्रताप सिंह यांनी काढले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात भरणारा बाजार शेतकऱ्यांच्या थेटमाल विक्रीचे उत्तम उदाहरण ठरले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व कर्मचारी घरी जाताना, या बाजारातून वस्तू खरेदी करीत असल्याने त्यांना चांगल्या प्रतीच्या मालासोबतच; शेतकऱ्यांनाही यामुळे चांगला फायदा होत असल्याचे चित्र नजरेस पडत आहे.

## बळीराजा सामूहिक विवाह सोहळा

मुलींच्या लग्नावर होणारा खर्च बरेचदा सामान्यांच्या आवाक्याबाहेरचा असतो. या खर्चातून सुटका करण्यासाठी शासनाची शुभमंगल सामूहिक विवाह योजना आहे. बळीराजा चेतना अभियानांतर्गत जिल्ह्यात बळीराजा सामूहिक विवाह मेळावे मोठ्या प्रमाणावर घेतले जात आहेत. यवतमाळ जिल्ह्यात १४ ठिकाणी असे मेळावे घेण्यात आले. या मेळाव्यात शेतकऱ्यांच्या ४९२ मुलामुलींचे विवाह लावून देण्यात आले आहेत.



## अभियानांतर्गत राबवण्यात येणाऱ्या ठळक बाबी

अभियानाच्या यशस्वितेत दोन्ही जिल्ह्यातील ग्रामस्तरीय समित्यांची भूमिका फारच मोलाची ठरली आहे. गावातील नापिकी, कर्जबाजारी व इतर कारणाने आर्थिक संकटात असलेल्या कुटुंबांना ओळखून त्यांच्या याद्या तयार करणे व त्यांच्यातील नैराश्य दूर करण्यासाठी त्यांचे समुपदेशन करण्याचे महत्त्वाचे काम गावसमिती करीत आहे. नैराश्यातील कुटुंबाची पेरणीची सोय नसल्यास गावसमितीच्या निधीतून पेरणी करून देणे, गावकऱ्यांचे मनोबल वाढवणारे कार्यक्रम गावातच राबवणे, शाहीर, कीर्तनकार, प्रवचनकार, कलापथकाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रबोधन, तणाव व व्यसनमुक्तीचे कार्यक्रम घेणे, कमी खर्चाच्या शेतीबाबत मार्गदर्शन, गावांमध्ये आरोग्य शिबिरे, शेतकऱ्यांना संजय गांधी निराधार अनुदान व अन्नसुरक्षेसारख्या वैयक्तिक योजनेचा लाभ, शेतीविषयक तसेच शेतकरी हिताच्या योजनांची जनजागृती आदी बाबींवर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

## उस्मानाबादमधील उपाययोजना

या अभियानांतर्गत उस्मानाबाद जिल्ह्यातही अनेक उपक्रम राबवले जात असून त्याला व्यापक प्रतिसाद मिळत आहे.

**शेतकरी साहाय्यता कक्ष :** शेतकऱ्यांच्या अडचणी निवारण्यासाठी शेतकरी साहाय्यता कक्षाची स्थापना केली. याद्वारे शेतकऱ्यांच्या कर्जासंबंधी, वीजबिल, वीजपुरवठा नुकसानभरपाई आदी संबंधीच्या वेगवेगळ्या तक्रारी लेखी व दूरध्वनीद्वारे घेतल्या आणि त्या तक्रारी तत्काळ सोडवण्याची मोहीम हाती घेतली.

**शेतकऱ्यांच्या माहितीचे संकलन :** गावनिहाय शेतकऱ्याबाबतची सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक सविस्तर माहिती संकलित केली. ही संपूर्ण माहिती कृषी मित्र या संकेतस्थळावर ऑनलाइन करण्यात आली आहे.

**शेतकरी समाधान मेळावे :** शासनाच्या विविध योजनांचा लाभ एकाच ठिकाणी घेता यावा, तसेच सर्व विभागाची माहिती एका ठिकाणी मिळावी यासाठी शेतकरी समाधान मेळावे आयोजित केले असून या मेळाव्यात विविध शासकीय विभागांबाबत माहिती देणारे स्टॉल लावण्यात आले. शेतकऱ्यांना व त्यांच्या पाल्यांना विविध प्रमाणपत्रांचे वाटप या शिबिरात केले गेले.



**सावकारीविरुद्ध कडक कारवाई :** सावकाराकडून कर्ज घेतलेल्या ८४ शेतकऱ्यांचे ७ लाख रुपये कर्जमाफी प्रस्ताव मंजूर करण्यात आले. यामुळे सावकारीच्या पाशात अडकलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

**शेतकरी अपघात विमा योजनेची प्रभावी अंमलबजावणी :** शेतावर काम करताना किंवा अन्य कारणाने काही अपघात झालेल्या शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत तातडीने शेतकरी अपघात विमा योजना मंजूर केली गेली.

**एक लाखापर्यंतचा बोजा सातबाऱ्यावरून कमी:** रिझर्व्ह बँकेचे एक लाखांपर्यंत, सातबाऱ्यांवर काही बँकांनी बोजा न टाकण्याचे निर्देश असतानाही; सातबाऱ्यांवर बोजा टाकला होता. ही बाब उघडकीस आल्यानंतर सर्व बँकांना अशा शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावरील एक लाख कर्ज असलेला बोजा कमी करण्याचे आदेश देण्यात आले.

**शेतकऱ्यांसाठी आरोग्य शिबिर :** शेतकऱ्यांसाठी ग्रामीण भागात मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, त्यांच्यावर आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात उपचारव्यवस्था त्याचबरोबर तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत मोबाइल सर्जिकल कॅम्पही घेतले गेले.

## आत्महत्यांमध्ये कमालीची घट

बळीराजा चेतना अभियान आणि प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊ लागला आहे. त्यांच्यात मनोधैर्य निर्माण करण्याचे प्रयत्न त्यांना मानसिक आधार देत आहेत. त्यामुळेच आत्महत्येच्या प्रमाणात घट होऊन आशादायी चित्र निर्माण होत आहे.

**मनोज सानप (जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद),**
**मंगेश वरकड (जिल्हा माहिती अधिकारी, यवतमाळ)**



# नमामी चंद्रभागेतून पंढरपूरचा कायापालट

**‘ चंद्रभागे स्नान, तुका म्हणे हेचि दान’, याप्रमाणे या पवित्र नदीत स्नान करतात अशा या चंद्रभागा नदीचे शुद्धीकरण करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला. हा कार्यक्रम सरकारच्या माध्यमातून जनतेचा व्हावा यासाठी नमामी चंद्रभागा प्राधिकरण स्थापन करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.**

**गोविंद अहंकारी**

***जेव्हा नव्हते चराचर***
***तेव्हा होते पंढरपूर !***
***जेव्हा नव्हती गोदा– गंगा***
***तेव्हा होती चंद्रभागा***

अशी पंढरीच्या आणि चंद्रभागेची आध्यात्मिक परंपरा आणि कीर्ती आहे, आषाढी, कार्तिकी, माघी, चैत्री व अन्य एकादशीला देशभरातून लाखो भाविक सावळ्या विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी श्रीक्षेत्र पंढरपूरला मोठ्या भक्तिभावाने येतात. विठ्ठलाचे दर्शन घेण्याबरोबरच येथील पवित्र अशा चंद्रभागेत स्नान करणे पुण्य समजले जाते.

**‘चंद्रभागे स्नान, तुका म्हणे हेचि दान’**, याप्रमाणे या पवित्र नदीत स्नान करतात अशा या चंद्रभागा नदीचे शुद्धीकरण करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला.

राज्याच्या २०१६–१७ च्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी नमामी चंद्रभागा प्रकल्पासाठी २० कोटी रुपयांची तरतूद केली. यानंतर त्यांनी प्रत्यक्ष पंढरपूर येथे येऊन चंद्रभागा नदीची पाहणी केली. संबंधित अधिकाऱ्यांसमवेत याबाबत बैठक घेऊन माहिती घेतली. चंद्रभागा म्हणजेच भीमा नदी, पंढरपूर येथे चंद्रकोरीचा आकार धारण करते म्हणून पंढरपूर पुरते ‘चंद्रभागा’ म्हणतात या नदीच्या शुद्धीकरणासाठी पंढरपूर येथे देशातील तज्ज्ञांना बोलावून नमामी चंद्रभागा परिषद घेण्याची घोषणा केली. त्याचप्रमाणे चंद्रभागा नदीच्या परिसरात तुळशीवन उभारण्याचा मनोदय व्यक्त केला. तसेच पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री बबनराव लोणीकर, पालकमंत्री विजय देशमुख, यांच्यासमवेत चंद्रभागा नदीची पाहणी केली. नदीचे पाणी दूषित होऊ नये, या अभियानातून नदीचे शुद्धीकरण करताना घाट बांधणे, सांडपाणी अडवून प्रकिया करणे आदी उपाययोजना करण्याबाबत निर्देश दिले.

याबाबत अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासमवेत अभ्यासगट स्थापन करण्यात आला. यामध्ये लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी रणजितकुमार यांचाही समावेश करण्यात आला. २८ मे २०१६ रोजी हा अभ्यास गट गुजरात दौऱ्यावर

अभ्यासासाठी जाऊन आला. गुजरातमधील साबरमती नदीघाटाचे सौंदर्यीकरण, साबरमती आश्रम, गुजरात राज्यातील पाणीपुरवठा यंत्रणा, इत्यादींचा अभ्यास करण्यात आला. या दौऱ्यातील प्रत्यक्ष पाहणीचा फायदा नमामी चंद्रभागा योजनेसाठी होणार आहे.

हे अभियान यशस्वीपणे राबवण्यासाठी, १ जून २०१६ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत; देशातील या क्षेत्रातील तज्ज्ञांची परिषद अर्थमंत्री मुनगंटीवार यांच्या विशेष पुढाकाराने पार पाडली. या वेळी अर्थमंत्री यांनी हा कार्यक्रम सरकारच्या माध्यमातून जनतेचा व्हावा, यासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याचे व याद्वारे नदीच्या उगमापासून संगमापर्यंत समग्र आराखडा तयार करण्याचे आवाहन केले. अर्थमंत्री मुनगंटीवार यांनी केलेल्या मागणीनुसार नमामी चंद्रभागा प्राधिकरण स्थापन करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

चंद्रभागेच्या वाळवंटात स्नान करणे, भजन कीर्तन करणे हा वारकरी परंपरेतील मूळ गाभा आहे. या परंपरेला बाधा येऊ नये याची दक्षता आराखडा बनवताना घ्यावी, अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी या परिषदेत दिल्या. हे अभियान राबवताना मूळ तत्त्वज्ञानाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन नदी निर्मल, अविरत ठेवण्यास प्राधान्य द्यावे. शतकानुशतके प्रेरणा देणाऱ्या चंद्रभागा नदीचे गतवैभव या प्रकल्पातून प्राप्त झाले पाहिजे. भीमा नदीच्या उगमापासून, संगमापासून, शुद्धीकरण करण्यात येईल. या नदीच्या उपनद्या, ओढ्याच्या दुरुस्तीची कामे निश्चित कालावधीत पूर्ण करण्याचा निर्धार मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

देशभरात प्रदूषणमुक्तीचे काम करणाऱ्या चार संस्थांनी या परिषदेमध्ये मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सादरीकरण केले. यामध्ये नॅशनल एनव्हायरमेंटल इंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिट्यूट (निरी) यांच्यामार्फतच्या सादरीकरणात चंद्रभागेचे प्रदूषण कसे रोखता येईल, तिचे आध्यात्मिक महत्त्व कायम ठेऊन नदीकाठी विकासकामे कशी करता येतील; याबाबत माहिती देण्यात आली. तर साबरमती रिव्हर फ्रंट कॉर्पोरेशच्या वतीने सादरीकरण केले. गुजरातमधील साबरमतीचा विकास करीत असताना टप्प्याटप्प्याने पाण्याचे कसे शुद्धीकरण करण्यात आले. याद्वारे शहरात घडून आलेला बदल, पर्यटकांची वाढलेली संख्या आदींचा ऊहापोह करण्यात आला.

## तुळशी वन

पंढरीचा विठ्ठल आणि तुळस याचे नाते अन्यन्यसाधारण आहे. प्रत्येक वारकऱ्याच्या गळ्यामध्ये तुळशीच्या मण्याची माळ असते. तसेच पांडुरंगाला तुळशीची माळ आवर्जून घातली जाते. त्यामुळे पंढरपूर येथील यमाई तलावाजवळ तुळशी वृंदावन उद्यानाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. या तुळशी उद्यानामध्ये सर्व संतांची मंदिरे बांधणे, तुळशीचे असलेले महत्त्व, संतांची चरित्रे याचे शिलालेख लावण्यात येतील. त्यामुळे हे उद्यान एक आध्यात्मिक पर्यटन केंद्र बनवून वारकरी भक्तांना, पर्यटकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न आहे.




**तुळशी वृंदावन वन उद्यानाच्या संकल्पचित्रासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार, सहकार मंत्री चंद्रकांतदादा पाटील, पाणीपुरवठा मंत्री बबनराव लोणीकर, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री विजय देशमुख, वनविभागाचे सचिव विकास खारगे आणि इतर मान्यवर.**

तुळशीची मागणी आषाढी, कार्तिकी, माघी आणि चैत्री या वारीच्यावेळी जास्त असते. त्यामुळे या वनाव्यतिरिक्त पंढरपूरजवळील कासेगाव येथील वनखात्याच्या ५ हेक्टरवर विविध प्रजातीच्या तुळशी लावून त्याची देखभाल केली जाणार आहे. या प्रजाती भाविकांना पाहण्याची व्यवस्था केली जाणार आहे. याबाबत वनविभागाच्या वतीने परिषदेत सादरीकरण करण्यात आले.

जगभरात तुळशीच्या २४ प्रजाती आहेत. त्यापैकी आठ प्रजाती भारतात आढळतात. त्या सर्व प्रजातींची लागवड पंढरपुरातील तुळशी उद्यान आणि तुळशी वनात करण्यात येणार आहे. त्याद्वारे उत्पन्नाबरोबरच वारकऱ्यांमध्ये अतिशय महत्त्व असलेल्या तुळशीचे, अनोखे संग्रहालय साकारले जाणार आहे. नमामी चंद्रभागा शुद्धीकरणासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केलेले प्रयत्न स्वागतार्ह असल्याने भाविकात आनंद व समाधानाची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. राज्य शासनाने हे चांगले पाऊल टाकले आहे. हे काम पूर्ण करण्यासाठी शासनाच्या सूचनेनुसार प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी रणजितकुमार यांनीही विशेष लक्ष दिले आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर पंढरपूरचा निश्चित कायापालट होईल.

**(लेखक हे पुणे येथे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९८५००९७१७३**

## महात्मा जोतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना

महात्मा जोतिबा फुले यांच्या १२५ व्या स्मृती वर्षानिमित्त विद्यमान राजीव गांधी जीवनदायी आरोग्य विमा योजना नवीन स्वरूपात महात्मा जोतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना या नावाने २ ऑक्टोबर २०१६ पासून संपूर्ण राज्यात एकाच वेळी लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत नुकताच घेण्यात आला.



राज्यात सध्या राबवण्यात येत असलेल्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची मुदत १ ऑक्टोबर २०१६ रोजी संपत आहे. यापूर्वी ही योजना दोन टप्प्यात सुरू करण्यात आली होती. त्यामुळे राज्यात नव्याने एकाच टप्प्यात या स्वरूपाची योजना लागू करण्याचा सरकारचा मानस होता. त्यानुसार नवी योजना प्रस्तावित करण्यात आली होती. थोर समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांच्या १२५ व्या स्मृती वर्षात त्यांना अभिवादन करण्यासाठी या योजनेला त्यांचे नाव देण्यात आले आहे.

दर्जेदार व गुणवत्तापूर्ण विमा संरक्षणाद्वारे आरोग्य सेवा पुरविण्यासाठी ही योजना अधिक लोकाभिमुख करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील २ कोटी २६ लाख दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबांचा तसेच शासकीय आश्रमशाळा, अनाथालय व वृद्धाश्रम, पत्रकार व शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांतील शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबे या घटकांचा देखील यात समावेश करण्यात आला आहे.

योजनेच्या नवीन स्वरूपानुसार वैद्यकीय उपचारांच्या संख्येत वाढ, उपचारावरील खर्चाच्या मर्यादेत वाढ, अंगीकृत रुग्णालयांच्या संख्येत वाढ, आरोग्य मित्रांची नियुक्ती, कॉल सेंटरच्या सेवेत विस्तार, वेब ॲप्लिकेशन, योजनेच्या समित्यांमध्ये नवीन सदस्यांचा समावेश, योजनेमध्ये नोंदणीकृत पत्रकारांचा समावेश आणि शस्त्रक्रियेसाठीच्या दरापेक्षा जास्त येणारा खर्च भागविण्यासाठी सोसायटीकडे अतिरिक्त निधी देण्याची तरतूद यांचा समावेश आहे. योजनेंतर्गत समाविष्ट उपचार पद्धतींवरील उपचारासाठी कुटुंबातील एक किंवा सर्व सदस्यांसाठी वार्षिक विमा संरक्षण रक्कम प्रतिवर्ष प्रतिकुटुंब दीड लाख रुपयांवरून दोन लाख रुपये एवढी करण्यात आली आहे. तसेच मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ही मर्यादा प्रतिवर्ष प्रतिकुटुंब अडीच लाखांवरून तीन लाख रुपये करण्यात आली आहे. यामध्ये दात्याच्या शस्त्रक्रियेचा समावेश करण्यात आला आहे. तसेच या योजनेंतर्गत उपचार सुरू होण्यापूर्वी असलेल्या आजारांचा समावेश यामध्ये राहील.

## नागरिकांच्या तक्रारींचा गतीने निपटारा

लोकआयुक्त आणि उप लोकआयुक्त यांनी सन २०१४ चा आपला ४२ वा एकत्रित वार्षिक अहवाल राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्याकडे ३ जून २०१६ रोजी राजभवन येथे सादर केला. या वेळी लोकआयुक्त म. ल. टहलियानी, उप लोकआयुक्त डॉ. शैलेशकुमार शर्मा व संबधित अधिकारी उपस्थित होते.



राज्य शासनाच्या वतीने किंवा सार्वजनिक प्राधिकारी (लोकसेवा) यांनी केलेल्या प्रशासकीय कार्यवाहीचा तपास करण्यासाठी आणि पीडित व्यक्तींकडून आलेल्या तक्रारींवर लोकआयुक्त कार्यालयाकडे तोडगा काढला जातो. या कार्यालयाकडे २०१४ या वर्षात ५८६० नवीन तक्रारी नोंदवण्यात आल्या आहेत. तसेच मागील वर्षाच्या ४८०७ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित असल्याने एकूण १०,६६७ प्रकरणाची चौकशी करण्यात आली. त्यापैकी ६६८५ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत, असे या अहवालात नमूद केले आहे. या संस्थेने सांविधिक स्वातंत्र्याचा पूर्ण वापर करून नि:पक्षपातीपणे आणि जलद गतीने नागरिकांच्या तक्रारीचे निवारण केले आहे.

## तारांकित

### प्रधानमंत्र्यांनी जिंकले चिमुकलीचे हृदय

माझ्या पत्रास आपण साद दिली. त्यामुळे माझ्यावर योग्य ते उपचार झाले. आता मी शाळेत जाऊ शकते, थँक्यू मोदीजी... हे उत्तर पुण्यातील हडपसर येथील सहा वर्षांची चिमुकली वैशाली मोहनीश यादव हिचे.

वैशालीला जन्मजात हृदयरोग होता आणि उपचारासाठी इतर सर्वसामान्य गरीब रुग्णांप्रमाणे तिची आणि कुटुंबीयांची परवड



सुरू झाली. शस्त्रक्रियेसाठी कुटुंबीयांकडे पैसे नव्हते. वैशालीचे वडील रंगकामाचा व्यवसाय करतात. अनेकांकडे हात पसरूनही कोणाकडूनही मदत मिळाली नाही. अखेर मदतीचे सर्व मार्ग बंद झाल्यानंतर या चिमुकलीने थेट प्रधानमंत्र्यांना उपचारासाठी आवाहन करणारे पत्र लिहिले. पत्रासोबत तिचे वैद्यकीय अहवाल आणि शाळेचे ओळखपत्र जोडले होते.

दरम्यान प्रधानमंत्री कार्यालयाने वैशालीच्या पत्राची तातडीने दखल घेतली आणि वैशालीच्या उपचारांचा मार्ग मोकळा केला. पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना प्रधानमंत्री कार्यालयाकडून निर्देश आले आणि १५ दिवसांत तिच्यावर उपचार झाले.

## मुलांच्या स्वागताचा शाळेतील पहिला दिवस



प्राथमिक शिक्षण प्रत्येकाचा हक्क आहे. त्यामुळेच शालेय शिक्षणापासून कोणीही वंचित राहणार नाही यासाठी सामूहिक प्रयत्न करू या असे आवाहन शालेय शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी केले.

१५ जून रोजी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील शाळा सुरू झाल्या. विद्यार्थ्यांसाठी शाळेचा पहिला दिवस चैतन्यमय आणि उत्साहवर्धक व्हावा यासाठी स्वतः शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी शाळेत जाऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. तत्पूर्वी श्री. तावडे यांनी मंत्रालय ते लॉर्ड हॅरिस महानगर पालिका शाळेपर्यंतचा प्रवास शालेय बसमधून विद्यार्थ्यांबरोबर केला. या प्रवासादरम्यान श्री. तावडे यांनी शालेय विद्यार्थ्यांना खाऊ, फुगे तर दिलेच पण विद्यार्थ्यांना आपण शाळेत असताना करीत असलेल्या गमतीजमतीही सांगितल्या. यानंतर श्री. तावडे यांनी धोबीतलाव येथील लॉर्ड हॅरिस महानगर पालिका उच्च माध्यमिक सेमी इंग्रजी शाळेला भेट दिली आणि विद्यार्थांचे स्वागत करून तेथील महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

## धर्मांतरित बौद्धांना मिळणार केंद्र शासनाच्या सवलती

अनुसूचित जातीतून धर्मांतरित झालेल्या बौद्ध समाजातील बांधवांना केंद्र शासनाच्या नोकरी, शिक्षण व इतर योजना, सोयी सवलतींमध्ये अनुसूचित जातीचे सर्व लाभ मिळावे, यासाठी महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाकडे केलेल्या पाठपुराव्यास यश आले आहे. यासंदर्भात केंद्र शासन लवकरच सुधारित जात प्रमाणपत्र नमुना काढणार आहे.

केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे अनुसूचित जातीतून धर्मांतरित झालेल्या बौद्ध समाजातील बांधवांना मोठा लाभ होणार आहे, अशी माहिती महाराष्ट्राचे सामाजिक न्याय व विशेष सहाय मंत्री राजकुमार बडोले यांनी दिली. शास्त्रीभवन येथे केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्री थावरचंद गहलोत यांच्यासोबत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे मागील २६ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या अनुसूचित जातीतून बौध्द धम्म स्वीकारलेल्या लोकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न सोडवण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे.

# तारांकित

## वीरपत्नी स्वाती महाडिक

जम्मू-काश्मीरच्या कुपवाडा जिल्ह्यात दहशतवाद्यांशी मुकाबला करताना सातारा जिल्ह्यातील कर्नल संतोष महाडिक शहीद झाले. पतीची अर्धवट राहिलेली देशसेवा पूर्ण करण्याची जिद्द स्वाती यांच्यात निर्माण झाली आणि ही वीरपत्नी आता वीरश्री गाजवण्यासाठी पुढे आली आहे. सर्व्हिस सिलेक्शन बोर्डातर्फे निवड चाचणी नुकतीच घेण्यात आली. या चाचणीत त्या यशस्वी झाल्या तर अधिकारी पदावर काम करण्याचा



मार्ग मोकळा होणार आहे. स्वाती यांची ही संघर्षाची वाट काटेरी, अवघड आहे. त्यामुळेच त्यांचा निर्धार कौतुकास्पद आहे. सातारा जिल्ह्यात पोंगरवाडी येथे राहणारे महाडिक कुटुंब देशभक्तीने भारावलेले आहे.

संतोष यांच्या बलिदानानंतर कुटुंब हतबल झाले. पतिनिधनाच्या दु:खातून सावरत स्वाती यांनी पुढील काळात एस. एस.बी. (सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड) या लष्करात प्रवेश करणाऱ्या परीक्षेची तयारी सुरू केली. त्यासाठी त्या पुण्यात आल्या. सहा वर्षांची मुलगी कीर्ती हिला देहू रोड येथील बोर्डिंग शाळेत घातले. मुलगा स्वराज्य हाही पाचगणी येथील बोर्डिंग शाळेत शिकत आहे. लष्करात डॉक्टर होणे हे स्वाती यांच्या मुला-मुलीचे स्वप्न आहे. हे स्वप्न पूर्ण करणे ही स्वाती यांची जिद्द आहे. वीरश्री गाजविण्याचे स्वप्न बघणाऱ्या स्वाती सध्या बंगळूर येथे एस.एस.बी. परीक्षांतर्गत वैद्यकीय टप्पा गाठण्यासाठी सज्ज आहेत.

## वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहनचालकांसह मालकांवरही गुन्हे



वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ट्रक आणि बसच्या चालकांसह त्या वाहनांच्या मालकांवरही गुन्हे दाखल करण्यात येणार असून वेळप्रसंगी त्यांचे वाहन परवाने निलंबित केले जाणार असल्याची माहिती परिवहनमंत्री दिवाकर रावते यांनी राज्य रस्ता सुरक्षा परीषद समितीच्या बैठकीत दिली. राज्यातील ८५ टक्के अपघात हे वाहनचालकांच्या चुकीमुळे होतात तर फक्त १५ टक्के अपघात हे तांत्रिक कारणामुळे होतात. अपघात टाळण्यासाठी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर महिन्यातून दोन वेळा महामार्ग पोलीस आणि आरटीओ यांच्यामार्फत वाहनचालकांची व वाहनांची संयुक्त तपासणी करण्यात येणार आहे. यामुळे अवैध वाहतुकीला आळा बसेल. ट्रक व बसच्या चालकांना आठ तासांपेक्षा अधिक तास काम देऊ नये यावर उपाययोजना करण्यात येतील.

वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी, यापुढे नव्याने बनवण्यात येणाऱ्या महामार्गांच्या निविदा प्रक्रियेमध्ये महामार्गांवर सीसीटीव्ही कॅमेरे, स्पीड गन, तसेच स्पीड कंट्रोल यंत्रणा उभारण्याच्या तरतुदींबरोबरच; एखाद्या लेनवर अपघात झाल्यास वाहनचालकांना त्याची माहिती देणारे इंडिकेटर लावण्यासाठी यंत्रणा उभारणे आदी अटी ठेवण्यात येणार आहेत. मद्यपी वाहनचालकांना आळा घालण्यासाठी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील आयआरबीच्या दोन्ही टोलनाक्यांवर अल्कोमीटर बसवण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

## राज्यातील आपत्ती व्यवस्थापन/नियंत्रण कक्षांचे संपर्क क्रमांक

**राज्य आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय** ०२२-२२०२६७१२, १०७७ (टोल फ्री सर्व जिल्ह्यांसाठी) **ठाणे** ०२२-२५३०१७४० /२५३८१८८६, **रायगड** ०२१४१-२२२०९७, **रत्नागिरी** ०२३५२-२२६५४८, **सिंधुदूर्ग** ०२३६२-२२८८४७, **नाशिक** ०२५३-२३१७१५१, **धुळे** ०२५६२-२८८०६६, **जळगाव** ०२५७-२२२०८००/२२२३१८०, **अहमदनगर** ०२४१-२३२३८४४/२३५६९४०, **नंदुरबार** ०२५६४-२२१००६/२१०००६, **पुणे** ०२०-२६११४९४९/२६१२२११४, **सोलापूर** ०२१७-२७३१०१२, **सातारा** ०२१६२-२३२३४९/२३२१७५, **सांगली** ०२३३-२३७३००१/२३७३०६३, **कोल्हापूर** ०२३१-२६५९२३२, **औरंगाबाद** ०२४०-२३३१५०५/२३३१०७७, **बीड** ०२४४२-२२२३९१/२२२६०४, **नांदेड** ०२४६२-२३५०७७/२४८४१८, **परभणी** ०२४५२-२२३५५५ /२२३७०२, **उस्मानाबाद** ०२४७२-२२५६१८/२२७३०१, **जालना** ०२४८२-२२४७००/२२३१३२, **लातूर** ०२३८२-२२०२०४, **हिंगोली** ०२४५६-२२१७०१/२२१४५०, **अमरावती** ०७२१-२६६२५२२/२६६६४५४, **बुलढाणा** ०७२६२-२४२६८३/२४२४११, **अकोला** ०७२४-२४२४४४२/२४२४४४४, **यवतमाळ** ०७२६२-२४२३०६/२४२६८३, **वाशिम** ०७२५२-२३३४००/२३४२३८, **नागपूर** ०७१२-२५६४९७३/२५६९७६, **वर्धा** ०७१५२-२४०१०२/२४३४४६, **चंद्रपूर** ०७१७२-२५५३००/२५०३५०, **भंडारा** ०७१८४-२५२३४६/२५२२०५, **गडचिरोली** ०७१३२-२२२०३१/२२२०१७, **गोंदिया** ०७१८२-२३६१४७/२३०१९६, **पालघर** ०२५२५-२९७४७४, **मुंबई** ०२२-२२६६४२३२.



**संकलन : गजानन पाटील**

## तारांकित

### कैदी बनवणार महालक्ष्मीचा प्रसाद

कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिरातील प्रसाद बनवण्याचे काम कोल्हापूर कारागृहातील महिला आणि पुरुष कैद्यांकडून करून घेतले जाणार आहे. कोल्हापूर कारागृहाचे अधिक्षक आणि कोल्हापूरचे जिल्हाधिकारी यांनी या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे.

कोल्हापूरमध्ये दर्शनाला येणाऱ्या भाविकांना प्रसाद म्हणून पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीकडून ५ रुपयांमध्ये लाडूचा प्रसाद दिला जातो. कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमितकुमार सैनी यांनी देवस्थान समितीकडे लाडूचा प्रसाद महिला कैद्यांकडून तयार करून घेण्याचा प्रस्ताव ठेवला होता.



कोल्हापूरच्या कळंबा कारागृहामध्ये एकूण ७० महिला कैदी आहेत. या महिलांकडून हा प्रसाद बनवून घेण्यात येणार आहे. कैद्यांनी या निर्णयाचे स्वागत केले असून सकारात्मक भावना त्यांच्यात निर्माण झाली आहे. देवस्थान समितीचेही या निर्णयासाठी कौतुक होत आहे.

## मुख्यमंत्री फेलोशिप योजना

राज्यातील तरुणांना प्रशासनाच्या कामाचा अनुभव मिळण्याबरोबरच त्यांच्या विकासासाठी आवश्यक असणारे कौशल्य प्राप्त होण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम-२०१६ ही योजना सुरू करण्यात आली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

राज्यातील तरुणांमध्ये कौशल्याचा विकास व्हावा, यासाठी राज्य शासनाने कौशल्य विकास योजना सुरू केली आहे. त्याचबरोबर तरुणांना प्रशासकीय अनुभव मिळावा यासाठी मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम सुरू केला आहे. या प्रशासकीय कामाचा अनुभव या विद्यार्थ्यांना भविष्यात, खासगी तसेच सार्वजनिक क्षेत्रात काम करताना उपयोगी पडेल. युवकांमधील उत्साह, उमेद तसेच त्यांच्याकडील नावीन्यपूर्ण संकल्पनांचा उपयोग लोकहितासाठी करण्याच्या दृष्टीने; मुख्यमंत्र्यांनी या योजनेची घोषणा केली आहे.



मुख्यमंत्री फेलोशिप योजनेत २१ ते २५ वर्षे वयाच्या कोणत्याही शाखेच्या पदवीधर/ पदव्युत्तर पदवीधर तरुणाला सहभागी होता येणार आहे. त्यासाठी तो किमान ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण झाला असला पाहिजे. या योजनेत सहभागींचा कार्यकाळ ११ महिन्यांसाठी राहील. सहभागी झालेल्या तरूणांना ३५,००० रूपये प्रतिमाह विद्यावेतन दिले जाणार आहे तसेच नामांकित संस्था, उद्योग वा सार्वजनिक उपक्रम संस्थेतील किमान १ वर्षाचा अनुभव असलेले युवक या कार्यक्रमासाठी अर्ज करू शकतील. आयआयटी, आयआयएम, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये, एनआयटी, जेबीआयएमएस, व्हीजेटीआय, व्हीएनआयटी यासारख्या नामांकित शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांसाठी अनुभवाची अट शिथिल करण्यात आली आहे. तसेच हा ११ महिन्याचा कालावधी पूर्ण करणाऱ्या तरुणांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

सामाजिक क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या युवकांना महत्त्वपूर्ण अनुभव मिळवून देण्याच्या उद्देशाने, या कार्यक्रमाची रचना करण्यात आली आहे. युवकांमध्ये नेतृत्वगुण विकसित करण्यासोबत, त्यांच्यात प्रशासकीय कामकाजाची जाण निर्माण करणे व भविष्यात सार्वजनिक क्षेत्रात काम करण्यासाठी त्यांना तयार करणे ही उद्दिष्टे आहेत. या कार्यक्रमाच्या माध्यमातून शासनासोबत काम करण्याची संधी तरुणांना मिळणार आहे. शासनाच्या नियोजन विभागाच्या अखत्यारित अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

## निवडणूक वार्ताचे प्रकाशन

राज्य निवडणूक आयोगातर्फे प्रकाशित होणाऱ्या 'निवडणूक वार्ता'च्या पहिल्या अंकाचे प्रकाशन राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते नुकतेच झाले. निवडणूक वार्ता हे न्यूजलेटर दरमहा प्रकाशित करण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. या अंकात राज्य निवडणूक आयोगासंदर्भातील माहिती व गेल्या काही दिवसांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकासंदर्भातील घटना व घडामोडींचा संक्षिप्त तपशील देण्यात आला आहे. निवडणुकांशी संबंधित सर्व अधिकारी/ कर्मचारी, मतदार, राजकीय पक्ष, उमेदवार, अभ्यासक, पत्रकार इत्यादींसाठी हा अंक उपयुक्त आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या या अंकास शुभेच्छा देताना श्री. विद्यासागर राव म्हणाले, 'राज्य निवडणूक आयोगाने गेल्या वर्षभरात निवडणूक सुधारणांच्याबाबतीत केलेल्या उपाययोजना कौतुकास्पद आहेत. सर्व निवडणुका, त्या संदर्भातल्या घटना, घडामोडींची माहिती निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्व अधिकारी, कर्मचारी, राजकीय पक्ष, मतदार आणि अभ्यासकांना व्हावी; हेच 'निवडणूक वार्ता'चे प्रयोजन असल्याचे राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी सांगितले.




## तारांकित

### पहिला तास मुख्यमंत्र्यांचा

'वा छान आता सर्वांना भरपूर पाणी मिळेल.. तर मुलांनो आपण आज काय शिकलो ! संघटित झाल्यास आपण आपला विकास करू शकतो.... ' वेळ दुपारी १.०० वाजता.. स्थळ वाघोली येथील जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा.. वर्ग होता इयत्ता पहिलीचा.. आणि शिक्षक होते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ! कसे मिळेल पाणी.. ही कथा त्यांनी सांगितली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हवेली तालुक्यातील वाघोली येथील जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा क्रमांक १ आणि २ येथे भेट देऊन इयत्ता पहिली आणि इयत्ता चौथीतील



विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कसे मिळेल पाणी ही कथा मुलांना सांगून स्वत:च्या गावातील पाण्याची समस्या व संघटितपणे त्यावरील केलेली उपाययोजना हा संदेश यातून दिला. त्यानंतर दिव्या कादे, वैष्णवी जाधव आणि सिद्धी सातव यांना शाळा प्रवेश प्रमाणपत्राचे वाटप केले. चॉकलेटचे वाटपही त्यांनी यावेळी केले. यानंतर इयत्ता चौथीमधील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. 'मी कचरा करणार नाही, कुणालाही करू देणार नाही, स्वच्छता पाळेन, सगळ्यांना स्वच्छता पाळायला लावीन, माझा परिसर आणि माझा देश स्वच्छ ठेवीन,' अशी प्रतिज्ञा त्यांनी मुलांना दिली.

**''मी यूपीएससी तयारी मागील सहा-सात वर्षापासून करीत असल्यामुळे मला कुठल्याही गोष्टीचा त्रास झाला नाही. माझ्या लहानपणी माझ्या आईने निश्चित केले होते की, मला आयएएस बनायचे आहे. त्या दृष्टिकोनातूनच तिने माझ्याकडून अभ्यासाची तयारी करवून घेतली. नकळत माझेही तेच ध्येय झाले. त्यासाठी मी माझ्याकडून शंभर टक्के प्रयत्न केले.''**



नागरी सेवा परीक्षेत देशातून पहिल्या आलेल्या टीना डाबी.

# संयम आणि नियोजन

अरुण पाटणकर

नुकत्याच लागलेल्या २०१६ च्या संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत दिल्लीची टीना डाबी हिने अत्यंत दुर्लभ असा तिहेरी मुकुट जिंकला आहे. तिहेरी असा की, प्रथमतः या परीक्षेत प्रथम प्रयत्नात कोणत्याही क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांची संख्या अत्यल्प असते. त्यातच पहिल्या प्रयत्नातच सर्वप्रथम क्रमांकाचा कळस गाठणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण तर नगण्य असते. दुसरे म्हणजे या परीक्षेला बसण्यासाठी विहित पात्रतेच्या सर्वांत कमी म्हणजे २१ वर्षाच्या वयातच असे यश प्राप्त करणे त्याहून कठीण असते. तिसरे म्हणजे मागासवर्गीय कुटुंबातील कन्येने सर्व खुल्या स्पर्धेत सिद्ध करून भारतात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला. विशेष म्हणजे गणित, विज्ञान, अभियांत्रिकी आणि वैद्यकशास्त्राचे विद्यार्थी या परीक्षेत अधिकाधिक प्रमाणाने उत्तीर्ण होतात. या संदर्भात कला शाखेतील टीना हिचे यश अद्वितीय आहे. खरे तर १९४७-४८ मध्ये यूपीएससीच्या स्पर्धा परीक्षांना प्रारंभ झाल्यानंतर अशा तिहेरी विक्रमाचा टीनाचा हा सर्वकालीन रेकॉर्ड आहे. डाबी कुटुंबीयांशी झालेल्या माझ्या चर्चेत मला टिनाच्या या उत्तुंग यशाचा सार्थ आनंद आणि अभिमान जाणवला.

टीना यांच्या आई श्रीमती हिमानी डाबी या स्वतः भारतीय अभियंता सेवेत वरिष्ठ पदावर कार्यरत होत्या. मात्र २००६ ला त्यांनी स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतली. यावरून हिमानी त्यांचा त्याग किती मोठा आहे याची प्रचिती येईल. त्यांच्या टीना या कन्येने त्यांच्या या त्यागाचे आणि सातत्याच्या मार्गदर्शनाचे पूर्ण सार्थक केले असून, यशाचे शिखर गाठले आहे. टीना आणि तिच्या आई हिमानी या दोघीही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्राने प्रेरित झाल्या आहेत. हिमानी यांच्या आजी सुचिता कांबळे या मूळच्या भंडारा जिल्ह्यातील तुमसर येथील असून त्याही बुद्धिमान व सुसंस्कृत होत्या. त्यांच्या पुढकाराने हिमानी यांनी हिंदुस्थानी संगीतात देखील पदवी प्राप्त केली आहे. टिनाचे वडील जसवंत डाबी यांचे कुटुंब जयपूर येथील आहे. जसवंत हे दूर संचार विभागात वरिष्ठ पदावर आहेत.

टीनाचा जन्म नोव्हेंबर १९९३ मध्ये झाला. टीनाने शालान्त आणि पदवी परीक्षेत उज्वल यश मिळविले होते. बारावी परीक्षेत तिला राज्यशास्त्रात ९८ टक्के गुण मिळाले होते. २०१४ मध्ये तिने राज्यशास्त्रातच बीए ऑनर्स ही पदवी प्राप्त केली. तिच्या कॉलेजमध्ये ती त्या वर्षीची सर्वोत्तम विद्यार्थी म्हणून निवडली गेली. आय.ए.एस. परीक्षेसाठी तिचा राज्यशास्त्र हाच विषय होता. या परीक्षेसाठी तिने पाच वर्षे नियमित, सखोल अभ्यास केला. टीनाला इंग्रजी कादंबऱ्या वाचायला आवडतात. मधुबनी पेंटिग करणे हा तिचा आवडता छंद आहे. टीनाची धाकटी बहीण रिया हीदेखील अतिशय बुद्धिमान असून तिने बारावी परीक्षेत ९४ टक्के गुण मिळवले आहेत. प्रशासकीय सेवा परीक्षेत यशस्वी होण्याचे तिचे ध्येय आहे. टिनाच्या या अनन्यसाधारण यशामुळे देशभरातील मुलींना प्रेरणा मिळणार आहे. तिने स्वतःला सिद्ध करताना अनेकांना प्रेरित केले आहे.

## टीना महाराष्ट्राची सुकन्या

**महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट म्हणजे टीना डाबीच्या आई हिमाली या वर्धा जिल्ह्यातील पुलगावच्या कांबळे कुटुंबातील आहेत. हिमानी या स्वतः उच्चशिक्षित आहेत. त्या इलेक्ट्रिकल इंजिनियरिंगच्या प्रथम श्रेणीतील पदवीधर असून, त्यांची ग्रुप अे मधील अखिल भारतीय अभियांत्रिकी सेवेत १९८९ मध्ये नियुक्ती झाली. २००६ मध्ये, दोन मुलींच्या शिक्षणावर संपूर्ण लक्ष केंद्रित करण्यासाठी त्यांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. टीनाचे आजोळही महाराष्ट्रातील भंडाऱ्याचे आहे. त्यामुळे ही दिल्लीकर कन्या महाराष्ट्रीयन आहे.**

(लेखक हे निवृत्त सनदी अधिकारी आहेत) संपर्क : ०९३२४४०११५०

### भारतीय प्रशासकीय सेवेचीच का निवड केली?

दोन कारणांसाठी.. एक तर मी अकरावीपासूनच कला शाखेची विद्यार्थीनी होते. त्यामुळे माझ्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवेत जाणे उपयुक्त होते. दुसरे कारण भारतीय प्रशासकीय सेवा ही अत्यंत प्रतिष्ठेची सेवा मानली जाते. संपूर्ण सेवादरम्यान लोकसेवा करायला मिळते.

### मुलींमधून आपण प्रथम क्रमांक मिळवला, कसे वाटते आहे?

खूपच छान वाटत आहे. सीबीएसई, आयसीआयसी, यूपीएससीचे निकाल पाहिल्यावर लक्षात येते की, मुली पहिल्या क्रमांकाने येत आहेत. मी त्याचाच एक भाग आहे, याचा मला अभिमान आहे.

### तुमचे पुढील काय नियोजन आहे?

माझे सध्याचे वय शिकण्याचे असून अधिकाधिक शिकण्याकडे माझा कल असणार आहे. प्रशिक्षण कालावधीदरम्यान जास्तीत जास्त शिकण्याकडे लक्ष केंद्रित करणार आहे. तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांकडूनही शिकण्यासाठी मी सदैव तत्पर राहीन. मला भारत सरकार ज्या जिल्ह्यात पाठवेल तेथे मी उत्कृष्ट प्रशासकीय सेवक बनण्याचा प्रयत्न करेन.

### हरयाणा कॅडरची का निवड केली?

हरयाणा राज्यात काम करणे ही एक आव्हानात्मक संधी आहे. या राज्यात मुलींचे प्रमाण कमी आहे. मात्र वर्तमान केंद्र शासनाने हरयाणा राज्यात 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या योजनेचा शुभारंभ केला आहे. याचा भाग बनून महिला या नात्याने माझ्याकडून मी योग्य ती जबाबदारी पार पाडेन.

#### यशाची सूत्रे

- **विषयाच्या पाठांतरापेक्षा समजून घेणे जास्त गरजेचे.**
- **वक्तशीरपणा, संयम तसेच नियोजन ही त्रिसूत्री आवश्यक.**
- **स्वत:ची एक विचारपद्धती, लेखनशैली विकसित करा.**
- **फेसबुक व इतर समाज माध्यमांपासून शक्यतो दूर राहा.**
- **टीव्ही कमीतकमी वेळ पाहा.**
- **केवळ कोचिंगवर अवलंबून राहू नका.**



### भारतीय प्रशासकीय सेवेत येऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना काय सांगाल?

यूपीएससी अभ्यासक्रमाची व्याप्ती खूप मोठी असल्यामुळे ती थकवणारी आहे. परीक्षेचा कालावधी जवळपास दोन वर्षांचा असतो. या दरम्यान कधी निराशा, थकवा हा येतच असतो. परंतु सातत्याने स्वत:ला जागवत, प्रोत्साहित करत राहायला हवे. तसेच यादरम्यान वक्तशीरपणा, संयम, नियोजन असणे अत्यंत गरजेचे आहे. उमेदवारांनी पाठांतरापेक्षा समजून घेणे जास्त गरजेचे आहे. ज्याची आठवण कमीत-कमी पुढच्या आठ ते दहा वर्षांसाठी असायला पाहिजे. यूपीएससीची तयारी करताना कोचिंगही महत्त्वपूर्ण आहे. यामुळे नेमके काय-काय वाचावे हे लक्षात येते. योग्य मार्गदर्शन मिळते. परंतु नुसते कोचिंगवर विसंबून राहणेही चुकीचे आहे. स्वत:ची एक विचारपद्धती, लेखनशैली असणे गरजेचे आहे.

### युपीएससीची तयारी करताना काय-काय आव्हाने होती?

यूपीएससीची तयारी हे जरी आव्हानपूर्ण असले तरी अभ्यासातील सातत्यामुळे कुठलीही गोष्ट अशक्य नाही. मी शाळेत आणि कॉलेजमध्ये अभ्यासात चांगली होते. त्यामुळे अभ्यासाचे मला अजिबात ओझे वाटले नाही. जिल्हाधिकारी म्हणून काम करताना त्या भागाची संपूर्ण जाण असणे आवश्यक असते. त्यामुळे प्रत्येक क्षेत्राबद्दल वाचावे लागते. यूपीएससीचा अभ्यासक्रम काहीसा रटाळ असल्यामुळे काही वेळा निराशा यायची. त्या वेळेस आई माझ्या पाठीशी सदैव उभी असायची.

### ग्रामीण भागातील ज्या मुली यूपीएससीची तयारी करू इच्छितात त्यांना काय सल्ला देणार?

ग्रामीण भागातील मुलींना थोडे कठीण असले तरी अशक्य नाही. आजच्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ऑनलाइन मोफत अभ्यासक्रमही उपलब्ध करून देण्यात येत आहे. सोबतच कोचिंग क्लासेसतर्फे तज्ज्ञ शिक्षक विषयानुषंगाने मार्गदर्शन करतात. याबाबतची माहिती करून घेणे महत्त्वाचे आहे.

### कोणत्या महापुरुषाच्या विचाराने आपल्याला सर्वाधिक प्रभावित केले आहे?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने मी सर्वाधिक प्रभावित झाली आहे. कारण त्यांनी महिलांविषयी मांडलेले विचार आजच्या काळात उपयोगी आहेत. राष्ट्राचा विकास हा तेथील महिलांच्या विकासावर अवलंबून असतो हे त्यांचे मत आजही बरोबर आहे, ते आपल्याला समाजात वावरताना जाणवते.

**शब्दांकन: अंजू निमसरकर-कांबळे**
**(लेखिका या नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रात माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९८९९११४१३०**

# अविरत आणि अथक



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नाशिक येथे प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक सत्र क्र. ११३ चे दीक्षान्त संचलन नुकतेच पार पडले. या संचलनात ७४९ प्रशिक्षित पोलीस उपनिरीक्षक सहभागी झाले होते. यापैकी २४६ महिला अधिकारी होत्या. प्रबोधिनीच्या इतिहासात सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणार्थीचा 'स्वॉर्ड ऑफ ऑनर' सन्मान मिळवणाऱ्या मीना भिवसेन तुपे या पहिल्या महिला अधिकारी ठरल्या. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आलेले १० पैकी ७ पुरस्कार महिला अधिकाऱ्यांनी पटकावले.**

नाशिक येथील पोलीस प्रशिक्षण प्रबोधिनीच्या परेड मैदानावर प्रवेश करताक्षणी समोरच्या बाजूस उभारलेली किल्ल्याच्या तटबंदीची प्रतिकृती लक्ष वेधत होती. परेड कमांडर प्रियंका गोरेच्या खणखणीत आवाजातील ऑर्डरने सर्वत्र शांतता पसरली. काही क्षणातच छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जयजयकार झाला आणि बँडच्या तालावर शिस्तबद्ध पावले मैदानाकडे पडू लागली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक सत्र क्र. ११३ च्या दीक्षान्त संचलनाची ही पूर्वतयारी. एका महिला अधिकाऱ्याने संचलनाचे नेतृत्व करावे हे नवल राहिले नसले तरी या कार्यक्रमाला साजेसे होते. ''सदरक्षणाय् खलनिग्रहणाय'' हे ब्रीद स्वीकारून लोकसेवेत रुजू होणाऱ्या ७४९ प्रशिक्षित पोलीस उपनिरीक्षकांपैकी, २४६ महिला अधिकारी होत्या. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे एक प्रकारचा आगळावेगळा विक्रम प्रस्थापित करीत, प्रबोधिनीच्या इतिहासात सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणार्थीचा 'स्वॉर्ड ऑफ ऑनर' सन्मान मिळवणाऱ्या; मीना भिवसेन तुपे, या पहिल्या महिला अधिकारी ठरल्या. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आलेले १० पैकी ७ पुरस्कार महिला अधिकाऱ्यांनी पटकावले.

**डॉ. किरण मोघे**

प्रबोधिनीच्या इतिहासात प्रथमच महिला प्रशिक्षणार्थीला प्रशिक्षणातील सर्वोच्च 'स्वोर्ड ऑफ ऑनर' (मानाची तलवार) हा सन्मान मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त करून तो मिळवणाऱ्या मीना तुपे यांचे मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले. देशातील नारीशक्तीच्या उदयाचे हे द्योतक असून समाज पुढे जात असताना महिलाशक्तीने पुढे येणे गरजेचे आहे. प्रशिक्षणात सहभागी महिला अधिकाऱ्यांच्या रूपाने पुढे जाणाऱ्या देशाचे चित्र पाहावयास मिळाले, ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया बोलकी आहे. प्रबोधिनीच्या इतिहासात सोनेरी पान लिहिणाऱ्या मीना तुपे यांचा पुरस्कार अनेक अर्थाने महत्त्वाचा आहे. कोणतीही शिक्षणाची पार्श्वभूमी नसताना, गरीब शेतकरी कुटुंबातील महिलेने मिळवलेले हे यश अनेकांच्या कौतुकाचा विषय ठरले. बीड जिल्ह्यातील दगडी शहाजहापूर गावात पाच एकर जमिनीवर घाम गाळणाऱ्या, भिवसेन तुपे यांच्यावर घरातील इतर सहा सदस्यांची जबाबदारी. अशा परिस्थितीत त्यांनी तीन मुलींची लग्ने

**सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणार्थीचा 'स्वॉर्ड ऑफ ऑनर' सन्मान मिळवणाऱ्या मीना भिवसेन तुपे**



**आईकडून कौतुकाचा वर्षाव.**

केली. कोणीच सातवीपेक्षा जास्त शिकले नाही. मीना मात्र त्याला अपवाद ठरली. तिने गावातील प्राथमिक शाळेत शिक्षण घेतल्यावर पारगाव हायस्कूलला माध्यमिक शिक्षण पूर्ण केले.

वडलांचे कष्ट कमी करण्यासाठी नोकरी मिळवायची या उद्देशाने तिने डीएडदेखील पूर्ण केले. मात्र शिक्षकाची नोकरी मिळेपर्यंत वाट पाहण्याची तिची तयारी नव्हती. लहान भावाची जबाबदारीदेखील होतीच. पोलीस भरती प्रक्रियेत घरच्यांच्या विरोधाला न जुमानता ती उतरली आणि यशस्वी झाली. बीड येथेच कॉन्स्टेबल म्हणून तिची नेमणूक झाली.

‘अनंत आमुची ध्येयासक्ती’ हे तत्त्व स्वीकारणारी मीना एवढ्यावर शांत बसणाऱ्यांपैकी कशी असेल? पीएसआय वैशाली शिंदे यांच्याकडे पाहून, एक दिवस अधिकारी होण्याचा तिने निश्चय केला आणि त्याला प्रयत्नांचे बळ दिले. तिने एमपीएससीची तयारी सुरू केली. ड्यूटीवरून परतल्यावर, कोर्टात मोकळ्या वेळात, बसमधून जाताना तिचा अभ्यास सुरू होता. घरच्यांना लग्न करू नका असे बजावलेले. हळूहळू घरच्यांचा विरोध मावळला. ‘काय करत होती कुणास ठाऊक’ अशी तिच्या आईची प्रतिक्रिया. मात्र प्रकृतीला जपण्याचा सल्ला ती अधूनमधून द्यायची.

अखेरे तो क्षण आलाच. २०१३ मध्ये राज्य सेवा परीक्षेत ती खुल्या गटात राज्यात दुसरी आली आणि २०१५ मध्ये तिची प्रशिक्षणासाठी निवड झाली. प्रशिक्षणात धावण्यासाठी खूप त्रास होत असल्याचे जाणवल्यावर, तिने परतण्याचाही निर्णय एका क्षणी घेतला होता. मात्र, दुसऱ्याच क्षणी स्वत:ला सावरत काहीतरी करूनच गावात जायचे असा चंग बांधून तिने कष्ट सहन केले आणि यश मिळवले.

‘मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते सन्मान स्वीकारतानाचा क्षण जीवनातील महत्त्वाचा क्षण होता. तो आनंद शब्दात व्यक्त करता येत नाही’ असे सांगणारी मीना भावुक होऊन हे यश आईवडील आणि सेल्स टॅक्स विभागातील साहाय्यक आयुक्त डॉ. बाळासाहेब मालेगावकर यांचे आहे, असे नम्रपणाने सांगते. वर्ग–१ चा अधिकारी होण्याचे स्वप्न समोर ठेवताना ‘केल्याने सगळं शक्य आहे’ असा संदेश ती ग्रमीण भागातील युवकांना देते. महिलांवरील अत्याचाराबाबत समाजात तिला जागरूकता आणायची आहे. विजपथाकडे वाटचाल करताना अशक्य काहीच नाही, अविरत प्रयत्नांची तयारी हवी हाच संदेश तिने आपल्या कामगिरीतून दिला आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात सन १९०६ साली प्रथम फ्रेझर कमिशन यांच्या शिफारशीनुसार, पुणे शहराबाहेर भांबुर्डा या ठिकाणी महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनीची स्थापना करण्यात आली. जून १९०९ मध्ये पोलीस प्रशिक्षण शाळा म्हणून पुण्याहून, नाशिक येथील जागेवर प्रबोधिनीचे स्थलांतर झाले. इंग्रज राजवटीपासून ते सन १९६० या कालावधीत या पोलीस प्रशिक्षण संस्थेला ‘सेंट्रल पोलीस ट्रेनिंग स्कूल’ म्हणून संबोधले जाऊ लागले. महाराष्ट्रासह गुजरात, राजस्थान, कर्नाटक, गोवा, सीपी अॅण्ड बेरार आणि पाँडेचेरी, दादरा व नगर हवेलीसह पाकिस्तानमधील सिंध प्रांतातील पोलीस अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण या ठिकाणी होत असे. स्वातंत्र्योत्तर काळात सन १९६० मध्ये पोलीस प्रशिक्षण शाळेचे उन्नत महाविद्यालयात परिवर्तन झाले. सुमारे २६७ एकर परिसरात ऐतिहासिक वारसा लाभलेल्या ५ इमारती, कवायत मैदाने, निवासालये व आंतरवर्ग इमारती विकसित झाल्या. या प्रशिक्षण महाविद्यालयाने महाराष्ट्र पोलीस दलास कर्तव्यदक्ष व कायद्याचे सखोल ज्ञान संपादन केलेले, दर्जेदार पुरुष व महिला पोलीस अधिकारी दिले आहेत. या महाविद्यालयाचा लौकिक लक्षात घेऊन शासनाने सन १९८९ मध्ये या महाविद्यालयाला ‘महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनी’ असा दर्जा बहाल केला. पोलीस दलाच्या प्रशिक्षणाची शिखर संस्था म्हणून शासनाने महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनीस ५ फेब्रुवारी २०१६ रोजी ‘स्वायत्त संस्थेचा’ दर्जा बहाल केला. मुख्यमंत्री महोदयांनी गतवर्षीच्या दीक्षान्त संचलन कार्यक्रमात याबाबतची घोषणा केली होती.



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून ‘स्वॉर्ड ऑफ ऑनर’ स्वीकारताना मीना तुपे. सोबत पालकमंत्री गिरीष महाजन, गृह राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील आणि प्रा. राम शिंदे**

**(लेखक हे नाशिक येथे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९४०४७६०८८७**



**गडकिल्ले म्हणजे खरे तर राज्य रक्षणाचे आणि संरक्षणात्मक बांधकामाची प्रतीके आहेत. या प्रकारच्या बांधणीमध्ये तटबंदी, बुरूज, जंग्या, चऱ्या, फांजी असे विविध घटक दिसून येतात. या सर्वांपेक्षा अत्यंत वेगळ्या प्रकारची कलाकुसर किल्ल्यांच्या दरवाज्यांवर केलेली दिसते. अशा संरक्षणात्मक बांधणीमध्ये देखील दरवाज्यांवर केलेली कलाकुसर गडाचे एक वेगळेपण दाखवून जाते.**

# किल्ल्यांवरील द्वारशिल्प

**डॉ. सचिन जोशी**

गडकिल्ल्यांचा उगम हा आजपासून साधारणतः ५००० वर्षांपूर्वी झाला. हडप्पा मोहेंजोदोडो येथील उत्खननात तटबंदीयुक्त बांधकामाचे पुरावे मिळाले होते. भुईकोट प्रकारातील या तटबंदीमध्ये दरवाजे आणि बुरूज बांधल्याचे पुरावे उपलब्ध झाले होते. पण दरवाज्यांवर काही कलाकुसर असल्याचे मात्र कोणतेही पुरावे मिळाले नाहीत. त्यानंतर भारतात सातवाहन काळातील भुईकोट किल्ले आणि त्याचे अवशेष मिळाले पण तेथेदेखील द्वारशिल्प किंवा दरवाज्यावरील कलाकुसर यांचे अवशेष मिळाले नाहीत. पूर्व मध्ययुगीन कालखंडात काकतीय सम्राटांनी बांधलेल्या वारंगळच्या किल्ल्याच्या बांधणीमध्ये काही प्रमाणात कलाकुसर दिसून आली.

## राजवटींचा प्रभाव

यादवांनी बांधलेल्या देवगिरी किल्ल्याच्या दरवाज्यावर मोठ्या प्रमाणावर कलाकुसर दिसून येते. १५व्या शतकानंतर मात्र संरक्षणात्मक बांधकामात आमूलाग्र बदल झाले. या बदलाचे प्रतिबिंब विशेषतः दक्षिण भारतातील किल्ल्यांच्या बांधणीमध्ये दिसू लागले. याव्यतिरिक्त दक्षिण भारतातील पूर्व मध्ययुगीन कालखंडातील मंदिरांवर असलेली शिल्पे आणि नक्षीकाम काही प्रमाणात, किल्ल्यांच्या दरवाज्यावर वेगळ्या पद्धतीने दिसू लागले. १५व्या शतकाच्या सुरुवातीला भारताबाहेरून आलेल्या परकीय लोकांनी, भारताच्या वेगवेगळ्या भागात मोठमोठ्या पदावर कामे केली तर काही जणांनी भारताच्या वेगवेगळ्या भूभागावर राज्यदेखील केले. या लोकांबरोबर त्यांच्या प्रांतातील कला, शिल्प या गोष्टी भारतात आल्या. यातील काही शिल्पे महाराष्ट्रातील मुस्लीम राजवटीत बांधलेल्या गडकिल्ल्यांच्या दरवाज्यावर दिसतात.

## शिल्पांची रचना

गडकिल्ल्यांच्या दरवाज्यावर दिसणारी ही शिल्पे मुख्यतः दरवाज्याच्या कमानीच्या डावी–उजवीकडे किंवा कमानीच्या मधोमध दर्शवलेली असतात. महाराष्ट्रात ही शिल्पे गिरिदुर्ग, जलदुर्ग आणि भुईकोट अशा सर्वच किल्ल्यांमध्ये दिसून येतात. अर्नाळा, तिकोना, लोहगड, सरसगड इ.सारख्या काही किल्ल्यांवर; सहा पाकळ्यांची फुले आणि मधोमध एक शिल्प दाखवलेले दिसते. पूर्णगड या मराठा साम्राज्यात बांधलेल्या किल्ल्यावर, कमानीच्या मध्यभागी श्रीगणेशाचे शिल्प असून डावी – उजवीकडे चंद्र आणि सूर्य यांची शिल्पे आहेत. याचा अर्थ असा की, जोपर्यंत चंद्र आणि सूर्य आहेत तोपर्यंत या राजाची कीर्ती टिकून राहील. अलिबागजवळील कुलाबा या जलदुर्गाच्या दरवाज्यावर देखील श्रीगणेशाची प्रतिमा असून त्याच्या दोन्ही बाजूला एक



अमनयेश्वर



शिवनेरी



अर्नाळा किल्ला



अहमदनगर



नानी दमण किल्ला




रेवदंडा

एक हत्ती आहे. याच्या वरील शिल्पपट्टीकेवर कमळशिल्पे आणि शंकरपाळीच्या आकाराची नक्षी दर्शवलेली आहे. कुलाबा किल्ल्याच्या पश्चिमेला 'यशवंत' नावाचा दुसरा मोठा दरवाजा आहे. या दरवाज्यावर देखील मधोमध श्रीगणेशाची प्रतिमा आणि त्याच्या दोन्ही बाजूला रिद्धी आणि सिद्धी दाखवलेल्या आहेत. या शिल्पपट्टीकेवर मगरीचे शिल्प, कीर्तिमुख, कमळशिल्प इत्यादी शिल्पे आहेत.

विसापूर, लोहगड, रतनगड या किल्ल्यांच्या दरवाज्यांवर हनुमानाच्या किंवा श्रीगणेशाच्या मूर्ती दिसून येतात. त्या दरवाज्याच्या कमानीवर किंवा कमानीच्या खांबाशेजारी असतात. श्रीगणेश आणि हनुमान या द्वाररक्षक देवता आहेत असे तत्कालीन लोक मानत होते.

## शरभशिल्प

शरभशिल्प हे एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असे शिल्प, शिवपूर्व काळापासून बांधलेल्या गडकिल्ल्यांवर दिसून येते. दक्षिणेतील दख्खन आणि कोकण या परिसरांतील सर्व प्रकारच्या किल्ल्यांच्या दरवाज्यावर, हे शिल्प दिसते. विविध प्राण्यांचे वेगवेगळे अवयव एकत्र करून तयार केलेला एक मिश्र प्राणी म्हणजे शरभ होय. काही किल्ल्यांवर शरभ दाखवताना त्याचे तोंड कुत्र्यासारखे किंवा वाघासारखे, शरीर, बैलासारखे, पाय बदकासारखे, शेपटी वाघासारखी दाखवलेली असते. जंजिरा, अर्नाळा, कुलाबा, या किल्ल्यांच्या दरवाज्यावर अशा स्वरूपाची शरभशिल्पे आढळतात. अवचितगड, शिवनेरी येथील शरभांना तर पंखदेखील दाखवलेले आहेत. अनेक वेळा शरभाचे सामर्थ्य प्रदर्शित करण्यासाठी त्याच्या पायात, तोंडात आणि शेपटीमध्ये हत्ती पकडलेले दाखवतात. शिवनेरी किल्ल्यावरील एका शरभाने गंड भेरुंड (दोन तोंडाचा गरुड पण धड एकच) पकडल्याचे शिल्प आहे. शरभ हा एक काल्पनिक प्राणी असून, त्याच्या अस्तित्वाचे कोणतेही पुरावे आजपर्यंत कोठेही मिळालेले नाहीत. हिंदू ग्रंथांमध्ये शरभाविषयी एक कथा सांगितली आहे. नरसिंहाने हिरण्यकश्यपूचा वध केल्यावर त्याच्या उग्र स्वरूपाचा लोकांना त्रास होत होता. लोकांनी शिवाचा म्हणजे शंकराचा धावा केला आणि शंकराने शरभ या प्राण्याचे रूप घेऊन विष्णूचा नरसिंह अवतार संपवला. ही कथा शैव आणि वैष्णव याच्यातील वादातून निर्माण झाली असावी असे वाटते. शरभ या प्राण्याचे शिल्प किल्ल्यांच्या दरवाज्यावर दाखवण्यामागचे कारण, म्हणजे ते शिल्प ज्या किल्ल्यावर असेल त्या राजाचे सामर्थ्य शरभएवढे मोठे आहे. सामर्थ्याचे एक प्रतीक म्हणून हा शरभ अनेक किल्ल्यांच्या दरवाज्यांवर दिसून येतो. रायगड, सुधागड, रोहिडा या किल्ल्यांच्या दरवाज्यावर शरभ असून त्यांनी पायामध्ये हत्ती पकडलेले आहेत. अहमदनगर किल्ल्याच्या दरवाज्यावर एक वेगळ्या प्रकारचा शरभ आहे. या शरभाचे तोंड हत्तीसारखे असून त्याने पायामध्ये एक हरीण पकडलेले आहे. अर्नाळा किल्ल्याच्या दरवाज्यावरील शरभाचे तोंड पोपटासारखे असून, त्याच्या पायाखाली हत्ती दाखवलेला आहे. कोकणातील हर्णे उर्फ गोवा किल्ल्याच्या दरवाज्याजवळ गंड भेरुंडाने चोचीत हत्ती पकडल्याचे शिल्प आहे. शरभ या प्राण्याचे शिल्प हिंदू आणि मुस्लीम या दोघांनी बांधलेल्या किल्ल्यांवर दिसून येते. कालांतराने हे शरभशिल्प मराठ्यांच्या काळातील आमनायेश्वर (जि. रत्नागिरी), अमृतेश्वर (ता. भोर जि. पुणे) यांसारख्या मंदिरांवर देखील दिसायला लागले.




भारतात मुसलमान, मराठे, राजपूत यांनी राज्य केले आणि त्यांनी बांधलेले अनेक किल्ले भारतात पाहायला मिळतात. १५ व्या शतकाच्या अखेरीस वास्को-द-गामा भारतात आला आणि युरोपियन लोकांचा भारतात यायचा मार्ग मोकळा झाला. पोर्तुगीजांनी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर दीव, दमण, अशेरी, तारापूर, वसई, चौल यांसारखे अनेक किल्ले बांधले. पृथ्वी, त्यावरच्या अक्षांश-रेखांशाच्या रेषा, काही वेळा ख्रिश्चन पाद्री, राजदंड, इ. शिल्पकाम पोर्तुगीजांच्या किल्ल्यांच्या दरवाज्यावर दिसते. रेवदंडा या पोर्तुगीजांनी बांधलेल्या किल्ल्याच्या मुख्य दरवाज्यावर त्यांचे राजचिन्ह, क्रॉस, राजदंड, पृथ्वी, इत्यादी शिल्पे दाखवलेली आहेत. अशा प्रकारे किल्ला हे जरी युद्धाचे किंवा संरक्षणात्मक बांधकामाचे प्रतीक असले तरीही राजाचे कर्तृत्व, पराक्रम आणि कला या सर्व गोष्टी या द्वारशिल्पांमधून दृग्गोचर होतात.

**(लेखक हे दुर्ग संवर्धन समिती, महाराष्ट्र राज्यचे सदस्य आहेत.)**
**संपर्क : ०९८२२१०९३६२**



सुधागड



जंजिरा

**रोजच्या धकाधकीच्या जीवनातून थोडासा विसावा मिळवण्यासाठी आणि निसर्गाचा हिरवा गालिचा, रिमझिम पाऊस, उंचावरून कोसळणारे धबधबे, दाट धुके हे सर्व अनुभवण्यासाठी सह्याद्रीच्या कुशीत जायला हवे. येथील पावसाचा आनंद घ्यायलाच हवा!**

# पाऊस अनुभवावा सह्याद्रीच्या कुशीत

हिरवी शाल पांघरून नैसर्गिक सौंदर्याने नटलेला, पर्यटनप्रेमींना सदैव आकर्षित करणाऱ्या सह्याद्रीचे रूप प्रत्येक ऋतूत वेगळे दिसते.

महाराष्ट्राला नैसर्गिक देणगी लाभलेली ही सह्याद्री पर्वतरांग देशाच्या पश्चिम समुद्र किनाऱ्याशेजारी उभी आहे. ही रांग तापी नदीच्या दक्षिणेकडून महाराष्ट्र आणि गुजरातच्या सीमेशेजारी सुरू होते. अंदाजे १६०० किमी लांबीची ही पर्वतरांग महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ आणि तामिळनाडू या राज्यातून भारताच्या दक्षिण टोकाजवळ पोहोचते. पर्वतरांगेचा जवळजवळ ६० टक्के भाग कर्नाटकात येतो. या पर्वतरांगेचे क्षेत्रफळ ६०,००० चौ.किमी. एवढे आहे. या पर्वतरांगांमध्ये महाराष्ट्रात खालील ठिकाणी आपण पावसाळी पर्यटनाचा आनंद घेऊ शकता.

**चारुशीला बोंधे**

कळसुबाई शिखर



## कळसुबाई शिखर

कळसुबाई हे महाराष्ट्रातील सर्वोच्च गिरीशिखर अहमदनगर या जिल्ह्यात आहे. पावसाळ्यामध्ये ट्रेकिंग करण्यासाठी गिर्यारोहकांचे हे अतिशय आवडीचे ठिकाण आहे. ऐन पावसाळ्यात येथे येणे आणि माथ्यावरचा पाऊस, वाऱ्याच्या खेळात स्वत:ला झोकून देणे ही एक थरारक आणि अविस्मरणीय अनुभूती असते. या शिखराच्या माथ्यावर कळसुबाईचे मंदिर आहे. या शिखरावर चढण्याची सुरुवात बारी या गावातून होते. बारी हे गाव भंडारदऱ्यापासून ६ किमी. अंतरावर आहे. या शिखरावर चढण्यासाठी लोखंडी पायऱ्यांचादेखील वापर करता येतो. या शिखराची उंची १६४६ मीटर आहे.

- मध्य रेल्वेचे घोटी स्थानक हे जवळचे स्थानक आहे. याठिकाणी बस स्थानकातून बारी गावात जाण्यासाठी बस असते.

- इगतपुरी-मुंबई बस पकडून तुम्ही बारी गावापर्यंत पोहोचू शकता. राहण्याची व्यवस्था बारी गावामध्ये होऊ शकते.

### हरिश्चंद्रगड

सह्याद्रीच्या माथ्यावर असलेला हरिश्चंद्रगड प्रत्येक ऋतूत आपल्या सौंदर्याची सप्तरंगी रूपे घेऊन येत असतो. मुसळधार पावसात हिरव्यागार फुलांनी बहरलेल्या हरिश्चंद्रगडावर जागोजागी कोसळणारे धबधबे मन मोहून टाकतात. अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात हे ठिकाण आहे. येथे आल्यावर निसर्गाशी गट्टी जमते. पूर्वेकडे घनदाट जंगलांनी व्यापलेले सह्याद्रीचे उंच कडे, या परिसराला लाभलेले निसर्गसौंदर्य सदैव पर्यटकांना खुणावत असते.

कोथळ ही बस हरिश्चंद्रगडाच्या पायथ्याशी जाते. कोथळपासून पुढे गेले की हिरवीगार वनराई, उंच-उंच झाडे पर्यटकांच्या डोळ्याचे पारणे फेडतात. हरिश्चंद्रगडाची उंची १४२४ मीटर इतकी आहे. हरिश्चंद्रगड पाहण्यासाठी जातांना कोथळे गावापासून नयनरम्य दृश्ये नजरेत सामावून घेत गड धो-धो कोसळणाऱ्या धबधब्यांचा व निसर्गाचा आनंद घेत, आपण गडावर कधी येऊन पोहोचतो ते कळत नाही. गडाच्या पायथ्याशी गेल्यानंतर दोन्ही बाजूच्या गगनचुंबी कड्यांवरून कोसळणारे धबधबे थांबायला भाग पाडतात. या धबधब्यांखाली चिंब भिजल्याशिवाय निसर्ग पर्यटक आपली पावले पुढे टाकत नाही. गडावर परिसरातील ग्रामस्थांनी तंबू उभारून राहण्याची सोय केली आहे. त्यामुळे येथे मुक्कामाला थांबून भाजी-भाकरी, डाळभात, पोहे, चहा अशा घरगुती आदरातिथ्याचा आस्वाद घेता येतो.

मुंबई-कल्याण-खुबीफाटा-खिरेश्वर मार्गे माळशेज घाटातून आपण हरिश्चंद्रगडावर पोहोचू शकता. पुण्याहून खाजगी वाहनाने आळेफाटामार्गे तुम्ही पुणे-आळेफाटा-खुबीफाटा-खिरेश्वर असे हरिश्चंद्रगडावर जाऊ शकता.

### महाबळेश्वर

समुद्र सपाटीपासून १३७२ मीटर उंचीवर महाबळेश्वर हे ठिकाण आहे. चढउतार असलेले रस्ते आणि सुंदर झाडांनी आच्छादलेले, समृद्ध पार्श्वभूमीचे उंचावरील मोहक असे महाबळेश्वर पावसाळ्यात पर्यटकांना खुणावते. गार हवेची झुळूक मनाला गारवा देऊन जाते. पावसाळा सुरू होताच निसर्गप्रेमी पर्यटकांना वेध लागतात ते पावसाळी पर्यटनाचे व खासकरून महाबळेश्वरचे. पावसाळ्यात धुक्याचे वातावरण आणि पावसाच्या सरी यामुळे पर्यटकांची पहिली पसंती महाबळेश्वरला असते. पर्यटक आर्वजून भेट देतात ते येथील लिंगमळा धबधब्याला. कड्यावरून कोसळणारे दुधासारखे शुभ्र पाणी पर्यटकांच्या डोळ्याचे पारणे फेडते. धुक्यात हरवलेल्या पायवाटेने धबधब्यापर्यंत जाताना वेगळाच रोमांच अनुभवयास मिळतो. केड्स पॉइंट, मंकी पॉइंट, हत्तीचा माथा व येथूनच दिसणारे बलकवडी डॅमचे दृश्य पर्यटकांचे खास आकर्षण आहे. मिनी काश्मीर म्हणून संबोधले जाणारे तापोळा पावसाळ्यात निसर्गसौंदर्याने नटलेले असते. त्याचबरोबर पाचगणी येथील जगप्रसिद्ध टेबललॅण्ड पाहण्यास पर्यटक पसंती देतात. पावसाळ्यात ढग जणू जमिनीवरच उतरले असावे असा अनुभव टेबललॅण्डवर मिळतो. मुंबईपासून २३१ किमी. तर पुण्यापासून १२० किमी. अंतरावर महाबळेश्वर आहे. येथे थांबण्यासाठी एमटीडीसीचे हॉटेल्स, रिसॉर्ट तसेच खासगी हॉटेल्स उपलब्ध आहेत.

### ताम्हिणी घाट

सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये वसलेल्या पश्चिम घाटामध्ये निसर्गरम्य ठिकाण म्हणजे ताम्हिणी घाट होय. पावसाळ्यात निसर्गसौंदर्य भरभरून अनुभवायचे असेल तर ताम्हिणी घाटाला आवर्जून भेट द्यायला हवी. रुक्ष करडा रंग टाकून घाट हिरवी शाल पांघरतो. येथे मुळशी धरणाचा नयनरम्य देखावा बघायला मिळतो आणि या छोट्याशा वर्षासहलीला नदीतील साहसी खेळांची जोड देता येते.

ताम्हिणी घाटात जाण्यासाठी मुंबई-गोवा महामार्गाने कोलाडपर्यंत जावे लागते. कुंडलिका नदीवरील पूल ओलांडला की, डाव्या बाजूला मुळशी धरणावरून पुढे पुण्याला जाणारा रस्ता लागतो. कोलाड आणि मुळशी धरणाच्या मधल्या भागात हा ताम्हिणी घाट आहे. थोड्या चढावावरून पुढे गेले की, एखाद्या स्वप्नांच्या दुनियेत आल्यासारखे वाटते. लांबच लांब पसरलेले हिरवीगार मखमली गालिचे, ओथंबून खाली आलेले ढग, खळखळणारे निर्झर आणि मधूनच डोकावणारे धबधबे पाहताना डोळ्यांचे पारणे फिटते. घाटातील वळणावळणावर नयनरम्य, विहंगम देखावे जणू काही आपली वाट पाहत असतात. पावसाळी धुक्यात जणू डोकी हरवलेल्या टेकड्या आकाशात उंच झेपावत आहेत असे वाटते. टेकड्यांच्या या भल्याथोरल्या भिंती त्यावर अलगद उतरणारे ढग वातावरण भारावून टाकतात. काळ्या ढगांभोवती चालणारा हा ऊन-पावसाचा खेळ जणू काही एखाद्या दिव्याची ज्योत थरथरावी असा भासतो. हा मनोहारी खेळ पाहताना आपण मंत्रमुग्ध होतो. ताम्हिणी घाट त्याच्या वळणवाटातून असा स्वर्गीय सुखाचा अनुभव देतो. मुंबईपासून १४० किमी., पुण्यापासून दौंड रस्त्याने ९३ किमी. एवढ्या अंतरावर आहे. मुंबईकडून येताना मुंबई-पुणे महामार्गावर लोणावळा येथे बाहेर पडावे लागते. लोणावळ्यापासून बीव्हॅली रस्त्याने ताम्हिणी घाटाकडे जाता येते.

हरिश्चंद्र गड



महाबळेश्वर



ताम्हिणी घाट





# भिजण्याचा आनंद आणि आरोग्याची काळजी

**पावसाळा... धरणीला हिरवा शालू पांघरणारा ऋतू. कोणाला चिंब भिजण्यासाठी, कोणाला रंगबेरंगी फुलपाखरांसाठी तर कुणाला बीज रुजवण्यासाठी त्याची चातकासारखी प्रतीक्षा असते. मात्र हाच पाऊस अनेक आजारांना निमंत्रणही देतो. दूषित पाणी व साचलेल्या डबक्यांमुळे होणारी डासांची उत्पत्ती जीवघेण्या आजारांची नांदी ठरते. त्यामुळे खबरदारी घेतल्यास हा पावसाळा आपणास चिंब भिजवणारा आणि आल्हादायक असा जाईल. या ऋतूत होणारे आजार आणि त्यासाठी घ्यावयाची खबरदारी याविषयी या लेखात जाणून घेणार आहोत.**

हिरवळ, खळाळणाऱ्या नद्या, धबधबे घेऊन येणारा पावसाळा आपल्या सर्वांच्या आवडीचा. मात्र प्रत्येक ऋतूमध्ये आरोग्याची काळजी घेणे आवश्यक ठरते. त्यातल्या त्यात पावसाळ्यात अनेक आजार होण्याची भीती असल्याने विशेष काळजी घेणे गरजेचे ठरते.

**डॉ. बालासाहेब बोर्डे**

### पावसाळ्यात होणारे आजार

सर्वांना आवडणाऱ्या या ऋतूत सर्वत्र पाणी साचण्याचे आणि पाणी दूषित होण्याचे प्रकार आढळतात.

दूषित पाण्यामुळे गॅस्ट्रो, कॉलरा, टॉयफाइड (विषमज्वर) हे आजार होतात. हिपेटायटीस ए या प्रकारचा कावीळदेखील दूषित पाण्यामुळे होतो.

साचलेल्या पाण्यामुळे डासांची मोठ्या प्रमाणावर उत्पत्ती होते. यामुळे डेंग्यू, मलेरियासारखे आजार होतात. शिवाय या डासांमुळे हिमोजेरींग फिव्हरही जडतो. यामध्ये रक्तस्राव होण्याची शक्यता असते. त्याचबरोबर पावसाळ्यात दमट वातावरणामुळे अस्थम्याचा त्रास वाढतो. चिकुन गुनियाचेदेखील रुग्ण मोठ्या प्रमाणावर आढळतात. अशा वेळी त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.

### घ्यावयाची खबरदारी

- परिसर स्वच्छ, कचरा व दलदलमुक्त ठेवावा.
- घाण पाण्याचे डाबके साचणार नाही, साचल्यास त्याचा वेळीच निचरा होईल याची काळजी घ्यावी.
- शहराला, ग्रामीण भागाला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांची वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती व्हावी. जेणेकरून दूषित पाणी जलवाहिनीत शिरणार नाही.

### वैयक्तिक स्वच्छता

- पिण्याचे पाणी उकळून, गाळून प्यावे.
- जेवण करण्यापूर्वी हात साबणाने स्वच्छ धुवावे. शेतकऱ्यांनी रासायनिक खते, औषध फवारणीनंतर जेवणापूर्वी हात स्वच्छ धुण्याचा नियम कायम लक्षात ठेवायला हवा.
- पायात ओली पादत्राणे अथवा ओले मोजे खूप वेळ राहिल्यास चिखल्या होण्याची शक्यता असते. त्यामुळे पाय कोरडे राहतील याची काळजी घ्यावी.

### बाळाची काळजी

वातावरणातील बदलांमुळे लहान मुलांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत असतो. पावसाळ्यात त्यांच्याकडे अधिक लक्ष देणे गरजेचे असते. बाळाचे अंग कोरडे राहील याकडे लक्ष द्यावे. कपडे काचणारे नसावेत. दमट

हवामानामुळे सुती कपडे अधिक उपयुक्त ठरतात. मलेरिया आणि डेंग्यूसारख्या आजारांपासून त्यांचे रक्षण करण्यासाठी त्यांना अंगभर कपडे घालावे व मच्छरदाणीसारख्या साधनांचा वापर करावा. त्याचबरोबर आजारी व्यक्तिपासून बाळाला दूर ठेवावे, गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे, त्याला हाताळण्यापूर्वी हात स्वच्छ धुवावे, बाळाचेही हात वेळोवेळी स्वच्छ करत राहावे. उकळून थंड केलेले पाणी त्याला पिण्यासाठी द्यावे कारण मोठ्या प्रमाणावर होणारे पोटाचे विकार आणि अतिसार हे दूषित पाण्यामुळे होतात.

### आहार

प्रत्येक ऋतूचे एक वैशिष्ट्य असते. त्याचे वेगळेपण लक्षात घेऊन आपण त्याला साजेसा आहार ठेवला तर उत्तम आरोग्य लाभते. पावसाळ्यात रस्त्यांवर विकले जाणारे अन्नपदार्थ आणि स्नॅक्स् प्रकर्षाने टाळावे. अन्यथा पोटाच्या आजारांना तुम्हाला सामोरे जावे लागू शकते. वातावरणात आर्द्रता अधिक असल्याने पचनक्रिया काहीशी मंदावते. त्यामुळे बाहेर तयार केलेले तळलेले पदार्थ खाऊ नये. त्यापेक्षा घरी तयार केलेल्या अन्नपदार्थांचे सेवन करावे.

त्या–त्या ऋतूमध्ये येणारी फळे सेवन केल्यास त्याचा अधिक फायदा होतो. जसे आंबा उन्हाळ्यात सेवन केल्यास अधिक उपयोगी पडतो. त्याप्रमाणेच पावसाळ्यातही काही शक्तिवर्धक विशिष्ट फळे आपण सेवन करायला हवी. नासपती, डाळिंब, सफरचंद आदी फळे पौष्टिक ठरतात. आंबा व कलिंगडाचे अधिक प्रमाणात सेवन केल्यास चेहऱ्यावर पुटकुळ्या येण्याची शक्यता असते. त्यामुळे या फळांचे सेवन मर्यादित असावे. त्याचबरोबर या ऋतूत द्रवयुक्त पदार्थ टाळावे. जसे की ज्यूस, लस्सी आदी.

## हे टाळायलाच हवे....


तेलकट अन्नपदार्थ


भेळपुरी–पाणीपुरी


दूषित पेयजल

या पदार्थांचे जास्त सेवन शरीरात सूज निर्माण होण्यास कारणीभूत ठरू शकते. पावसाळ्यातील बहुतांश आजार दूषित पाणी आणि डास यांच्यामुळे होतात. परंतु हे आजार आपल्यावर तेव्हाच प्रभावी होतात जेव्हा आपली प्रतिकारशक्ती कमी होते. त्यामुळे प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी काही घरघुती उपाय करावेत. जसे की सूप बनवताना सुरुवातीला तेलामध्ये भरपूर प्रमाणात लसूण टाकावा. असे घरगुती उपाय आपली रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करतील.

त्वचेसंबंधीचे संसर्ग आणि ॲलर्जी टाळण्यासाठी कडू भाज्या व पदार्थांचे अधिक प्रमाणात सेवन करावे. जसे: दुधीभोपळा, लालभोपळा, नीम, मेथी, कारली आदी. कडू भाज्यांचे सेवन अनेकांना आवडत नाही. परंतु विशिष्ट प्रकारे तळून, तिखटाचा योग्य वापर करून हे पदार्थ चविष्ट करता येतात. त्वचेसंबंधीचे अनेक आजार टाळण्याचा हा एक उत्तम मार्ग मार्ग आहे. त्याचबरोबर आहारात भेंडी, गिलके, दोडके, सुरण आदी भाज्या असाव्यात. मूग, ज्वारी, राजगीरा, कैरी, लिंबू, चिंच, सुके खोबरे, बीट, बेसन लाडू, विविध भाज्यांचे सूप, कैरीचा मुरंबा आदींचा समावेश आहारात करावा. तर पालक, कोबी, चणे, मटार, बटाटे, काकडी, सरबते, मका, मिसळ, ब्रेड, फरसाण, नूडल्स, मैद्याचे तळलेले पदार्थ, उपवासासाठी शेंगदाणे भगर खाणे टाळावे. अशाप्रकारे काही पथ्ये पाळून काळजी घेतली तर पावसाळा आपल्याला ओलाचिंब करणारा आणि आल्हाददायक वाटेल.

निरामय

(लेखक हे औरंगाबाद येथे विमा वैद्यकीय अधिकारी आहेत.)
संपर्क : ०९८२३३८८४३६

## अशी घ्या काळजी

- **पावसाळ्यात रस्त्यावरील, उघड्यावरील भेळपुरी, पाणीपुरी, भजी, सँडविच इत्यादी अन्नपदार्थ खाणे टाळावे. कच्च्या भाज्या, घरचे पौष्टिक जेवण आणि शुद्ध पाणी चांगल्या आरोग्यासाठी पुरेसे आहे.**
- **पावसाळा अधिक थंडही नसतो आणि उष्णही नसतो. त्यामुळे साहजिकच तुमचा कल स्पायसी जेवणाकडे असेल. परंतु हे घातक ठरू शकते. यामुळे स्किन ॲलर्जी आणि चिडचिडीचे प्रमाण वाढू शकते. त्यामुळे खूप तिखट खाणे टाळावे.**
- **दूषित पाणी पिणे टाळावे. फिल्टर केलेले पाणीसुद्धा पूर्णपणे शुद्ध असेल असे नाही. पाणी उकळून घेतल्यास त्यातील सर्व विषाणू नष्ट होतात.**
- **अन्नपचन नीट व्हावे यासाठी या काळात भरपूर पाणी प्यावे.**
- **जेवणामध्ये मिठाचे अधिक प्रमाण झाल्यास उच्च रक्तदाब वाढण्यास मदत होते. त्यामुळे उच्च रक्तदाबाचा त्रास असलेल्या व्यक्तींनी मिठाचे कमी सेवन करावे.**
- **दूध उकळल्यानंतर प्यावे. थंड दूध प्यायल्यास त्यातील विषाणू तुमचे आरोग्य बिघडवू शकता.**
- **पाण्यातून चालणे शक्यतो टाळावे. कारण यामुळे पायाला, टाचेला, बोटांना संसर्ग होण्याची भीती संभवते. पाय ओले झाल्यास लगेच कोरडे करावे.**
- **घराबाहेर पडत असताना सोबत छत्री अथवा रेनकोट ठेवा.**
- **ताजे आणि गरम अन्न सेवन करावे. कोमट पाणी घ्यावे.**
- **चहाऐवजी औषधी चहा, ग्रीन टी घेतल्या उपयुक्त ठरते.**
- **कलिंगड, लस्सी, भात आदी पदार्थ टाळावे.**
- **केस व कपडे ओले असताना वातानुकूलितगृहात जाणे टाळावे. त्यामुळे व्हायरल फिव्हर, सर्दी, खोकला असे आजार होण्याची शक्यता असते.**
- **ओले कपडे जास्त वेळ अंगावर राहू देऊ नका**
- **आंघोळीच्या पाण्यात कडूलिंबाची पाने टाकल्यास त्वचेला होणारा जंतूसंसर्ग काही प्रमाणात टाळता येतो.**
- **मधुमेह व अस्थम्याचा त्रास असलेल्यांनी ओल्या भिंती असलेल्या ठिकाणी राहणे टाळावे, कारण ओल्या भिंतींवर वाढणाऱ्या बुरशीमुळे त्रास वाढण्याची अधिक शक्यता असते.**




लोकराज्य स्टॉल, दिल्ली




मंत्रालयातील लोकराज्य स्टॉलला मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय यांची भेट

# लोकराज्य महाराष्ट्रात अव्वल; भारतात तिसरे

## एबीसीने उमटवली अधिकृत मोहोर

**ऑडिट ब्युरो ऑफ सर्क्युलेशन (एबीसी) या संस्थेने प्रमाणित केलेला खप हा विविध वृत्तपत्रे आणि नियतकालिकांचा अधिकृत आणि खरा खप समजला जातो. एबीसी या संस्थेची वस्तुनिष्ठता आणि दर्जा मोठा असून या संस्थेने प्रमाणित केलेले आकडेच विविध जाहिरातदार जाहिराती देण्यासाठी स्वीकारतात.**

एबीसीमार्फत अतिशय काटेकोरपणे खपाची तपासणी केली जाते. अशा या संस्थेने लोकराज्यच्या खपाच्या आकडेवारीची तपासणी जून ते डिसेंबर २०१५ या कालावधीसाठी केली असून त्यात लोकराज्यचा सरासरीने खप ३ लाख ८८ हजार इतका आढळून आला. ही बाब केवळ टीम लोकराज्यसाठीच आनंद आणि अभिमानाची नसून संपूर्ण माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचा गौरव वाढवणारी आहे. कारण महाराष्ट्रातील कोणत्याही मासिकाच्या खपामध्ये लोकराज्यने प्रथम क्रमांक पटकावला आहे. नियतकालिकांच्या खपांच्या आकडेवारीनुसार लोकराज्य हे देशातील तिसऱ्या क्रमांकाचे नियतकालिक ठरले आहे. देशातील सर्व प्रकारातील मासिकांमध्ये लोकराज्य खपाबाबत तिसऱ्या क्रमांकावर असल्याचे सिद्ध झाले आहे. पहिल्या क्रमांकावर जागरन जोश (हिंदी), दुसऱ्या क्रमांकावर वनिथा (तेलगू) ही नियतकालिके आहेत. लोकराज्य गेल्या ६७ वर्षांपासून प्रकाशित होत असून महाराष्ट्र शासनाचे अधिकृत मुखपत्र म्हणून त्याकडे बघितले जाते. शासनाची धोरणे, निर्णय, योजना, इतर उपयुक्त माहिती आकर्षकरीत्या आणि वाचनीय पद्धतीने यात दिली जाते. उत्तम कागद, दर्जेदार संपादन,

**सर्वात जास्त खपाचे मासिक**

| अ.क्र. | मासिकाचे नांव | भाषा | एकूण खप |
|---|---|---|---|
| १ | जागराण जोश प्लस | हिंदी | ७,२६,३५६ |
| २ | वनिथा | मल्याळम | ६,१४,६६९ |
| ३ | लोकराज्य | मराठी | ३,८६,१७६ |
| ४ | मल्याला मनोरमा | मल्याळम | ३,६१,७०८ |
| ५ | अन्नदाता | तेलुगू | ३,०४,१६० |

## नवे महासंचालक ब्रिजेश सिंह



माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे नवनियुक्त महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी नुकताच पदभार स्वीकारला. श्री. सिंह हे भारतीय पोलीस सेवेतील १९९६ च्या तुकडीतील अधिकारी आहेत. माहिती तंत्रज्ञान, मानसशास्त्र, लोकप्रशासन या विषयांतील ते तज्ज्ञ आहेत. त्यांनी नागपूरच्या व्हीएनआयटी या संस्थेतून बी.ई. केले आहे. सध्या ते मानसशास्त्र या विषयात पीएच.डी करीत आहेत. श्री. सिंह यांनी लिहिलेले 'क्वांटम सीज' हे पुस्तक पेंग्विन या प्रकाशनाकडून तर अन्य पुस्तक हार्परकॉलिन्स प्रकाशनाकडून प्रसिद्ध झाले आहे.

'द कोलॅबोरेटिव्ह फॉर ग्लोबल अँण्ड बिग हिस्ट्री' या पुस्तकाच्या लेखनकार्यातही त्यांचे योगदान आहे.

श्री. सिंह हे सध्या महाराष्ट्र पोलीस दलाच्या सायबर आणि महिलांविरोधी गुन्हे शाखेचे महानिरीक्षक म्हणून कार्यरत असून माहिती महासंचालकपदाचा कार्यभार त्यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. यापूर्वी श्री. सिंह यांनी नागपूर येथे विशेष शाखा उपायुक्त, अमरावती व औरंगाबाद येथे जिल्हा पोलीस अधीक्षक, मुंबई येथे अतिरिक्त पोलीस आयुक्त, यासह राज्य राखीव पोलीस दल, पोलीस वाहतूक शाखा आदी ठिकाणी महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे.

---

रंगीत मुद्रण, कलात्मक मांडणी आणि अचूकता यामुळे लोकराज्य हे वाचकांच्या गळ्यातील ताईत बनले आहे. 'माहिती हीच खरी शक्ती', या ब्रीदवाक्याशी सुसंगत दर महिन्याचा अंक प्रकाशित केला जातो.


विविध विषयांना स्पर्श करणारी सदरे हे लोकराज्यचे ठळक वैशिष्ट्य आहे. या सदरामध्ये १) एक दिवस मंत्र्यासोबत, २) मंत्रिमहोदयांची विशेष मुलाखत, ३) दिल्लीतील महाराष्ट्र, ४) संस्कृती, ५) निरामय, ६) भ्रमंती, ७) महाराष्ट्रातील गडकिल्ले, ८) यशकथा, ९) सीएम ट्विट्स, १०) प्रेरणा, ११) शासन मंत्रिमंडळ निर्णय/विशेष वार्ता यांचा समावेश आहे.


विशेषांक हे लोकराज्यचे आणखी एक वैशिष्ट्य असून नियमितरीत्या वेगवेगळ्या विषयांवर विशेषांक प्रकाशित होतात. लोकराज्यचा एक अंक किमान १० ते १२ वाचक वाचत असल्याने लोकराज्यची वाचकसंख्या ही ४० ते ५० लाखापर्यंत जाते. विविध स्पर्धा परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अधिकृत आणि अचूक माहितीचे भांडार लोकराज्यमुळे खुले होते. नागरी सेवा व राज्य सेवेसाठी निवड झालेल्या अनेक यशस्वी उमेदवारांनी, लोकराज्यचे हे ऋण जाहीररीत्या मान्य केले आहे. सर्वसामान्य वाचकांना ज्ञानसंपन्न आणि माहितीने परिपूर्ण करून, सक्षमीकरणाचा वेगळा अनुभव व आनंद देणारे लोकराज्य; आणखी नव्या उंचीवर जाण्याचा संकल्प घेऊन, जुलै महिन्यात ६८व्या वर्षात पदार्पन करीत आहे.


माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या सचिव श्रीमती मनीषा पाटणकर-म्हैसकर यांचे सातत्यपूर्ण सृजनशील मार्गदर्शन व प्रत्यक्ष निर्मिती प्रक्रियेतील सहभाग, यामुळे लोकराज्यने दर्जा आणि गुणवत्तेचा मोठा टप्पा गाठला आहे.

तत्कालीन महासंचालक चंद्रशेखर ओक, संचालक देवेंद्र भुजबळ, संचालक शिवाजी मानकर व महासंचालनालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अथम परिश्रमामुळे लोकराज्य हे क्रमांक एकचे मासिक झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार यंदा लोकराज्यने ११ लाख वर्गणीदारांचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. नागरिकांच्या सहकार्याने हे उद्दिष्ट साध्य करण्याचा पूर्ण विश्वास माहिती व जनसंपर्क महासंचालनालयास आहे.

**- सुरेश वांदिले**







**लोकराज्यची वार्षिक वर्गणी १00 रुपये असून एका अंकाची किंमत १0 रुपये आहे. ऑनलाइन वर्गणीदार होण्यासाठी http://dgipr.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. सर्व जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयात वर्गणीदार होता येते. आपला संपूर्ण निवासी पत्ता सुवाच्य अक्षरात पीनकोडसह असावा. थेट वर्गणीदार होण्यासाठी पत्ता: वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक क्र.१९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४000२१. या पत्त्यावर वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी किंवा लेखाधिकारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा.**

यशकथा

# शेततळ्यातून समृद्धी

**थोडी मेहनत, थोडे नियोजन व थोडे मार्गदर्शन या त्रिसूत्रीतून केलवडचे शिवाजी वाघे यांनी भाजीपाल्याची शेती फुलवली. नुसती फुलवलीच नाही तर टंचाई स्थितीत बाजारपेठ मिळवली. भाजीपाला शेतीतून प्रगती साधणाऱ्या वाघे कुटुंबाने, शासनाच्या राष्ट्रीय फलोत्पादन अभियान या शेततळ्यासाठीच्या योजनेचा लाभ टंचाईस्थितीत; शेतीच्या पाण्याचा प्रश्न मिटविण्यासाठी ज्या पद्धतीने करून घेतला, तसा तो अन्य शेतकऱ्यांनी करून घेतला, तर वाघे यांची शेतीत जी प्रगती झाली ती प्रगती इतर शेतकऱ्यांच्या शेतीत होऊ शकते, याचा वास्तुपाठ वाघे यांच्या एकत्रित कुटुंबाने समोर ठेवला आहे.**



शेतीत शाश्वत उत्पादन मिळवण्यासाठी पाणी महत्त्वाचे. पाण्याची सोय झाली तरच अपेक्षित उत्पादन मिळवता येऊ शकते. हे लक्षात आल्यानंतर पाणी कसे उपलब्ध करता येईल, यावर मंथन केले. त्यामधून शेततळ्याचा पर्याय पुढे आला. शासनाच्या राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत ३४ बाय ३४ आकाराचे शेततळे निर्माण करून विचाराला पूर्णत्वास नेले. शेततळे नोव्हेंबरमध्ये भरून ठेवले. त्यामुळे ऐन टंचाईस्थितीत शेती पाण्याबाबत संरक्षित झाली. ढोबळ्या मिरचीचे अपेक्षित उत्पादन घेता आले. एवढेच नाही तर कारले व भोपळा या पिकांची टंचाईतही लागवड करून, त्याची जोपासना करणे शक्य झाले. अहमदनगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यांतर्गत येत असलेल्या केलवड येथील शिवाजी निवृत्ती वाघे यांची यशोगाथा सर्वांना प्रेरणा देणारी आहे. शासनाच्या योजनेचा लाभ टंचाईस्थितीत कसा करून घ्यावा, याचा वस्तूपाठ वाघे यांनी समोर ठेवला आहे.

**गणेश फुंदे**

## पार्श्वभूमी

राहाता तालुका मुख्यालयापासून पाच किलोमीटर अंतरावर केलवड गाव वसलेले आहे. २१६५ हेक्टर भौगोलिक क्षेत्र असलेल्या या गावकुसात जवळपास ४५० मिलीमीटर सरासरी पाऊस पडतो. त्यामुळे सहाजिकच सर्व क्षेत्र कोरडवाहू आहे. शेतकरी बाजरी, सोयाबीन, मका यांसारखी पिके घेतात. ४.९० हेक्टर शेती असलेले शिवाजी वाघे हे इतर शेतकऱ्यांप्रमाणेच २०१२-१३ पर्यंत बाजरी, मका, सोयाबीन आदी खरिपाचीच पिके घेत होते, मात्र शेततळ्यानंतर वाघे यांचा पीकपॅटर्न बदलला आहे.

## सिंचनासाठी घेतले शेततळे

कोरडवाहू शेतीत पाणी नसल्याने अपेक्षित उत्पादकता गाठता येत नव्हती. त्यात सातत्याने टंचाईस्थितीने कोरडवाहू शेतीसमोर अडचणी निर्माण केल्या. यातून मार्ग काढण्यासाठी केलेल्या विचारातून पाण्यासाठी शेततळे घेण्याचा पर्याय वाघे यांच्यासमोर पुढे आला. २०१२-१३ मध्ये त्यांनी राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत ३४ बाय ३४ बाय ४ आकारमानाचे शेततळे घेतले. सोबतच या शेततळ्यात त्यांनी नोव्हेंबर अखेरीस पावसाळ्यात पडलेले पाणी भरून ठेवले.

## ठिबकची सोय अन् पिकांची लागवड

शेततळे तयार केल्यानंतर वाघे यांनी जवळपास तीन हेक्टर क्षेत्र ठिबकखाली आणले. त्या ठिबकच्या सोयीसह शेततळ्यात साठवलेल्या पाण्याच्या उपलब्धतेमुळे, त्यांनी १ एकर द्राक्षे, १ एकर १० गुंठे भोपळा, दीड एकर कारले, २६ गुंठे शेडनेटमध्ये ढोबळी मिरचीची लागवड केली.

शेडनेटमध्ये लागवड केलेल्या ढोबळी मिरचीपासून त्यांना २० मेपर्यंत १८ टन उत्पादन मिळाले. उत्पादित ढोबळी मिरचीची त्यांनी राहाता येथील बाजारपेठेत विक्री केली. सरासरी २० रूपये किलो दराने ३ लाख ६० हजार रूपयांचे उत्पन्न मिळाले. त्यापैकी १ लाख ४० हजार रुपये सर्व खर्च लागला. यापुढे आणखी १० टन ढोबळी मिरचीचे उत्पादन अपेक्षित आहे. त्यास २० रुपये प्रतिकिलोचा दर मिळू शकतो. त्यामुळे आणखी अंदाजे दोन लाख रुपये उत्पन्न मिळेल त्यासाठी किमान ५५ ते ६० हजार रुपये खर्च लागणार आहे. मिळालेले उत्पन्न व मिळू शकणारे उत्पन्न याची गोळाबेरीज करता ढोबळी मिरचीपासून टंचाईस्थितीत त्यांना किमान ३ लाख ५७ हजार ३५० रुपये निव्वळ उत्पन्न मिळणे अपेक्षित आहे.

## कारले भोपळ्याची लागवड

टंचाईस्थितीत नियोजनाने शेती केल्यास थोड्या पाण्यात शाश्वत शेतीची कास धरता येऊ शकते याची प्रचिती आल्याने उपलब्ध पाण्याच्या आधारावर दीड एकर कारले व १ एकर १० गुंठे भोपळा पिकाची लागवड केली. आजमितीला दोन्ही पिकांची वाढ चांगली असून या पिकांपासून वाघे यांना चांगले उत्पादन व उत्पन्न मिळणे अपेक्षित आहे.

**(लेखक हे शिर्डी येथील उप माहिती कार्यालयात प्रभारी माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९९२१५०१८५०**

# महाराष्ट्रात योग फेस्टिव्हल

योग दिवस स्पेशल


२१ जून या आंतरराष्ट्रीय योग दिनासोबतच प्रत्येक महिन्याच्या २१ तारखेला महाराष्ट्रात शाळा, महाविद्यालये व विद्यापीठ स्तरावर योग दिन साजरा करण्यात येणार आहे. १२ जानेवारी हा दिवस स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त 'युवक दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. त्यामुळे १२ जानेवारी ते २१ जानेवारी या दरम्यान महाराष्ट्रामध्ये विविध ठिकाणी योग फेस्टिव्हलचे आयोजन करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. जिल्हास्तरावर



शाळा, महाविद्यालये, तंत्रनिकेतन, वैद्यकीय महाविद्यालये यांच्या माध्यमातून राज्यातील सुमारे ४० हजार गावांपर्यंत योगाचा प्रचार करण्याचे काम या योग फेस्टिव्हलच्या माध्यमातून करण्यात येईल. शालेय शिक्षणापासूनच योगाचा प्रचार आणि प्रसार होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन शालेय शिक्षण आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी केले आहे. शासनाच्या विविध विभागांमार्फत जिल्हास्तरीय योग दिन समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीमार्फत प्रत्येक जिल्ह्यामध्ये वर्षातून एकदा योग महोत्सव साजरा करण्याबाबत नियोजन करण्यात येईल. यासाठी जिल्हास्तरीय समितीवर नियंत्रण ठेवणारी राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात येणार आहे. केवळ वर्षातील एक दिवस योगदिन साजरा करण्यावर न थांबता प्रत्येक महिन्याच्या २१ तारखेला योगदिन साजरा करण्याची संकल्पना शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी आखली आहे. त्यामुळे यापुढे दर महिन्याच्या २१ तारखेला राज्यातील शाळा, महाविद्यालये व विद्यापीठस्तरावर योगदिन साजरा केला जाणार आहे.








# योगसाधना

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने गेल्या वर्षी संयुक्त राष्ट्र संघाने २१ जून रोजी जागतिक योग दिवस साजरा करण्याचा निर्णय घेतला. यंदा दुसरा जागतिक योग दिवस २१ जून २०१६ रोजी जगातील विविध देशांमध्ये अतिशय उत्साहाने साजरा करण्यात आला. विविध देशांतील सर्व वयोगटातील नागरिक यामध्ये सहभागी झाले. उत्तम आरोग्य, मानसिक स्वास्थ्य आणि अध्यात्माची अनुभूती मिळण्यासाठी योगाभ्यास हा उपयुक्त ठरत असल्याने, अधिकाधिक नागरिक योगाभ्यासाकडे आकर्षित होत आहेत. भारताने जगाला दिलेली योग ही मोठी देणगी ठरली आहे. भारतीय योगपरंपरा, आता समर्थ असा जागतिक वारसा बनली आहे.






यंदाच्या योग दिवसाची काही छायाचित्रे.






21 JUNE 2016, 7 to 8 am




MUMBAI POLICE & SPANDAN ARTS
JOINTLY ORGANISED







# व्हा योगा गुरू...

**२१ जून २०१६ रोजी दुसरा जागतिक योग दिवस साजरा करण्यात आला. योगशास्त्राला भारतात प्राचीन काळापासून महत्त्व होतेच. पण गेल्या काही दशकात योगाभ्यास सर्व जगात केला जात आहे. मानवी मन आणि शरीर सुदृढ ठेवण्यासाठी योगाची उपयुक्तता आता सिद्ध झाली आहे. काही योगगुरूंनी अथक परिश्रम आणि निष्ठेने योगाचा प्रचार-प्रसार केला आहे. सध्याच्या अत्यंत धावपळीच्या आणि धकाधकीच्या काळात स्वत:ची तब्येत सुदृढ ठेवण्यासाठी आणि ताणतणावापासून मुक्ती मिळवण्यासाठी योगसाधनेकडे वळणाऱ्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढत आहे. त्यामुळे प्रशिक्षित योगगुरू वा योगतज्ज्ञांचीही गरज वाढली आहे. या क्षेत्रात प्राविण्य मिळवल्यास करिअरच्या चांगल्या संधी उपलबध होऊ शकतात.**

सुरेश वांदिले

### योगविषयाचे शिक्षण प्रशिक्षण देणाऱ्या काही संस्था

**मोरारजी देसाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ योग** या संस्थेची स्थापना भारत सरकारने १९९८ साली केली. योग शिक्षण आणि प्रशिक्षणांसदर्भात सेंटर ऑफ एक्सलन्स म्हणून या संस्थेची स्थापना करण्यात आली. संस्थेमार्फत (१) बी.एस्सी इन योगा हा तीन वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. अर्हता- १२ वी विज्ञान परीक्षेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयात सरासरीने ५० टक्के गुण. प्रत्येक विषयात स्वतंत्ररीत्या उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. १ ऑगस्ट रोजी उमेदवाराचे वय २१ वर्षांपेक्षा अधिक नसावे. हा अभ्यासक्रम गुरू गोविंद सिंघ इंद्रप्रस्थ युनिव्हर्सिटीशी संलग्न आहे. या अभ्यासक्रमासाठी निवड झालेल्या प्रत्येक उमेदवारास ३ हजार रुपयाचे विद्यावेतन दिले जाते. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी चाळणी परीक्षा घेतली जाते. या परीक्षेद्वारे ६० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

(२) डिप्लोमा इन योग सायन्स हा एक वर्ष कालावधीचा अभ्यासक्रम आहे. तो कोणत्याही विद्याशाखेतील ५० टक्के गुणप्राप्त पदवीधरास करता येतो. अनुसूचित जाती आणि जमाती संवर्गासाठी ४५ टक्के गुण. पदव्युत्तर पदवी असल्यास प्रवेशाच्या वेळेस ५ टक्के वेटेज दिले जाते. वयोमर्यादा १ ऑगस्ट रोजी ३० वर्षांपेक्षा कमी असावी. पहिल्या सत्रातील निकालावर आधारित १३ गुणवंत उमेदवारांना दरमहा ३००० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते.

(३) सर्टिफिकेट कोर्स इन योगासना फॉर हेल्थ प्रमोशन- कालावधी- ३ महिने. अर्हता- कोणत्याही विषयातील १२वी.हा अभ्यासक्रम अंशकालीन आहे. ५० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

(४) सर्टिफिकेट कोर्स इन प्राणायम ॲण्ड मेडिटेशन फॉर हेल्थ प्रमोशन-कालावधी- ३ महिने. अर्हता- कोणत्याही विषयातील १२वी. हा अभ्यासक्रम अंशकालीन आहे. ५० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

(५)मॉड्युलर सर्टिफिकेट कोर्स इन योगा सायन्स- जागतिक पातळीवर योगाचे महत्त्व वाढवण्यासाठी या अभ्यासक्रमांची संरचना करण्यात आली आहे. योग प्रशिक्षक आणि गुरूंसाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरू शकतो. मानसिक, आध्यात्मिक आणि शारीरिक क्षमता वाढीसाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण या अभ्यासक्रमात दिले जाते. योगाविषयी अधिकाधिक जनजागृती करण्यासाठी या अभ्यासक्रमाचा उपयोग होतो. कालावधी- साडे तीन महिने. अर्हता - कोणत्याही विषयातील १२वी उत्तीर्ण.

(६) फाऊंडेशन कोर्स इन योगा सायन्स फॉर प्रमोशन ऑफ हेल्थ ॲण्ड वेलनेस. या अभ्यासक्रमाला ५० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. कालावधी- एक महिना

संपर्क- मोरारजी देसाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ योग, ६८,



अशोका रोड गोल डाकखाना, नवी दिल्ली- ११०००१, संकेतस्थळ-http://www.yogamdniy.nic.in/, ईमेल-mdniy@yahoo.co.in

**स्वामी विवेकानंद योग अनुसंधान संस्था** या संस्थेस डीम्ड युनिव्हर्सटिचा दर्जा देण्यात आले आहे. या संस्थेचे अभ्यासक्रम (१) बी.एस्सी इन योग ॲण्ड कॉन्सियसनेस. अर्हता- कोणत्याही विषयातील १२वी. कालावधी- ३ वर्षे. हा निवासी स्वरूपाचा अभ्यासक्रम आहे. अभ्यासक्रमाचा प्रारंभ १ ऑगस्ट रोजी होईल. या अभ्यासक्रमात उमेदवारांना स्वत:चे योग केंद्र काढण्याची क्षमता आणि कौशल्य प्राप्त होईल, असे शिक्षण-प्रशिक्षण दिले जाते.

(२) बी.एस्सी इन योग ॲण्ड एज्युकेशन. अर्हता- ५० टक्के गुणांसह कोणत्याही विषयातील १२ वी. कालावधी- ३वर्षे. हा निवासी स्वरूपाचा

अभ्यासक्रम आहे. उच्च माध्यमिक शाळांमध्ये योग शिकवण्याची क्षमता आणि कौशल्य या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केले जाते. प्रवेशासाठी इंग्रजीचे ज्ञान आवश्यक आहे.

(३) बी.एस्सी इन योग ॲण्ड मॅनेजमेंट. अर्हता– ५० टक्के गुणांसह कोणत्याही विषयातील १२वी. कालावधी– ३वर्षे. या अभ्यासक्रमात योग आणि व्यवस्थापन ज्ञानशाखेचा समन्वय साधण्यात येतो. नव्या युगातील कार्पोरेट जगत आणि समाजाच्या योगविषयक गरजा भागवणारे प्रवर्तक होण्यासाठी आवश्यक ज्ञान या अभ्यासक्रमात दिले जाते.

(४) बी.एस्सी इन योग थेरपी. अर्हता– ५० टक्के गुणांसह कोणत्याही विषयातील १२वी. कालावधी– ३ वर्षे.या अभ्यासक्रमात रुग्णालये, सुश्रुषा गृहे, निसर्गोपचार केंद्रे, हेल्थ क्लब यासाठी लागणाऱ्या योगोपचार तज्ज्ञ र्निमितीचे शिक्षण आणि प्रशिक्षण या अभ्यासक्रमाद्वारे दिले जाते. स्वत:चे



योग केंद्र चालवण्याचे कौशल्यही शिकवले जाते.

(५) बॅचलर ऑफ नेचरोपथी ॲण्ड योगिक सायन्स. अर्हता– ५० टक्के गुणांसह कोणत्याही विषयातील १२वी. कालावधी– ५ वर्षे.या अभ्यासक्रमात वैद्यकीय निसर्गोपचार आणि योग विज्ञान यांचा समन्वय साधला जातो. विद्यार्थ्यांची निवड मुलाखत अथवा चाळणीपरीक्षेद्वारे केली जाते.

(६) योग इन्स्ट्रक्टर– या अभ्यासक्रमाचा कालावधी एक महिन्याचा आहे.योगाचे धडे इतरांना देण्याइतपत या प्रशिक्षणाद्वारे संबंधित उमेदवारांना सक्षम केले जाते. अर्हता– ५० टक्के गुणांसह कोणत्याही विषयातील १२वी.

**इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ योगिक सायन्स ॲण्ड रिसर्च–** या संस्थेचे अभ्यासक्रम– (१) सर्टिफिकेट कोर्स इन योगिक सायन्स ॲण्ड नेचर क्युअर. कालावधी– ३ महिने. अर्हता– १० वी.

संपर्क– द, प्रिंसिपल, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ योगिक सायन्स ॲण्ड रिसर्च, सत्यानंद धाम, प्लॉट नंबर बी /१३९, एचआयजी बीडीए ड्युप्लेक्स, आरबीआय कॉलनी, बारामुंडा, भूवनेश्वर–७५१००३ ओडिशा, संकेतस्थळ–http://www.iiysar.co.in/,

ईमेल– iiysar.officegmail.com

योग दिवस स्पेशल

(२)मास्टर्स डिग्री इन योगा– कालावधी– दोन वर्षे. अर्हता– कोणत्याही विषयातील पदवी. हा अभ्यासक्रम उत्कल युनिव्हर्सिटी ऑफ कल्चरशी संलग्रित आहे.

संपर्क– प्रशांती, कुटिरम,विवेकानंद रोड, कल्लूबल्लू, पोस्ट जिगानी अनेकल, बेंगळुरु–५६०१०५,

संकेतस्थळ–http://svyasa.edu.in/,

ईमेल– infosvyasa.edu.in

**देव संस्कृती विश्वविद्यालय** संस्थेचे अभ्यासक्रम–(१) सर्टिफिकेट कोर्स इन योग ॲण्ड अल्टरनेटिव्ह थेरपी.(२) सर्टिफिकेट कोर्स इन होलिस्टिक हेल्थ मॅनेजमेंट (३) बॅचलर ऑफ आर्ट्स इन योगिक सायन्स (४) बॅचलर ऑफ सायन्स इन योगिक सायन्स (५) मास्टर ऑफ आर्ट्स इन प्लाइड योगा ॲण्ड ह्युमन एक्सलेन्स (६) बॅचलर ऑफ सायन्स इन योगिक सायन्स ॲण्ड होलिस्टिक हेल्थ (७) मास्टर ऑफ आर्ट्स इन ह्युमन कांशिएसनेस ॲण्ड योगिक सायन्स (८) पोस्ट ग्रज्युएट डिप्लोमा इन ह्युमन कांशिएसनेस ॲण्ड योगिक थेरपी(९) इंटिग्रेटेड मास्टर्स डिग्री प्रोग्रॅम इन एम.ए इन. प्लाइड योग ॲण्ड ह्युमन एक्सलन्स(१०) इंटिग्रेटेड मास्टर्स डिग्री प्रोग्रॅम इन एम.एस्सी इन योगिक सायन्स ॲण्ड होलिस्टिक हेल्थ(११)डॉक्टारेट इन ह्युमन कांशिएसनेस ॲण्ड योगिक सायन्स

संपर्क– देव संस्कृती विश्वविद्यालय, गायत्रीकुंज–शांतीकुंज, हरिद्वार–२४९४११,संकेतस्थळ – http://www.dsvv.ac.in/,
ईमेल–infodsvv.ac.in

**गुरुकुल कांग्री विश्वविद्यालय हरिद्वार** संस्थेचे अभ्यासक्रम

(१)सर्टिफिकेट कोर्स इन योग. कालावधी सहा महिने.(२) बॅचलर ऑफ आर्ट्स इन योग. कालावधी– तीन वर्षे. अर्हता– कोणत्याही विषयातील १२वी उत्तीर्ण .(३) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन ह्युमन कांशिएसनेस ॲण्ड योगिक सायन्स

(४) मास्टर ऑफ आर्ट्स इन ह्युमन कांशिएसनेस ॲण्ड योगिक सायन्स .कालावधी– दोन वर्षे. संपर्क– रजिस्ट्रार, गुरुकुल कांग्री विश्वविद्यालय, गुरुकुल कांग्री, हरिद्वार–२४९४०४,

संकेतस्थळ– http://gkv.ac.in, ईमेल– registrargkv.ac.in

**राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ** पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन योग थेरपी ॲण्ड स्ट्रेस मॅनेजमेंट– कालावधी– एक वर्षं. इंटर्नशीप– सहा महिने. अर्हता– कोणत्याही विषयातील पदवी. मानवी मन आणि शरीर सुदृढ राहण्यासाठी पांतजली योगशास्त्राची उपयुक्तता यावर या अभ्यासक्रमात भर देण्यात येतो. संस्कृत भाषेचे ज्ञान असल्यास उत्तम.

संपर्क– राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ, तिरुपती–५१७५०७, आंध्रपदेश, संकेतस्थळ–http://rsvidyapeetha.ac.in,
ईमेल–registraršrsvp@yahoo.co.in




@Dev_Fadnavis

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राच्या विकासाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेत असतात. या निर्णयांची माहिती ते तत्काळ ट्विटरद्वारे प्रसृत करतात. गतिमान आणि पारदर्शक विकासासाठी त्यांची आत्यंतिक तळमळ या ट्विटसमधून दिसून येते. गेल्या महिनाभरातील त्यांचे काही ट्विटस्.**

इस्रोच्या यशस्वी मोहिमेनंतर...

And this fete is even more special for Maharashtra asCoEP students' pico-satellite SWAYAM too is a part of this launch! Elated & Proud! @isro

This time its 20-in-1! Incredible! Once again saluting team @isro for such record launch by #PSLVC34 ! #Cartosat2

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त...

It was a unique experience to perform Yoga this morning, at Bandra Reclamation with @Mumbai Police & citizens. #YogaDay

ट्विटरवरील संवादाविषयी समाधान व्यक्त करताना...

Glad to get connected with more tha n 1 Million-Minds on @twitter A million thanks! Looking forward to connect more, learn more & communicate more!

जलयुक्त शिवारच्या यशस्वितेविषयी...

Collecting rainwater drained from the narrow village roads, construction of small bunds were some of the projects implemented in Amravati.

It rained today &glimpses of how water gets accumulated because of #JalYuktShivar work in Dudhgaonvillage,Parbhani




**जागतिक पर्यावरण दिनी...**

Let us take the collective responsibility to lessen demands&increasetrees.Lets respect nature! #WorldEnvironmentDay

पुणे येथील विविध कार्यक्रमानिमित्त..

In Pune for various prog& one thing I am looking forward to most is the interaction with the school kids as their school reopens today!

शिवरायांवरील रेखाचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन करताना...

Honoured to inaugurate, with Hon Governor,an exhibition of paintings on the life&vision of #ChhatrapatiShivajiMaharaj

विजयानंतर बॅडमिंटनपटू सायनाचे कौतुक करताना...

Congratulations @ NSaina for making India proud by winning the #AustralianOpen the 2nd time ! #AustraliaOpen2016

शिवराज्याभिषेकानंतर छायाचित्रे शेअर करताना...

Sharing glimpses of memorableRajyabhishekSohola at Raigad with YuvrajChhatrapatiSambhajiRaje.

जलयुक्त शिवार अभियानाची पाहणी करताना..

In village Kita,Yavatmal dist. Inspected #JalYuktShivar works. It is surely leading towards sustainable agriculture.

मलेशियन शिष्टमंडळासोबत बैठक झाल्यानंतर...

Had a very good meeting with Malaysian delegation of CIDB holdings. MP @poonam_mahajan too was present. @twit_cidbh

We discussed ways for increased collaboration for Nagpur-Mumbai Super Communication Express Way and few other road projects.

वन विभाग
महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

# माझे वृक्ष... माझे जीवन

# १ जुलै २०१६

## एक दिवस आपल्या भविष्यासाठी...

## चला, हरित महाराष्ट्र चळवळीमध्ये सहभागी होऊ या.





मा. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य



मा. सुधीर मुनगंटीवार
मंत्री, वित्त आणि नियोजन, वने
महाराष्ट्र राज्य

## एकच लक्ष्य...
## दोन कोटी वृक्ष

अधिक माहितीसाठी संपर्क : www.mahaforest.gov.in किंवा नजीकच्या वन विभाग कार्यालयास भेट द्या

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th July 2016
Date of Publication : 10th of every Month

# लोकमान्य : लोकराज्य



सर्वाधिक खपाचे मासिक

प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक ब्रिजेश सिंह, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह